

# माहिती अधिकार
# जनहित याचिका
# लोकअदालत



• सुधाकर दोखणे

FOUNDED IN 1965


माहिती अधिकार
जनहित याचिका
लोकअदालत
सुधाकर दोखणे

**लेखक**

**सुधाकर दोखणे ©**

०१, तळमजला, 'पर्णकुटी'
हरिश्चंद्र पाटील मार्ग, शिवाजी पार्क,
दादर (पश्चिम), मुंबई ४०००२८
दूरध्वनी : ०२२-२४४७५३३३/५८८८
भ्रमणध्वनी : ९८३३१०३१८८
संकेत स्थळ : sudhakardokhane@gmail.com

**प्रकाशक**

**प्रॅक्टिसिंग इंजिनियर्स, अर्किटेक्ट्स ॲण्ड टाऊन प्लॅनर्स असोसियेशन (इंडिया) PEATA (India)**
४,५, तळमजला, नगरी टेरेस,
सूनावाला अग्यारी लेन, एम.एम. छोटानी मार्ग,
माहिम (पश्चिम), मुंबई-४०००१६.
दूरध्वनी : ०२२- २४४४५९९८/२८९७
संकेत स्थळ : peataindia@rediffmail.com
www.peataindia.org

**मुद्रक**

**कलायडो ग्राफिक्स**
E'mail : info@kaleidographics.com

**संगणकीय अक्षर जुळणी**

**सौ. स्नेहल पटवर्धन**

**प्रथमावृत्ती : २०१२**

**मूल्य : ₹ २००/-**

# मनोगत

मी स्वतः कायदे अथवा विधितज्ञ नाही. बांधकामशास्त्राशी व्यवसाय निगडित असल्याने फार पूर्वीपासून कायदेपंडित, विधितज्ञ, वकील यांच्याशी माझा नेहमीच संबंध राहिलेला आहे. कोणत्याही व्यावसायीकास कायद्याचे मूलभूत ज्ञान असेल तर त्याचा दैनंदिन व्यवहारासाठी बराच उपयोग होतो हा माझा वैयक्तिक अनुभव आहे. कदाचित यामुळेच दिवाणी आणि फौजदारी कायदेकानून, करारपत्रे आणि अन्य दस्तावेज वाचण्याचा मला छंद लागला. अनेक जेष्ठ कायदेपंडित, निवृत्त न्यायाधीश, विधितज्ञ यांच्याशी माझा कायम संपर्क राहिल्याने विविध प्रकारचे कायदे आणि प्रश्न समजून घेण्यासाठी त्यांची खूप मदत झाली आहे. व्यवसायानिमित्त दिवाणी आणि फौजदारी न्यायालयात वादी-प्रतिवादी यांच्या तर्फे होणारे युक्तिवाद ऐकण्यासाठी प्रेक्षक म्हणून बऱ्याचवेळा मी हजेरी लावली असल्याने या विषयाची मला खास गोडी लागली, हे सत्य आहे.

विधिशास्त्र आणि कायदे यावर अनेक मान्यवरांचे आणि कायदेपंडितांची वेगवेगळ्या विषयावर इंग्रजीत पुस्तके उपलब्ध आहेत. तथापि विधिविषयांवर मराठीत पुस्तके अभावानेच पहावयास मिळतात. वरील पार्श्वभूमीवर अपराधशास्त्र आणि दंडनीती या विषयावर आधारित **"मृत्युदंड : असावा की नसावा?"** ह्या मराठीत लिहिलेल्या आणि नव आनंद प्रकाशनाने नुकत्याच प्रकाशित केलेल्या माझ्या पुस्तकाला मान्यवरांचा आणि वाचकांचा चांगला प्रतिसाद मिळाला आहे.

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर २६ जानेवारी १९५० रोजी भारत प्रजासत्ताक देश म्हणून घोषित झाला आणि त्याबरोबर भारतीय नागरिकांच्या सर्वांगिण विकासाच्या वाटा खुल्या झाल्या. सुयोग्य परिवर्तनाचे वारे वाहू लागले. खंडप्राय देश, फार मोठी लोकसंख्या, ५०%हून अधिक निरक्षरजनता, अंधश्रध्दा, प्रखर रूढी-रीतीरिवाजांचा पगडा, अपुऱ्या सेवासुविधा या व अशा अनेक समस्यांचे निराकरण करण्यासाठी जनहिताच्यादृष्टीने जवळपास सर्व क्षेत्रात विकासाच्या कामाला गती मिळू लागली.

भारतीय न्यायव्यवस्था ही आपल्या देशाच्यालोकशाहीचा तृतीय स्तंभ म्हणून ओळखली जाते. मुळातच ब्रिटीश न्यायरचनेवर आपली न्यायव्यवस्था बेतलेली असल्यामुळे एकूणच भारतीय कायदे, न्यायप्रणाली आणि न्यायदान याचा

चेहरामोहरा ब्रिटिश पध्दतीशी मिळताजुळता आहे. विकास व प्रगतीसाठी कायद्याचा आधार अनिवार्य असतो. तथापि भारतीय न्यायव्यवस्थेत प्रचलित असलेल्या काही कायद्यात सुधारणा-बदल करणे आणि नवीन कायदे अस्तित्वात येणे अपरिहार्य होते.

गोरगरीब, उपेक्षित आणि समाजातील दुर्बल जनतेच्या गरजा, सेवासुविधा व त्याचबरोबर त्यांच्या मूलभूत आणि संविधानिक हक्कांचे संरक्षण करण्यासाठी कालमानपरत्वे कायद्यात सुधारणा होवू लागल्या. न्यायापासून वंचित राहिलेल्या जनतेच्या दारात न्याय पोचावा या भावनेने भारतीय न्यायव्यवस्थेचे प्रयत्न सुरू झाले. परिणामी **"माहिती अधिकार कायदा : जनहित याचिका : लोक अदालत"** अशा प्रभावी कायदेपध्दती अस्तित्वात आल्या. नेहमीच्या क्लिष्ट न्यायप्रणाली ऐवजी 'पर्यायी/पूरक गतिमान न्यायनिवाडा' यामुळे वरील कायद्यांना देशभरातून जनतेचा फार मोठा पाठिंबा आणि प्रतिसाद मिळाला हे नाकारून चालणार नाही.

वरील कायद्यांच्या रूपाने भारतीय न्यायव्यवस्थेने जनसामान्यांच्या हाती एक प्रभावी शस्त्र उपलब्ध करून दिल्याबद्दल न्यायव्यवस्था, केन्द्र व राज्य सरकार, नियामक आणि कायदेमंडळाच्या या स्पृहणीय कामगिरीबद्दल कृतज्ञता व्यक्त करणे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य ठरते.

वरील तिन्ही विषयांवर इंग्रजी भाषेत अनेक नामवंताचे लिखाण प्रसिध्द आहे, पण त्या संदर्भात मराठी पुस्तके जवळपास उपलब्ध नाहीत असेच म्हणावे लागेल. "मृत्युदंड" हे पुस्तक लिहिण्यामागे भोपाळ युनिव्हर्सिटीच्या विधिशाखेचे निवृत्त अधिष्ठाता **डॉ. श्री.एन.व्ही. परांजपे** या विधिमहर्षीची प्रेरणा आणि आशीर्वाद लाभले हे माझे भाग्य. प्रस्तुत पुस्तकासाठीपण त्यांचे मार्गदर्शन आणि खास करून त्यांनी लिहिलेल्या "Public Interest Litigation, Lok Adalat & Para-Legal Services" या ग्रंथाचे फार मोलाचे सहाय्य लाभले आहे. खरेतर त्यांनीच मला या वेगळ्या विधिविषयावरचे हे पुस्तक मराठीत लिहिण्यास प्रवृत्त केले आहे असे म्हणणे अतिशयोक्ती ठरू नये. या प्रसंगी त्यांची कृतज्ञता व्यक्त करणे माझे कर्तव्य आहे.

कोणत्याही क्षेत्रात काम करणाऱ्या व्यावसाईकाला कायद्याची मूलभूत माहिती आणि ज्ञान असेल तर व्यवसायामध्ये त्याचा बराच उपयोग होतो याचा अनुभव अनेकांना आलेला असेल. सध्या माहिती अधिकार कायद्याद्वारे माहिती मिळवणे, रयतेवर होणाऱ्या अन्यायाविरुध्द जनहित याचिका दाखल करणे आणि

लोक अदालतीद्वारे गतिमान न्याय मिळवणे या न्यायालयीन प्रक्रियांचा जनतेकडून फार मोठ्याप्रमाणात वापर होताना दिसून येत आहे.

प्रस्तुत लिखाण, "माहिती अधिकार कायदा", "जनहित याचिका" आणि "लोक अदालत" या तीन विधिविषयांसंबधी असून मा.न्यायालयांनी त्यासंदर्भात न्यायासनासमोर आलेल्या वेगवेगळ्या खटल्यांवर निर्णय-निवाडा देताना केलेले भाष्य आणि निर्णय प्रकरण क्रमांकासह नमूद केलेले आहे. सदर भाष्य अथवा निर्णय यांचा समर्पक मराठी अनुवाद देण्याचा प्रयत्न केला असून त्याची मूळ इंग्रजी संहिता तळटीप म्हणून त्या त्या प्रकरणाच्याशेवटी वाचकांच्या सोईसाठी नमूद केलेली आहे. चोखंदळ वाचकांना या कायदेशीर प्रक्रियांची कमीतकमी तोंडओळख जरी झाली तरी माझे सायास सार्थकी लागले असे मी समजेन.

नेहमीचे काम सांभाळून माझी कार्यालयीन सहाय्यिका **सौ. स्नेहल पटवर्धन** यांनी सदर पुस्तकाच्या संगणकीय अक्षरजुळणीचे किचकट काम अत्यंत मेहनत घेवून पूर्ण केले त्यासाठी त्यांचे मनःपूर्वक आभार. उचित मुखपृष्ठासह सुरेख छपाईने नटलेल्या या पुस्तकासाठी मुद्रणक्षेत्रात नेत्रदीपक कामगिरी करणाऱ्या कलायडो ग्राफिक्सचे **श्री. श्री. विरकर.** या माणसाने जुन्या नातेसंबंधाची बूज राखून मदतीचा हात पुढे केला याबद्दल ते अभिनंदनास पात्र आहेत.

या पुस्तकासाठी माझे स्नेही **मा. श्री. भालचंद्र दसगावकर** जिल्हा व सत्र न्यायाधीश (निवृत्त), **श्री. दे.ना. चौधरी** -अध्यक्ष, महाराष्ट्र स्टेट लॉ कमिशन आणि प्रधान सचिव : लॉ ॲण्ड ज्युडिशियरी महाराष्ट्र राज्य (निवृत्त), ज्येष्ठ विधितज्ञ आणि विधिव्यावसाई **ॲड. श्री. सुनील मोगरे** यांनी अभिप्राय दिल्याबद्दल मी या सर्वांचा ऋणी आहे.

एक व्यावसाईक बांधिलकी म्हणून **प्रॅक्टीसिंग इंजिनियर्स, अर्किटेक्ट्स ॲण्ड टाऊन प्लॅनर्स असोसियेशन (इंडिया)** या मुंबईतील प्रख्यात वास्तुव्यावसाई संघटनेने हे लिखाण प्रकाशित करण्याची जबाबदारी संस्थेचे अध्यक्ष **अर्कि. श्री. प्रवीण कणेकर** यांनी उचलली, आणि त्याचबरोबर सुयोग्य अभिप्राय दिल्याबद्दल त्यांचे आणि संघटनेच्या कार्यकारी मंडळाचे हार्दिक आभार.

**मुंबई** — **सुधाकर दोखणे**

२०१२

# एक संग्राह्य साहित्य निर्मिती

सामान्य जनतेच्या कल्याणासाठी "माहिती अधिकार : जनहित याचिका: लोक अदालत" या पूरक न्यायप्रक्रिया अंमलात आणून भारतीय न्यायव्यवस्थेने फार मोलाची कामगिरी बजावलेली आहे. अल्पखर्चिक आणि त्वरित न्यायदान यामुळे या तिन्ही न्यायप्रक्रियांना जनतेकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून त्याचे फायदे आम जनतेला मिळत आहेत. भारतीय जनतेच्या मूलभूत अधिकारांचे संरक्षण करणे ही या न्यायिक प्रक्रियांची मूळ संकल्पना असल्याने विधिक्षेत्रात त्याचे महत्व अनन्य साधारण आहे असेच म्हणावे लागेल.

लेखक स्वतः वास्तुव्यावसाई असूनसुध्दा कायदेक्षेत्रातले हे त्यांचे चौथे पुस्तक आहे, ही खरोखर नवलाईची गोष्ट आहे. श्री. सुधाकर दोखणे यांना कायदेविषयक असणारी आवड आणि विधी विषयाचा त्यांनी केलेला भरपूर अभ्यास आणि व्यासंग सदर पुस्तकात सहजपणे दिसून येतो. कायदेविषयक पुस्तकें मराठी भाषेत फार अभावाने पहावयास मिळतात. ती उणीव या पुस्तकाने बऱ्याचअंशी भरून काढली आहे हे मान्य करावेच लागेल. या स्तुत्य उपक्रमासाठी लेखकाचे मनःपूर्वक अभिनंदन.

विषयानुरुप पुस्तकाची विभागणी ३ विभागात केलेली दिसून येते. माहिती अधिकार आणि जनहित याचिका या विभागात प्रत्येकी १७ प्रकरणे, आणि 'लोक अदालत' विभागात ६ प्रकरणे असून त्या त्या न्यायप्रक्रियेची संकल्पना, उद्देश, मर्यादा, साध्य, सफलता आणि गैरवापर याचा अर्थपूर्ण उहापोह अत्यंत सोप्या भाषेत केला गेला असल्याने प्रत्येक विषयाची उकल सुलभ आणि परिणामकारक झालेली आहे.

त्याचबरोबर संदर्भित प्रकरणांत न्यायासनाने वेळोवेळी दिलेले महत्वपूर्ण निवाडे मराठीतून दिल्यामुळे चोखंदळ वाचकांची सोय झाली आहे. त्या निवाड्यांची मूळ इंग्रजी संहिता तळटीप म्हणून दिल्याने विधिव्यावसाईक आणि विधी अभ्यासकांना त्याचा चांगला उपयोग होईल असा विश्वास वाटतो.

प्रत्येक प्रकरणाच्या शीर्षकाला अनुरुप अशी उद्‌बोधक माहिती अगदी सहजरित्या वाचकांपर्यंत पुरवण्याचा लेखकाचा प्रयत्न वाखाणण्यासारखा आहे. अधिक भाष्य न करता एवढेच म्हणेन की, 'सदर पुस्तक लिहिताना लेखकाने प्रत्येक विषय फार बारकाव्याने तपासलेला आणि अभ्यासलेला दिसून येतो'.

कायदेविषयक अत्यंत महत्व असलेल्या या तिन्ही विषयांना सोप्या आणि प्रवाही भाषेची जोड मिळाल्याने प्रत्येक मराठी वाचक या पुस्तकाचे स्वागत करून ते कायम संग्रही ठेवेल याची मला खात्री आहे. लेखकाचे पुनश्च अभिनंदन.

मुंबई
२०१२

**दे.ना. चौधरी**

अध्यक्ष : महाराष्ट्र स्टेट लॉ कमिशन
प्रधान सचिव : लॉ ॲण्ड ज्युडिशियरी
महाराष्ट्र शासन (निवृत्त)

# समाज प्रबोधन आणि लोकशिक्षण

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर अनेक कायदे झाले, न्यायालये निर्माण झाली, तरीही फार मोठ्याप्रमाणात न्यायालयात खटले प्रलंबित आहेत. या विलंबासाठी फक्त न्यायालयांनाच जबाबदार धरता येणार नाही, समाजातील प्रत्येक घटक त्याला या ना त्याप्रकारे जबाबदार आहेत.

'माहिती अधिकार कायदा २००५', दि. २२/१२/२००५ साली जम्मू व काश्मिर वगळता सर्व भारतात लागू झाला. सर्वसामान्य माणसाला त्याच्या प्रलंबित अथवा निकाली कामाचे शासकीय अनुदान मिळणाऱ्या कार्यालयातून त्वरित माहिती मिळावी हा हेतू या कायद्याने सफल झाला आहे. या कायद्याची सविस्तर माहिती लेखकाने या पुस्तकात दिल्यामुळे प्रत्येक व्यक्तीला त्याची तोंडओळख नक्कीच होईल अशी माझी खात्री आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने, मंत्रालय सहाय्यक पदासाठीच्या मुख्यपरीक्षेच्या पाठ्यक्रमांत अमूलाग्र बदल केला असून नवीन पाठ्यक्रमात 'माहितीचा अधिकार कायदा -२००५' हा १५ गुणांसाठी समाविष्ट केलेला आहे. त्यामुळे लोकसेवा आयोगाच्या परिक्षार्थींना हे पुस्तक निश्चितच उपयुक्त ठरणारे आहे.

या पुस्तकात सर्वोच्च न्यायालयाच्या अनेक महत्वाच्या निवाड्यांचा उल्लेख केलेला असल्याने वकील व विधितज्ञांना त्याचा जरूर फायदा होईल. माहिती म्हणजे काय? कुठली माहिती प्रगट करता येणार नाही? या बरोबर केंद्रीय व राज्य माहिती आयोग आणि तेथील कार्यपध्दतीचा खुलासेवार वृत्तांत या पुस्तकात लेखकाने दिलेला आहे.

भारतीय संविधानाच्या कलम ३२ व २२६ अंतर्गत 'जनहित याचिका' दाखल करता येते. सर्वसामान्य जनता, आणि दुर्लक्षित जातीजमातीच्या अधिकारांचे उल्लंघन झाल्यास त्या घटकांना न्याय मिळावा व त्यांचे कायदेशीर अधिकार प्रस्थापित व्हावेत यासाठी भारतीय संविधानाने ही तरतूद केली आहे.

लेखकाने हा क्लिष्टविषय अत्यंत सोप्या भाषेत सांगताना, जनहित, जनहित याचिका, यांच्या व्याख्या, ती केव्हा दाखल करता येते? व केव्हा करता येत

नाही? त्याचे फायदे कोणते? या व अशा अनेक गोष्टीचा परामर्श घेतला आहे. तो घेताना अनेक जनहित याचिकांचा उल्लेख, आणि त्यावर सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या विविध निवाड्यांचे निष्कर्ष काय आहेत याचे थोडक्यात पण समजेल अशा सुलभ भाषेत वर्णन केलेले आहे.

जनहित याचिका खर्चिक तर आहेच पण त्यांच्या निवाड्यालाही विलंब लागतो. याचे कारण या तरतुदींचा दुरुपयोग होवू नये हाच त्या मागचा विचार असावा. भारतीय संविधानाव्यतिरिक्त ब्रिटन व अमेरिका या देशात जनहित याचिकेचे प्रयोग कसे यशस्वी झाले याचाही या पुस्तकात आवर्जून उल्लेख केला आहे.

गरीब जनतेस विनामूल्य त्वरित न्याय मिळावा या भावनेतून न्या. भगवती यांनी 'लोक अदालतीची' संकल्पना मांडली, आणि त्याला कायदेशीर स्वरूप देण्यासाठी प्रयत्न केले. त्यामुळे समाजाकडून लोक अदालतींना भरघोस प्रतिसाद मिळाला हे नाकारता येणार नाही.

लोक अदालत हे गरीबांना व इतर पक्षकारांना विनाविलंब, विनामूल्य न्याय मिळण्याचं एक ठिकाण आहे. या अदालतीमध्ये उभय पक्षकारांमध्ये सामोपचाराने तडजोड होते व दोघांनाही समान न्याय मिळतो. याहीपेक्षा, दोन दुभंगलेली मने येथे जोडली जातात. सामाजिकस्वास्थ्य टिकण्यास त्यामुळे मदत होते. या पुस्तकांत श्री. दोखणे यांनी लोक अदालत संदर्भात असलेल्या तरततुदी सोप्याभाषेत सांगितल्या असून त्याचबरोबर लोक अदालतीचे अनेक फायदे कथन केले आहेत.

लोक अदालत ही पर्यायी न्यायसंस्था नसून ती पूरक न्यायप्रक्रिया आहे. त्यात मिळणाऱ्या निकालाला कायदेशीर स्वरूप प्राप्त होते. पक्षकारांची परस्पर संमती आणि समझोत्यामुळे लोक अदालतीतर्फे जो निकाल दिला जातो, त्यावर कोणत्याही पक्षकाराला वरिष्ठ न्यायालयात अपील करता येत नाही. त्यामुळे अनेकवर्षे जे खटले प्रलंबित असतात त्यांची समन्वयाने सांगता होते. न्यायालयातील खटल्यांची संख्याही कमी होते. या निमित्ताने जनजागृतीचे काम या पुस्तकाद्वारे होईल ही या साहित्य निर्मितीची जमेची बाजू आहे.

माहिती अधिकार, जनहित याचिका, आणि लोक अदालत या न्यायप्रक्रियांची एकत्रित माहिती सामान्य नागरिकांना मिळावी हाच या लिखाणाचा एकमेव उद्देश दिसून येतो. समाज प्रबोधन व लोकशिक्षण असा दुहेरी हेतू त्यामुळे

साध्य झाला आहे. अशा प्रकारची पुस्तके मराठी भाषेत कमी प्रमाणात उपलब्ध आहेत ती उणीव हे पुस्तक निश्चित भरून काढेल असे वाटते.

श्री. सुधाकर दोखणे हे पेशाने वास्तुव्यावसायी आहेत. तथापि भारतीय न्यायसंस्था आणि कायद्यांची आवड आणि त्याचा भरपूर अभ्यास केल्यामुळे ते स्वतः कायद्याचे पदवीधर नसतांनासुध्दा कायद्यावरील त्यांची काही पुस्तके यापूर्वी प्रसिध्द झालेली असून कायदेक्षेत्रात कामकाज आणि विधिव्यवसाय करणाऱ्यां व्यक्तींबरोबर सामान्य नागरिकांनी त्याला उत्स्फूर्त प्रतिसाद दिलेला आहे.

या नवीन स्पृहणीय कामगिरीबद्दल त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन. समाजातील सर्वस्तरातील नागरिक या पुस्तकालाही भरभरून प्रतिसाद देतील ही सदिच्छा व्यक्त करतो. अभिनंदन करतो.

औरंगाबाद
२०१२

**श्री. भालचंद्र दसगांवकर**
जिल्हा व सत्र न्यायाधीश-निवृत्त

# अभिनव उपक्रम

भारतीय संविधानाने समस्त नागरिकांना संविधानिक अधिकार बहाल केलेले आहेत. नागरिकांना प्राप्त झालेल्या अधिकारांचे संरक्षण करण्यासाठी न्यायव्यवस्थेने कायद्यात वेळोवेळी सुधारणा केल्या असून यापुढेही होत राहतील. परंतु साक्षरतेअभावी गोरगरीब, मागासवर्गीय, अल्पसंख्यांक आणि तळागाळातील मोठ्या जनसंख्येला त्यांना मिळालेल्या संविधानिक अधिकाराची योग्य ती जाणीव नसल्यामुळे समाजातील धनदांडगे, विघातक घटक आणि मतलबी राजकारण्यांकडून आजही त्यांची राजरोस पिळवणूक आणि शोषण होते आहे. समाजातील सुशिक्षितवर्गही उदासीन असल्यामुळे तेही या अपप्रवृत्तींना बळी पडताहेत. शासन आणि न्यायव्यवस्थेने नागरिकांच्या अधिकार रक्षणासाठी केलेले कायदे अस्तित्वात असूनसुध्दा प्रत्यक्षात समाजविघातक घटकांपासून आपले संरक्षण कसे करावे? या संभ्रमात आजही सामान्य माणूस भरडून निघत आहे ही वस्तुस्थिती आहे.

'माहिती अधिकार कायदा : जनहित याचिका : आणि लोक अदालत' या न्यायिकप्रक्रियेच्या कठोर अंमलबजावणीमुळे कधी नव्हे तो सामान्य नागरिकांना फार मोठा दिलासा मिळाला असून त्या संदर्भात जनजागृती झपाट्याने होत आहे, ही बाब समाजस्वास्थ्यासाठी निश्चितच आशादायक आहे.

आपल्या देशातील कायदे आणि न्यायिककामकाज बहुतांशी इंग्रजी भाषेत चालत असल्यामुळे असे कायदे आणि त्यातील विविध प्रावधाने स्थानीय भाषेत जनसामान्यांना सुलभपणे कळणे आणि समजणे फार महत्वाचे असते, आणि नेमके हेच काम प्रस्तुत पुस्तकाचे लेखक श्री. सुधाकर दोखणे यांनी मोठ्या कुशलतेने केले असल्याने ते अभिनंदनास पात्र आहेत.

कायदे, अधिनियम, न्यायालयीन निवाडे-निर्देश आणि कार्यपध्दतीत वारंवार वापरात येणाऱ्या इंग्रजी संज्ञा ऐकलेल्या-वाचलेल्या असल्यातरी त्याचा 'नेमका' अर्थ बऱ्याचवेळा समजत नाही. अशावेळी अंगवळणी पडलेल्या इंग्रजी संज्ञासाठी स्थानीय भाषेत चपखल शब्दयोजना करणे त्याही पेक्षा कठीण असते. परंतु या प्रस्तुत पुस्तकात लेखकाने सरळ, सुलभ आणि अचुक पर्यायी मराठी संज्ञा आणि शब्दयोजना केल्यामुळे मराठी वाचकांना त्याचा निश्चित फायदा होईल.

लेखकाने या तिन्ही विषयांचा सखोल अभ्यास केल्याचे स्पष्ट दिसून येते. त्यामुळेच जनसामान्यांचे अधिकार काय आहेत? आणि त्याचा वापर कसा करावा? याचे विश्लेषण अत्यंत प्रभावीपणे केल्याचे निदर्शनास येते. कोणत्याबाबतीत, कोणत्यावेळी माहिती अधिकाराचा वापर करून जनहिताच्या दृष्टीने असलेली संवेदनशील माहिती कोणत्या माहिती अधिकाऱ्याकडून मिळवता येईल? आणि त्यासाठी काय करावे? यासंदर्भात लेखकाने केलेले विवेचन सहजपणे समजण्यासारखे आहे. माहिती अधिकाराचा वापर करून मिळवलेल्या माहितीच्याआधारे कोणत्या कारणांसाठी जनहित याचिका दाखल होवू शकते? त्यात ग्राह्य आणि अग्राह्य विषय कोणते आहेत? जनहित याचिका दाखल करताना काय तयारी करावी लागते? कोणती काळजी घेतली पहिजे? या व अशा अत्यंत महत्वाच्या गोष्टी अगदी सुलभरितीने मांडल्यामुळे अर्जदारास त्याचे अधिकार आणि घ्यावयाची खबरदारी याची माहिती कळण्यास निश्चित मदत होईल असा विश्वास वाटतो.

वृथा अहंकार, क्षुल्लक वैय्यक्तिक हेवेदावे, कौटुंबिक वादविवाद या कारणांमुळे न्यायालयात गुदरलेल्या, गुदरल्या जाणाऱ्या दाव्यांची संख्या प्रचंड असून त्यात दिवसेंदिवस भर पडते आहे. अशा वादांमुळे वेळेचा प्रचंड अपव्यय आणि अमर्याद खर्च होतो हा अनुभव सर्वांच्या माहितीचा आहे. सहज तडजोड आणि समझोता होवू शकणाऱ्या वादांवर 'लोक अदालतीच्या' माध्यमातून त्वरित न्यायनिवाडा मिळू शकतो हे आता लोकांच्या लक्षात आले असून त्याचे फायदे संबंधितांना मिळत आहेत ही या न्यायप्रक्रियेची फार मोठी 'उपलब्धी' म्हणावी लागेल. अहंकारापोटी निष्कारण वादासाठीवाद, ही अपप्रवृत्ती दिवसेंदिवस कमी होत असून तडजोडीने वाद मिटवण्याकडे लोकांचा कल वाढत असल्याने दिवाणी न्यायालयाच्या कामाचा भार बऱ्याच अंशी कमी होत आहे ही वस्तुस्थिती समाधानकारक आहे. लेखकाने या तिन्ही न्यायप्रक्रियांचा आणि त्यातील उपलब्धीचा तपशील अगदी सोप्या भाषेत मोठ्या कौशल्याने सादर केल्यामुळे याबाबतीत आवश्यक ते जनजागरण होण्यासाठी निश्चित मदत होईल.

'माहिती अधिकार कायदा' या विभागातील प्रकरण क्रमांक १५ खरेतर या पुस्तकाचा मानबिंदू ठरावा. समाजकल्याणासाठी माहिती अधिकाराचा वापर करून अनेक अपप्रवृती उजेडात आणण्यासाठी देशभरातील १८ बहाद्दर सामाजिक कार्यकर्त्यांनी आजवर केलेले प्राणार्पण, १०हून अधिक कार्यकर्त्यांनी सोसलेली

मारहाण आणि शारीरिक छळ याची कहाणी कोणत्याही संवेदनशील माणसाच्या काळजाला हात घालणारी असून प्रत्येकाला विषण्ण आणि अंतर्मुख करणारी आहे. असे निंदनीय प्रकार घडू नयेत यासाठी न्यायसंस्थेने कठोर पावले उचलल्यामुळे समाजकंटक, मतलबी अधिकारी आणि बेलगाम राजकारण्यांना या न्यायप्रक्रियांचा फटका किती जबरदस्त बसला आहे हे न्यायालयांनी दिलेल्या आजवरच्या निवाड्यांवरून सहज लक्षात येईल. समाजकल्याणासाठी स्वतःचे प्राणार्पण करणाऱ्या या वीर आणि निर्भय कार्यकर्त्यांची समाजाने वेळीच दखल घेवून त्यांच्या निस्वार्थी बलिदानाची वेगवेगळ्या स्वरुपात 'चिरस्मृती' जतन केल्यास ती पुढच्या पिढीसाठी फार मोठी समाजसेवा ठरेल असे वाटते.

लेखकाने भरपूर मेहनत घेवून या तिन्ही अत्यावश्यक विषयांची मांडणी अत्यंत प्रभावीपणे केली असून, सोप्या व प्रवाही भाषेमुळे विषय सहजपणे समजून घेण्यास मराठी वाचकांना कोणतीही अडचण पडणार नाही याची मला खात्री आहे. या संदर्भात, मा. सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालयांनी वेळोवेळी दिलेले निवाडे आणि निर्देश यांच्या मूळ इंग्रजी संहितेचे मराठीत भाषांतरीत केलेले 'उतारे (**Citations**)' आणि त्या त्या प्रकरणांच्या शेवटी त्याची मूळ इंग्रजी संहिता नमूद केल्यामुळे अभ्यासू वाचकांची सोय झाली आहे. लेखक स्वतः वास्तूव्यावसायाशी निगडीत असूनसुध्दा त्यांनी प्रस्तुत पुस्तकासाठी 'विधिविषयांची' केलेली अपवादात्मक निवड कुणालाही स्फूर्तीदायक वाटावी अशीच आहे. विधिशास्त्राचा सखोल अभ्यास करून अत्यंत तळमळीने केलेली ही 'संग्राह्य' साहित्यनिर्मिती वाखाणण्यासारखी आहे. चोखंदळ वाचक या पुस्तकास भरभरून प्रतिसाद देतील याबाबतीत मी तरी निःशंक आहे. या अभिनव उपक्रमासाठी लेखकाचे मनःपूर्वक अभिनंदन, आणि शुभेच्छा.

**मुंबई**
२०१२

**सुनील मोगरे**
ज्येष्ठ विधितज्ज्ञ आणि विधिव्यावसायी

# “आदर्श” अधिकार, याचिका अन् अदालत!

स्वतः कायदेतज्ञ नाही पण प्रत्येक व्यावसाईकास कायद्याचे मूलभूत ज्ञान असायलाच पाहिजे असे मानणारी एक व्यक्ती वेळोवेळी विधितज्ञांकडून कायदे जाणून त्यांच्याशी सल्लामसलत करून त्या त्या कायद्याची तोंडओळख तुम्हांआम्हां सर्वांना व्हावी ह्या ध्यासाने एका विधिविषयक साहित्याची निर्मिती करते त्या व्यक्तीचे नाव श्री. सुधाकर दोखणे, आणि त्यांच्या लेखणीतून साकार झालेले हे पुस्तक “माहिती अधिकार, जनहित याचिका, आणि लोक अदालत” या पुस्तकातील सर्व विषय बहुचर्चित आणि जनसामान्यांच्या हिताशी निगडीत असल्याने रोज वर्तमानपत्रात कोठे ना कोठे यांचा उल्लेख झालेला असतोच. तिन्ही न्यायिक विषयांची साधकबाधक चर्चा आणि विवेचन या पुस्तकात असल्याने, ते नुसतेच चाळण्यासाठी नसून चोखंदळ वाचकांसाठी आणि विधी संदर्भासाठीसुध्दा उपयुक्त ठरणार आहे.

माहिती अधिकार, जनहित याचिका आणि लोक अदालत ह्या त्यामानाने क्लिष्ट विषयांचा उहापोह करीत असताना वेगवेगळे संदर्भ आणि दाखले देऊन विषय सोपे करण्याचा प्रयत्न केला गेला आहे. या विषयांची जागतिकस्तरावर घेतली गेलेली दखल संदर्भित विषयांचे महत्व पटवून देते. वेगवेगळ्या अर्जांचे नमुने, कोणते अधिकार कोठे लागू होतात-होत नाहीत याची माहिती स्पष्टपणे नमूद केल्यामुळे वाचकास योग्य दिशा शोधण्यास मदत होते.

एकीकडे माहिती अधिकाराचा लोककल्याणासाठी उपयोग करणारे, माफिया टोळ्यांकडून होणारा जाच आणि मारहाण सोसून, वेळप्रसंगी आपल्या जिवाची बाजी लावणारे निःस्वार्थी सामाजिक कार्यकर्ते, तर दुसरीकडे माहिती अधिकाराचा सर्रास गैरवापर करणारे तथाकथीत गुंड-पुंड नेते ह्या विषयी दिलेली माहिती उद्बोधक आहे.

जनहित आणि जनहित याचिका या प्रक्रियेची माहिती करून देतांना, मूळ संकल्पना, निकष, कार्यपध्दती, ग्राह्य-अग्राह्य विषय, कक्षा-सीमा-मर्यादा, साध्य व सफलता ह्यासंबंधी दिलेली माहिती वाचकांस अधिक प्रगल्भ करते. याचिका फेटाळली जावू नये म्हणून, ती दाखल करताना घेण्याची काळजी, तसेच जीवन,

व्यक्तिस्वातंत्र्य या मूलभूत अधिकारांचे रक्षण, पर्यावरण संरक्षण यासंदर्भात जनहित याचिकेचे योगदान किती महत्वाचे आहे हे परिणामकारकपणे नमूद केले आहे.

शेवटच्या विभागात 'लोक अदालत'ची कार्यपध्दती, न्यायिक प्रक्रिया, आणि नागरिकांना मिळणारे फायदे कथन करतांना लोक अदालत ही आपापसातील वाद मिटवण्यासाठी अस्तित्वात असलेली गतिमान न्यायदान यंत्रणा किती व्यवहार्य वैकल्पिक पर्याय आहे, हे सुलभ पध्दतीने मांडलेले आहे.

एकंदरीत पहाता ह्या महत्वाच्या तीन विषयांमुळे, विशेषतः माहिती अधिकार व जनहित याचिका न्यायप्रक्रियेमुळे राजकारणी व सनदी अधिकाऱ्यांच्या मनमानीला, कुरघोडीचे राजकारण आणि समाजकारण करू पाहणाऱ्या फॅशनेबल नवीन धेंडांना नक्कीच खीळ बसली आहे. पण माहिती अधिकार स्वातंत्र्याचा, स्वतःचे उखळ पांढरे करण्याकरीता दुरुपयोग करणारे, गल्लीबोळात जन्माला आलेले, सरकारी कचेऱ्या, महापालिका आदी ठिकाणी तळ ठोकून बसणारे "ब्लॅकमेलर्स" यांना कोण अडवणार? त्यांना वेळीच आवर घालण्याची गरज आहे. काळा बरोबर वेळ निघून गेली की सारेच मुसळ केरात जाते. म्हणून काळ सोकावता कामा नये.

जनसामान्यांच्या हितासाठी माहिती अधिकाराचे स्वातंत्र्य अबाधित राहीले पाहिजे, लोक अदालत चालली पाहिजे आणि जनहित याचिका दाखल होत राहिल्या पाहिजेत, आणि त्यासाठी आमच्या संघटनेचे योगदान म्हणून सदर पुस्तक प्रकाशित करण्याचा आम्ही निर्णय घेतला.

१९६५ साली स्थापन झालेल्या आमच्या PRACTISING ENGINEERS, ARCHITECTS & TOWN PLANNERS ASSOCIATION (INDIA) या बांधकाम व्यावसायाशी निगडीत असलेल्या आणि सामाजिक बांधिलकीची सदैव जाणीव जोपासणाऱ्या लोकमान्य व्यावसाईक संघटनेचा 'अध्यक्ष' ह्या नात्याने, सदर पुस्तक प्रकाशित करून वाचकांपर्यंत पोचवण्यास आम्हाला अत्यंत आनंद होत आहे.

सदर पुस्तक कोणत्याही क्षेत्रात काम करणाऱ्या व्यावसाईकांच्या कायम संग्रही असणे अत्यावश्यक आहे असे आमचे प्रामाणिक मत आहे. धन्यवाद!

**मुंबई** **अर्कि. प्रवीण कणेकर**

२०१२ (अध्यक्ष-पिएटा (इंडिया)

सूचना: सामाजिक गरजेनुसार किंवा न्यायालयीन निवाड्यामुळे अनेक कायद्यामध्ये दुरुस्त्या किंवा सुधारणा प्रक्रिया संसद किंवा विधानमंडळाकडून सतत चालू असतात, त्यामुळे वारंवार होणाऱ्या दुरुस्त्या किंवा सुधारणा मसुद्याची अद्ययावत माहिती करून घेणे फारच जिकिरीचे व कठीण असते. तरीही, प्रत्येक प्रकरणात संबंधित कायद्यातील माहिती शक्यतो काळजीपूर्वक व बिनचूक नमूद करण्याचा प्रयत्न केला आहे. तथापी, मूळ कायदा आणि त्यातील प्रावधानें अंतीम असतात. या लिखाणात अनवधानाने काही त्रुटी राहून गेल्या असतील व त्यावरून कृती केल्यामुळे एखाद्याचे काही नुकसान झाल्यास त्यास लेखक आणि अथवा प्रकाशक जबाबदार असणार नाहीत याची कृपया नोंद घ्यावी.

• विभाग एक •

# माहिती अधिकार कायदा

( RIGHT TO INFORMATION ACT )

# अनुक्रमणिका


| | | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १. | माहिती अधिकार: ऐतिहासिक पार्श्वभूमी | १९-२२ |
| २. | माहिती अधिकार : उद्देश, व्याप्ती आणि अधिकारक्षेत्र | २३-२५ |
| ३. | कायद्यांतर्गत नागरिकांचे माहिती अधिकार | २६-२७ |
| ४. | माहिती पुरवणाऱ्या शासकीय आणि निमशासकीय संस्था/यंत्रणा | २८-२९ |
| ५. | सार्वजनिक जनसंपर्क माहिती अधिकारी : नेमणूक | ३०-३१ |
| ६. | शासकीय-सार्वजनिक अधिकाऱ्यांची कर्तव्ये | ३२-३४ |
| ७. | केन्द्रीय आणि राज्य माहिती आयोग | ३५-३८ |
| ८. | विनंती अर्ज : नमुना, शुल्कआकार आणि निकाली मुदत | ३९-४१ |
| ९. | विनंती अर्ज : निकाली प्रक्रिया | ४२-४४ |
| १०. | दाद मागण्याचा अधिकार, निकाल आणि दंडाचे प्रावधान | ४५-४७ |
| ११. | संवेदनशील माहिती : प्रगटीकरणास नकार | ४८-५१ |
| १२. | माहिती अधिकार कायदा : इतर प्रावधाने | ५२-५३ |
| १३. | माहिती अधिकार कायदा : प्रभाव, वस्तुस्थिती आणि गैरवापर | ५४-५९ |
| १४. | माहिती अधिकार कायदा : सरकारचे खास परिपत्रक | ६०-६१ |
| १५. | व्यर्थ न हो बलिदान | ६२-७० |
| १६. | कार्यकर्त्यांच्या हत्या : प्रतिबंधात्मक-उपाययोजना | ७१-७३ |
| १७. | माहिती मिळवणे-अपील करणे : अर्जाचे नमुने : परिशिष्ट १-२-३ | ७४-७६ |

१

# माहिती अधिकार : ऐतिहासिक पार्श्वभूमी

**(Historical Background of Right to Information Act)**

**निरंकुशो सत्तायाम् , सज्जनं दुर्जनायते**
**सत्ता मदांधिता करे सर्वे, भ्रष्टाचारो भवंन्ति च**

एकतर्फी, जुलमी आणि अनिर्बंध सत्तेमुळे वाईट प्रवृत्तींना प्रोत्साहन मिळते. परिणामी भ्रष्टाचार बोकाळतो आणि जनसामान्यांवरील अन्याय वाढतात. अन्यायाचा अतिरेक झाल्यास जनता पेटून उठते आणि त्यात अशा राजवटी नामशेष होतात, हा इतिहास आहे. १८ व्या शतकानंतर अनेक देशात हळूहळू अशा एकछत्री राजवटी संपून जनताभिमुख लोकसत्तेचे राजकारण सुरू झाले, आणि पारदर्शी आणि जबाबदार शासनयंत्रणा अत्यावश्यक आहे याची सर्व स्तरावर जाणीव होवू लागली. जनसामान्यांचे सहकार्य आणि अंकुश अनिवार्य असल्याने आमजनतेस योग्य तो अधिकार मिळणे आवश्यक आहे याची खात्री पटल्याने जवळपास प्रत्येक देशाने त्यांच्या जनतेला "माहिती अधिकार" उपलब्ध करून दिला ही वस्तुस्थिती आहे.

भारतीय संविधानाच्या कलम ९ (१) (अ) अन्वये प्रत्येक नागरिकास मुक्त अभिव्यक्ती आणि भाषण स्वातंत्र्याचा मूलभूत अधिकार आहे. त्याचबरोबर कलम ५१-(अ) अन्वये प्रत्येकास त्याच्या संविधानिक अधिकारांचा वापर करण्याचा स्वयंसिध्द अधिकार आहे. जनहिताच्यादृष्टीने अचूक आणि खात्रीलायक माहिती उपलब्ध न झाल्यास समाजात अफवा, तर्ककुर्तक, आणि गैरसमज अराजकाला आमंत्रण देतात. तथापि आपल्या मूलभूत अधिकारांची जाण असलेला नागरिक आपल्या कर्तव्याचे व्यवस्थितपणे पालन करू शकतो. परिणामी अन्यायाविरुध्द लढण्यासाठी प्रेरणा आणि बळ मिळते. या पार्श्वभूमीवर "माहिती अधिकार कायद्याच्या" रुपाने प्रत्येक भारतीय नागरिकास मोलाची मदत झाली आहे हे नाकारून चालणार नाही.

माहिती अधिकार या अद्वितीय कायद्याची जागतिकस्तरावर कुणी आणि कशी दखल घेतली याचा इतिहास समजून घेतल्यास एकूणच या कायद्याची संकल्पना, साध्य आणि सफलता कळू शकेल. त्याचा त्रोटक इतिवृत्तांत खालीलप्रमाणे आहे.

## • स्वीडन :-

सर्वप्रथम स्वीडनने 'माहिती अधिकाराची' संकल्पना मांडून साऱ्या जगाला या नवीन आणि प्रभावी अधिकाराची जाणीव करून दिली हे मान्य करावेच लागेल. १८१० सालापासून स्वीडिश नागरिकांना 'माहिती अधिकार' बहाल करण्यात आला आहे. १९४९ साली त्यात बदल होवून नवीन कायद्याप्रमाणे प्रत्येक नागरिकाला संविधानिक अधिकार प्राप्त झालेले आहेत. तेव्हापासून सरकारी आणि सार्वजनिक संस्थेच्या प्रत्येक दस्तावेजाची माहिती मिळवण्याचा स्वीडिश नागरिकांना अधिकार असून सरकारकडून त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी होत आहे.

## • ब्रिटन :-

"अधिकृत गुप्तता कायदा-१९११" आणि त्यानंतर राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीकोनातून त्यात केलेल्या सुधारणा (१९८९) अन्वये काही खास अधिकृत गुप्त दस्तावेजाची माहिती ब्रिटिश नागरिकांना दिली जात नव्हती. तथापि शासनव्यवस्था पारदर्शक आणि जबाबदार होण्यासाठी नागरिकांना माहिती अधिकार देणे गरजेचे आहे हे लक्षात आल्यावर (१) Local Government (Access to Information) Act : 1985, (२) Envoironment and Safety Information Act : 1988 आणि (३) Access to Health Records Act : 1990, हे कायदे ब्रिटिश संसदेने पारित केले.

या सर्व कायद्यास तत्पूर्वी अस्तित्वात असलेल्या (१) Data Protection Act : 1984 (२) Access to Personal File Act : 1988 (३) Medical Report Act : 1988 आणि (४) Consumer Credit Act : 1974, यांची साथ मिळाल्याने एकूणच माहिती अधिकार कायद्याच्या कक्षा विस्तारित झाल्या ज्याचा फार मोठा फायदा सामान्य ब्रिटिश नागरिकांना आज मिळतो आहे.

## • ऑस्ट्रेलिया :-

ऑस्ट्रेलियात सर्वप्रथम डिसेंबर १९८२ रोजी Freedom of Information Act अंमलात आला; ज्यामुळे प्रत्येक नागरिकांस ऑस्ट्रेलियन संघराज्याच्या प्रत्येक दस्तावेजाची माहिती मिळणे सुलभ झाले, आणि त्याचबरोबर सरकारतर्फे जनहितासाठी घेण्यात येणाऱ्या प्रत्येक निर्णयाची माहिती व मूळ मार्गदर्शक तत्वेसुध्दा नागरिकांच्या माहितीसाठी खुली झाली. तथापि जनहित आणि राष्ट्रीय सुरक्षेसंबंधी काही खास दस्तावेजांची माहिती नाकारण्याचा अधिकार सरकारने राखून ठेवलेला आहे.

## • अमेरिका :-

भारताप्रमाणेच मुक्त अभिव्यक्ती आणि भाषण स्वातंत्र्याचा संविधानिक अधिकार प्रत्येक अमेरिकन नागरिकास आहे. १९८६ साली संविधानात सुधारणा करून Freedom of Information Reform Act : 1980 अंमलात आला; ज्यात पूर्वीच्या कायद्यात बदल होवून नवीन कायदा माहिती अधिकारासंदर्भात जास्तीतजास्त लोकाभिमुख झाला हे मान्य करावे लागेल. प्रत्येक नागरिकास त्याच्या संविधानिक अधिकाराची जाण आणि सुयोग्य माहिती असल्यामुळे इतर देशांच्यामानाने अमेरिकेत माहिती अधिकाराचा वापर फार प्रभावीपणे होत असलेला दिसून येतो.

## • भारत :-

भारतातील 'माहिती अधिकाराच्या' चळवळीचे खरे श्रेय राजस्थानातील **'मझदूर किसान शक्तीसंघटनेस'** द्यावे लागेल. १९९० साली ख्यातनाम समाजसेविका **श्रीमती अरुणा रॉय** यांच्या नेतृत्वाखाली या संघटनेने 'राजस्थान सरकार' विरुध्द लढा पुकारून दुष्काळग्रस्तांना देवू केलेल्या आर्थिक मदतीतील सरकारी भ्रष्टाचार उघडा केला आणि राजस्थान सरकारचे पूर्णपणे वस्त्रहरण केले. परिणामी जनमताचा रेटा वाढला आणि राजस्थान सरकारला २००० साली 'माहिती अधिकार कायदा' पारित करावा लागला. जवळपास त्याच कालखंडात १९९७ साली तामिळनाडू आणि गोवा, २००० साली कर्नाटक, २००१ साली दिल्ली, २००२ साली महाराष्ट्र आणि आसाम, २००३ साली मध्यप्रदेश आणि २००४ साली जम्मू आणि काश्मीर

राज्यांनी तत्कालीन अस्तित्वात असलेल्या माहिती अधिकाराची अंमलबजावणी सुरू केली, हा इतिहास आहे.

मझदूर किसान शक्तीसंघटनेच्या यशापासून प्रेरणा घेवून समर्पक माहिती अधिकारासंबंधी राष्ट्रीय कायदा करावा यासाठी देशभरात जनमताचा दबाव वाढू लागला. परिणामी केन्द्रीय सरकारला याची गंभीर दखल घ्यावी लागली आणि त्यानुसार भारतीय वृत्तपत्र मंडळाने (Press Council of India) मा.न्या.पी.बी. सावंत यांच्या अध्यक्षतेखाली तयार केलेला माहिती अधिकाराचा मसुदा, १९९६ साली भारत सरकारला सादर केला गेला.

त्यानंतर केन्द्रीय शासनाने **श्री.एच.डी. शौरी** यांच्या अध्यक्षतेखाली समिती **(Shourie Committee)** स्थापन करून सदर मसुद्यावर अभिप्राय पाठवण्याचे आदेश दिले. प्रस्तावित कायद्याचा मसुदा आणि शौरी समितीचा अहवाल १९९७ साली प्रसिध्द झाला. तथापि समितीने Freedom of Information Bill मध्येच सुधारणा करून नवीन मसुदा तयार केला हे स्पष्ट झाले. सदर बिल संसदेने २००२ साली पारित केले पण ते शेवटपर्यंत अंमलात आणले नाही. यावर समाजसेवक आणि अनेक समाजसेवी संस्थानी आक्षेप घेवून पर्यायी आणि परिणामकारक कायद्याची आवश्यकता विषद केली. सरतेशेवटी मसुद्यात योग्य त्या सुधारणा करून “माहिती अधिकार कायदा -२००५” साली संसदेत पारित होवून (जम्मू आणि काश्मीर वगळता) भारतातील इतर सर्व राज्यात लागू करण्यात आला आहे.

# २

# माहिती अधिकार : उद्देश,व्याप्ती आणि अधिकारक्षेत्र

**(Object, Scope & Jurisdiction of PIL)**

माहिती अधिकाराचे उद्दिष्ट, व्याप्ती आणि अधिकारक्षेत्र याची माहिती जाणून घेण्यापूर्वी सर्व प्रथम कायद्याच्याभाषेत "माहिती" (Information) म्हणजे नेमके काय हे समजून घेणे आवश्यक आहे.

## • माहिती (Information)

कोणत्याही स्वरूपातील मजकूर-साहित्य हे 'माहिती' म्हणून ओळखले जाते. त्यात सरकारी अथवा सार्वजनिक कागदपत्रे, दस्तावेज, निवेदन, ईमेल, मत, वृत्तपत्रातील बातमी, परिपत्रक, रोजनामा, कराररमदार, अहवाल पत्रके, नमुने, प्रतिकृती, वस्तुस्थिती-सत्यकथन, त्याचबरोबर खाजगी आणि स्वायत्त संस्थांची माहिती यांचा समावेश आहे. सार्वजनिक आणि शासकीय व्यवस्थापनांचे व्यवस्थापन, कार्यवाही, निर्णय या संदर्भातील कोणत्याही स्वरुपातला मजकूर "माहिती" या सदरात मोडतो. Information या शब्दाचे मूळ, लॅटीन भाषेतील Formation आणि Forma या संज्ञेतून पहावयास मिळेल.

## • माहिती अधिकार (Right to Information)

भारतीय संविधान कलम १९ अन्वये सर्व भारतीय नागरिकांस इतर संविधानिक अधिकाराबरोबर अभिव्यक्तीस्वातंत्र्य (Freedom of Expression) आणि भाषण स्वातंत्र्याचे (Freedom of Speech) अधिकार प्राप्त झालेले आहेत. त्यात माहिती अधिकार स्वातंत्र्य (Freedom of Right to Information) हे अव्यक्त स्वरुपात (Implied) समाविष्ट आहे कारण भाषण स्वातंत्र्य हे मूलतः माहिती अधिकार स्वातंत्र्यावरच अवलंबून असल्याने हे सर्व अधिकार एकमेकांस पूरक असून त्यांचा परस्परांशी अविभाज्य संबंध आहे हे समजून घेणे आवश्यक आहे.

## • उद्देश (Object)

गोरगरिब, उपेक्षित, आणि समाजातील दुर्बल घटकांबरोबर सर्वसामान्य नागरिकांना त्यांच्या मूलभूत अधिकाराचे महत्व आणि माहिती जाणून देणे हाच माहिती अधिकाराचा उद्देश आहे. शासकीय यंत्रणेतील पारदर्शकता, अधिकाऱ्यांची कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या याद्वारे शासनावर अंकुश ठेवण्यासाठी 'माहिती अधिकाराची' काटेकोरपणे अंमलबजावणी करणे हाच या कायद्याचा प्रमुख उद्देश आहे.

माहिती अधिकार संदर्भात या कायद्याचे महत्व विषद करताना तत्कालीन पंतप्रधान मा. श्री. अटल बिहारी वाजपेयी यांनी केलेले निवेदन महत्वाचे ठरावे. ते म्हणतात, "माहिती अधिकार हे फार प्रबळ आयुध असून त्याचा फायदा सामान्यजनांना होणे कोणत्याही देशाला हितकारक आहे".

> **"सर्वसामान्य नागरिक आणि समाजातील दुर्बलघटकांपर्यंत न्याय आणि सत्ता पोचवणे हे सरकारचे ध्येय आहे; आणि त्यासाठी सर्वांना माहिती अधिकार प्राप्त होणे गरजेचे आहे."** [1]

## • व्याप्ती आणि अधिकारक्षेत्र (Scope & Jurisidiction)

भारतीय संसदेने २००५ साली पारित केलेला आणि १२-१०-२००५ पासून अंमलात आलेला "माहिती अधिकार-कायदा" हा भारतीय कायदेमंडळाने तयार केलेला आजवरचा एक परिपूर्ण आणि परिणामकारक कायदा म्हणावा लागेल. जम्मू आणि काश्मीर वगळता (तिथे तो पूर्वीपासून लागू आहे) भारताच्या इतर सर्व राज्यात सदर कायदा लागू झालेला आहे, त्यात शासकीय यंत्रणा, न्यायव्यवस्था, कायदेमंडळ, सर्व प्रकारच्या सार्वजनिक संस्था आणि मंडळे यांना 'माहिती अधिकार' कायद्याच्या कृतिकक्षेत समाविष्ट करण्यात आले आहे. सदर कायद्यामध्ये शासकीय मदतीने चालणाऱ्या संस्था अथवा मंडळे यांचे कृती आणि अधिकार क्षेत्र याचे स्पष्टीकरण खालील प्रमाणे केलेले आहे :-

> **"सरकारने कायदेशीरपणे स्थापन केलेली मंडळे आणि प्रतिष्ठाने जी पूर्णपणे सरकारच्या ताब्यात आहेत अथवा ज्यांना भरीवपणे**

**प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष आर्थिक स्वरुपात सरकारी अनुदान दिले जाते, अशा सर्व खाजगी संस्था आणि मंडळे माहिती अधिकार कायदाच्या अधिकारकक्षेत समाविष्ट आहेत." [2]**

माहिती अधिकाराचा उद्देश, त्याची व्याप्ती आणि कृतिक्षेत्र पाहता, जनहित आणि पर्यायाने केन्द्र आणि राज्यसरकारच्या पारदर्शक कारभारासाठी या महत्वपूर्ण अधिकाराचा आवाका किती मोठा आहे हे सहज लक्षात येवू शकेल.

---

1. "The Government wants to share power with humblest, it wants to empower the weakest. It is precisely because of this reason that the Right to Information has to be ensured for all." (***Statement of then Hon'ble Prime Minister Shri. Atal Bihari Vajpai***)

2. "The bodies or authorities established or constituted by order or notification of appropriate Government including bodies "owned, controlled or substantially financed" by the Government, or non government organasations ubstantially, financed, directly or indirectly by funds", provided by the Government are also covered in it." (***Provisions for Scope and Jurisdiction of Act***)

# कायद्यांतर्गत नागरिकांचे माहिती अधिकार

**(Right to Information under the Act)**

माहिती अधिकार कायदा-२००५ अन्वये शासनाकडे आणि सार्वजनिक संस्थेच्या अधिकाऱ्यांकडे असलेली अथवा उपलब्ध होवू शकणारी सर्व माहिती ही **"जनतेची मालमत्ता"** आहे असे गृहित धरले गेले आहे. या अधिकाराप्रमाणे अर्जदाराला खरी माहिती पुरवणे शासनावर बंधनकारक असून ते शासनाच्या आणि अथवा सार्वजनिक अधिकाऱ्याच्या कामकाजाचा एक अविभाज्य भाग आहे असेच समजले जाते. माहिती अधिकार कायदा-२००५ अंतर्गत भारतीय नागरिकांना खालील अधिकार प्राप्त झालेले आहेत:-

- **नागरिकांचे अधिकार** (Rights of Citizens):

१) शासकीय अथवा सार्वजनिक संस्थेच्या अधिकाऱ्यांच्या ताब्यात असलेले अथवा उपलब्ध होवू शकणारे सार्वजनिक दस्तावेज, निर्णय, निवेदने, करारमदार, परिपत्रके, रोजनामे, अहवाल इत्यादींची अधिकृत तपासणी (Inspection) करणे, पडताळणी करणे आणि त्याचे टिपण नोंदून घेणे.

२) कागदपत्रांच्या साक्षांकित सत्यप्रती अथवा संगणकीय साहित्य, फ्लॉपीज, टेप्स, व्हिडिओ कॅसेट्स इत्यादी (उपलब्ध असल्यास) संबंधित माहिती अधिकाऱ्याकडे रीतसर शुल्क भरून विनंती अर्ज केल्यास ठराविक मुदतीत ती कागदपत्रे, साहित्य मिळवणे.

३) माहिती आणि अथवा कागदपत्रे मिळवण्यासाठी अर्जदारावर कोणतेही 'कारण' देण्याचे बंधन नसते.

४) अर्जदाराने नियमित शुल्क भरून विनंती अर्ज दाखल केलेल्या दिवसापासून "ठराविक मुदतीत" माहिती पुरवणे हे संबंधित शासकीय अथवा सार्वजनिक माहिती अधिकाऱ्यावर बंधनकारक आहे.

५) माहिती अधिकार हा फक्त भारतीय नागरिकांपुरताच मर्यादित असल्याने परदेशीय नागरिकांना त्याचा वापर करता येत नाही.

६) परदेशी कंपन्या, आस्थापना, महामंडळ यांना या अधिकाराद्वारे माहिती मिळवायचा अधिकार नाही. तथापि अशा परदेशीय कंपनीत काम करणाऱ्या कर्मचाऱ्याने (तो भारतीय नागरिक असला तर) संबंधित माहिती अधिकाऱ्याकडे रीतसर अर्ज केल्यास सदर कागदपत्रे मिळू शकतात.

७) संबंधित माहिती अधिकऱ्याकडून अर्जावर ठराविक मुदतीत कारवाई झाली नाही तर अर्जदार वरिष्ठ माहिती अधिकाऱ्याकडे/आयोगाकडे दाद (Appeal) मागू शकतो.

# ४

# माहिती पुरवणाऱ्या शासकीय आणि निमशासकीय संस्था/यंत्रणा

**(Informant Authorities : Government and NGOs)**

आपल्या देशाचा राज्यकारभार कसा चालला आहे, केन्द्रीय आणि राज्यसरकारतर्फे कोणकोणत्या कल्याणकारी योजना राबवल्या जात आहेत, कोणते नवीन कायदे केले जात आहेत, त्यातील कोणत्या कायद्यांमुळे/योजनांमुळे जनहित धोक्यात येवू शकते आणि त्याचबरोबर शासकीय, निमशासकीय आणि सार्वजनिकसंस्थेची कर्तव्यें, जबाबदाऱ्या काय आहेत या व अशा अनेक प्रश्नांचे आणि विषयांचे प्रत्येक भारतीय नागरिकाला ज्ञान असावे/मिळावे यासाठी माहिती अधिकार कायदा-२००५ अस्तित्वात आला आहे.

शासनाचा मुजोर, लहरी आणि अथवा पक्षपाती कारभार, बोकाळलेला भ्रष्टाचार यांस आळा बसून शासकीय व निमशासकीय यंत्रणेच्या कारभारात पारदर्शकता यावी ही या कायद्याची मूळ संकल्पना आहे, आणि त्यासाठी या कायद्याअंतर्गत माहिती मिळवून त्याचा योग्य वापर करणे हा अधिकार प्रत्येक नागरिकाला प्राप्त झालेला आहे.

काही अपवाद वगळता प्रत्येक शासकीय, निमशासकीय आणि सार्वजनिकसंस्थांवर माहिती अधिकार कायद्याअंतर्गत अर्जदाराला त्याने मागितलेली माहिती पुरवणे, उपलब्ध करून देणे बंधनकारक आहे. जिज्ञासू वाचकांसाठी माहिती पुरवणाऱ्या वेगवेगळ्या संस्थांचा तपशील खाली दिला आहे :-

- **शासकीय संस्था (Government Authorities) :-**

या विभागात राष्ट्रपती व राज्यपाल, केन्द्र सरकार, राज्यसरकार आणि केन्द्रशासित प्रदेश, संसद आणि विधिमंडळ, सर्वोच्च आणि उच्च न्यायालये, नगरपालिका आणि स्थानिक स्वराज्यसंस्था यांच्या कार्यालयांचा समावेश आहे.

• **अन्य शासकीय संस्था (Other Government Oraganisations) :-**

या विभागात भारतीय संविधानानुसार अथवा संसद आणि राज्यविधिमंडळांनी केलेल्या कायद्यानुसार स्थापन झालेल्या संस्थांचा समावेश आहे. त्यात भारतीय रिझर्व्ह बँक, स्टेट बँक ऑफ इंडिया, निवडणूक आयोग, आयुर्विमा महामंडळ, ऑडिटर जनरल या व अशा अनेक संस्थांची कार्यालये समाविष्ट आहेत.

• **सरकारी मालकीच्या संस्था (Government Oraganisations) :-**

यात रेल्वे, टपाल, भविष्य निर्वाहनिधी, विमान कंपन्या (एअर इंडिया इ.), पेट्रोलियम कंपन्या (भारत पेट्रोलियम इ.), राष्ट्रीयकृत बँका (बँक ऑफ महाराष्ट्र इ.), भारतीय दूतावास या व अशा केन्द्रीय अथवा राज्य सरकारच्या कायद्यानुसार / आदेशानुसार स्थापन झालेल्या आणि पूर्णपणे सरकारी मालकीच्या असलेल्या संस्था व त्यांच्या कार्यालयांचा समावेश आहे.

• **शासकीय अनुदान प्राप्त संस्था**

**(Government Aided Oraganisations) :-**

विद्यापीठे, विद्यापीठ अनुदान मंडळ, शाळा, महाविद्यालये, सहकारी संस्था, स्वयंसेवी सामाजिक संस्था व त्याचबरोबर ज्यांना शासनाकडून प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष अनुदान आणि अथवा सवलती प्राप्त आहेत अशा संस्था आणि त्यांच्या कार्यालयांचा या विभागात समावेश आहे.

वरील विवेचनावरून हे स्पष्ट होईल की जनहित आणि नागरीसुरक्षेशी निगडीत असलेल्या जवळपास सर्व शासकीय आणि निमशासकीय संस्था आणि त्यांची कार्यालये माहिती अधिकार कायदा-२००५ च्या कृतिकक्षेत आणि अधिकारक्षेत्रात समाविष्ट असल्याने त्याचा समान्य नागरिकांना त्यांच्या मूलभूत संविधानिक अधिकारांचे जतन करण्यासाठी फार मोठा फायदा झाला आहे.

# सार्वजनिक जनसंपर्क माहिती अधिकारी : नेमणूक

**(Designation of Public Information Officer - PIO)**

## • माहिती अधिकारी : नेमणूक (Appointment of PIO)

माहिती अधिकार कायदा-२००५, कलम ५ अन्वये सदर कायदा अंमलात आल्यापासून (१२ ऑक्टोबर २००५) १०० दिवसाच्या आत शासकीय, निमशासकीय सार्वजनिक संस्था आणि महामंडळे यांनी त्यांच्या व्यवस्थापन विभागासाठी सर्वस्तरावर आवश्यक तेवढे जनसंपर्क माहिती अधिकारी, केन्द्रीय जनसंपर्क माहिती अधिकारी, राज्य जनसंपर्क माहिती अधिकारी व सहाय्यक माहिती अधिकारी यांची नेमणूक करणे बंधनकारक आहे. अर्जदाराला सोईचे व्हावे म्हणून याच प्रकारच्या नेमणुका विभागीय, जिल्हा आणि तालुकास्तरावर करणे शासनावर बंधनकारक आहे.

## • माहिती अधिकारी : कार्यवाही आणि जबाबदारी

(Procedure and Resposibilities)

- जनतेला/ अर्जदाराला हवी असलेली माहिती कशी मिळवता येईल याचे योग्य ते मार्गदर्शन करून त्यांना आवश्यक ते सहाय्य आणि सहकार्य पुरवणे माहिती अधिकाऱ्यावर बंधनकारक आहे.
- दाखल झालेल्या अर्जाची छाननी करून अर्जदाराला योग्य ती माहिती कायद्याने ठरवून दिलेल्या 'ठराविक मुदतीत' पुरवण्याची जबाबदारी सदर माहिती अधिकाऱ्यावर असते.
- अर्जदाराने मागणी केलेले दस्तावेज अथवा संबंधित माहिती पुरवण्याप्रकरणी माहिती अधिकाऱ्यास कायद्याच्या प्रावधानामध्ये काही त्रुटी आढळून आल्यास अथवा सदर माहिती पुरवण्यामुळे प्रावधानाचे उल्लंघन होत आहे असे वाटल्यास, अशा प्रसंगी जेष्ठ माहिती

अधिकाऱ्यांकडून अथवा आयोगाकडून हवी असलेली मदत आणि मार्गदर्शन मिळवण्याची जबाबदारी सदर माहिती अधिकाऱ्यावर असते; व त्याप्रमाणे कायद्यात योग्य ती तरतूद केलेली आहे.

- अर्जदाराला मिळालेली माहिती 'अपुरी' अथवा 'असमाधानकारक' वाटल्यास त्याविरुध्द त्यास वरिष्ठ माहिती अधिकाऱ्याकडे/आयोगाकडे (Central / State Information Commission) दाद मागण्याचा अधिकार (Appeal) आहे. असा 'दाद अर्ज' प्राप्त झाल्यावर तो पुढील कार्यवाहीसाठी योग्य त्या आयुक्ताकडे अथवा आयोगाकडे ठराविक मुदतीत पाठवणे सदर माहिती अधिकाऱ्यावर बंधनकारक आहे. अशाप्रसंगी ठराविक मुदतीत ५ (पाच) दिवसाची मुदत वाढ देण्याचे अधिकार माहिती आयोगाकडे असतात.

# ६

# शासकीय-सार्वजनिक अधिकाऱ्यांची कर्तव्ये

## (Obligations and Responsibilities of Public Authorities)

कोणताही कायदा तयार करताना तो जास्तीत जास्त समर्पक होण्यासाठी सर्व संबंधित विषयांचा सांगोपांग विचार केला जातो. त्यात कायद्याचा उद्देश, अधिकार, कृतिक्षेत्र आणि संबंधितांनी पाळावयाचे नियम, कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या सुस्पष्ट केलेल्या असतात. माहिती अधिकार-२००५ सुध्दा त्यास अपवाद नाही. या कायद्यांतर्गत शासकीय आणि सार्वजनिक अधिकारी, संस्था आणि यंत्रणा यांच्यावर ठराविक मुदतीत अर्जदारास माहिती पुरवण्याचे बंधन असल्यामुळे या प्रकरणात त्यांनी पाळावयाचे नियम व जबाबदाऱ्या यांचा उहापोह केला आहे.

• **कर्तव्यें आणि जबाबदाऱ्या** (Obligations and Resposibilities) :-

माहिती अधिकार कायदा-२००५, कलम ४ मध्ये प्रत्येक शासकीय आणि सार्वजनिक संस्था आणि त्यांचे अधिकारी यांनी पाळावयाचे नियम, कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या खालीलप्रमाणे निर्देशित केलेल्या आहेत :-

१) सर्व सरकारी आणि सार्वजनिक संस्थेवर त्यांच्याकडे उपलब्ध असलेली अधिकृत कागदपत्रे, दस्तावेज इत्यादींचे ठराविक वेळेत योग्यप्रकारे संगणकीय संकलन करून ती सर्व माहिती देशातील इतर संगणकीय क्षेत्राशी जोडणे बंधनकारक आहे, जेणेकरून जनतेला हव्या त्या ठिकाणी हवी ती माहिती मिळण्याची व्यवस्था होवू शकेल.

२) माहिती अधिकार कायदा-२००५ अंमलात आल्यापासून १२० दिवसाच्या आत संबंधित संस्थेने खालील माहिती जाहीरपणे प्रसिध्द/प्रगट करणे बंधनकारक आहे. त्यात :-

• संस्थेची पूर्ण माहिती, रचना, जबाबदाऱ्या आणि कर्तव्ये.

- संस्थेतील अधिकारी आणि कर्मचारी यांचे अधिकार आणि कर्तव्ये, निर्णयप्रक्रिया आणि त्यावर निरीक्षण-देखरेख ठेवण्यासाठी नेमलेल्या अधिकाऱ्यांनी पाळावयाचे नियम आणि जबाबदाऱ्या.
- कर्तव्यपूर्तीसाठी ठरवलेली कार्यपध्दती.
- कर्तव्यपूर्तीसाठी ठरवलेले नियम, कायदे, सूचना आणि त्यासाठी बनवलेली नियमावली इत्यादी.
- निर्णय, परिपत्रके, निवेदने आणि त्यांची वर्गवारी.
- संस्थेची धोरणे आणि अंमलबजावणी संदर्भात जनतेच्या सहभागाविषयी केलेली उपाय योजना.
- संस्थेच्या संचालक मंडळाने दिलेली निवेदने, घेतलेले निर्णय, प्रस्ताव आणि सभेचे इतिवृत्तांत.
- संस्थेतील अधिकारी व कर्मचारी यांची नावे-पत्ते देणारी माहिती पुस्तिका.
- कर्मचारी आणि अधिकारी यांना दिले जाणारे मासिक वेतन, भत्ते आणि भरपाई इत्यादी.
- प्रत्येक विभागाचे वार्षिक अंदाजपत्रक, उत्पन्न आणि खर्चाची तरतूद.
- विशिष्ट कार्यासाठी दिली जाणारी आर्थिक मदत (Subsidy), त्याची माहिती आणि लाभार्थीची यादी.
- दिल्या जाणाऱ्या सवलती, परवाने आणि तत्सम अधिकार प्राप्त असलेल्या लाभार्थींचे तपशील इत्यादी.
- विविध माध्यमातून संस्थेच्या ताब्यात आलेली, असलेली, आणि उपलब्ध होवू शकणारी माहिती, तपशील इत्यादी.

- जनसामान्यांना माहिती अथवा कागदपत्रे पुरवण्यासाठी केलेल्या उपाय योजना, व्यवस्था आणि जनतेच्या प्रबोधनासाठी स्थापन केलेले सल्लागार कक्ष, संग्रहालय/वाचनालय आणि त्यांच्या कामाच्या वेळा इत्यादी.
- नेमलेल्या जनसंपर्क माहिती अधिकाऱ्यांची नावे, पद, हुद्दा, कार्यालयीन पत्ता, दूरध्वनी क्रमांक यांचा तपशील.

माहिती अधिकार कायद्यातील तरतुदीप्रमाणे शासकीय आणि सार्वजनिक विभागांनी वरील माहिती जाहीर करून ती जनतेला उपलब्ध करून देणे अनिवार्य असल्यामुळे, अर्जदाराला कुणाकडून नेमकी कोणती माहिती मिळू शकते हे समजण्यासाठी मोलाची मदत होते हे लक्षात येईल.

# ७

# केन्द्रीय आणि राज्य माहिती आयोग

**(Central and State Information Commission)**

संबंधितांकडून माहिती अधिकार कायद्याची अंमलबजावणी योग्यप्रकारे होते आहे की नाही हे पाहण्यासाठी आणि काही खास प्रकरणी निर्णय/निवाडे देण्यासाठी केन्द्रात आणि राज्यात 'उच्चस्तरीय माहिती आयोगाची' स्थापना करण्याचे प्रावधान माहिती अधिकार कायदा-२००५ यात समाविष्ट असून आयोगाचे आणि आयुक्तांचे अधिकार, कर्तव्यें आणि कार्यकाल किती असतो याचा ढोबळ तपशील खालीलप्रमाणे आहे :-

## • केन्द्रीय माहिती आयोग :

**(The Central Information Commission)**

माहिती अधिकार कायदा-२००५, कलम १२ अन्वये, केन्द्र शासनास शासकीय राजपत्रात (Official Gazette) विधिवत जाहीर घोषणा प्रसिध्द करून 'केन्द्रीय माहिती आयोगाची' स्थापना करणे क्रमप्राप्त आहे. प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून कायद्याची अंमलबजावणी काटेकोरपणे होत आहे की नाही हे पाहण्याची व त्यासाठी योग्य ते सहकार्य आणि मार्गदर्शन देण्याची जबाबदारी सदर आयोगावर असते.

केन्द्रीय माहिती आयोगाची एकूण सदस्य संख्या दहापेक्षा जास्त नसते. सदस्यीय मंडळात, प्रमुख माहिती आयुक्त या व्यतिरिक्त कायदा, विज्ञान, तंत्रज्ञान, समाजकार्य, व्यवस्थापन, पत्रकारिता, प्रसिध्दी माध्यमे इत्यादी क्षेत्रात योगदान दिलेल्या नामवंत व्यक्तींचा समावेश केला जातो. केन्द्रीय माहिती आयोगाचे मुख्यालय देशाची राजधानी दिल्ली येथे कार्यान्वित आहे.

मा. पंतप्रधानांच्या अध्यक्षतेखाली गठित केलेल्या समितीने शिफारस केलेल्या व्यक्तींची केन्द्रीय 'माहिती आयुक्त' आणि 'प्रमुख आणि सह माहिती आयुक्त' यांची मा. राष्ट्रपतीकडून नियुक्ती केली जाते.

माहिती अधिकार कायदा कलम १३ मध्ये प्रमुख माहिती आयुक्ताचा 'कार्यकाल' आणि 'सेवाशर्ती' याचे सविस्तर विवेचन केलेले आहे. आयुक्तांचा कार्यकाल ५ वर्षांपुरताच मर्यादित असून त्यासाठीची कमाल वयोमर्यादा ६५ वर्षे निर्धारित आहे. कार्यकाल समाप्तीनंतर अशा व्यक्तीची त्याच पदावर पुनर्नेमणूक होवू शकत नाही.

काही अपवादात्मक प्रसंगी प्रमुख माहिती आयुक्त अथवा सह-माहिती आयुक्त यांना पदावरून दूर करण्याचे प्रावधान माहिती अधिकार कायदा कलम १४ मध्ये विशद केलेले असून पदमुक्तीची कारवाई कशा पध्दतीने केली जाते याचे सविस्तर विवरण नमूद केलेले आहे.

## • राज्य माहिती आयोग :

**(The State Information Commission)**

माहिती अधिकार कायदा-२००५, कलम १५ अन्वये, राज्यस्तरावर मा. मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन झालेल्या समितीने शिफारस केलेल्या व्यक्तींची 'प्रमुख राज्य माहिती आयुक्त' म्हणून राज्याचे मा.राज्यपाल यांच्याकडून नेमणूक केली जाते. राज्य माहिती आयोगाचे कार्यालय त्या राज्याच्या राजधानीत कार्यान्वित असते.

माहिती अधिकार कायदा कलम १६ मध्ये, प्रमुख माहिती आयुक्ताचा अधिकार, कर्तव्ये, कार्यकाल आणि सेवाशर्ती याचे विवरण नमूद केले असून राज्यस्तरीय प्रमुख माहिती आयुक्ताचा एकूण कार्यकाल ५ वर्षाचा ठरवलेला आहे. त्यासाठी कमाल वयोमर्यादा ६५ वर्षे निर्धारित केली असून कार्यकाल समाप्तीनंतर त्यांची त्याच पदावर पुनर्नेमणूक होवू शकत नाही.

माहिती अधिकार कायदा कलम १७ अन्वये काही अपवादात्मक प्रसंगी, फक्त मा. राज्यपालांच्या आदेशावरूनच "प्रमुख माहिती आयुक्तांना" पदावरून दूर करण्याचे प्रावधान अंतर्भूत असून त्यात पदमुक्तीची कारवाईप्रक्रिया विषद केलेली आहे.

माहिती अधिकार कलम १८ मध्ये माहिती आयुक्त/आयोग यांना प्रदान केलेले अधिकार, कलम १९ मध्ये अपील करण्याचे प्रावधान आणि कलम २० मध्ये, अपवादात्मक प्रकरणी संबंधितांवर दंडात्मक कारवाई करण्याचे आयोगाचे अधिकार यांचा सविस्तर खुलासा केलेला आहे.

निम्नस्तरीय माहिती अधिकाऱ्यांनी नियमांचे पालन केले नसेल, अथवा अपूर्ण माहिती पुरवली असेल तर अशा प्रसंगी अर्जदार राज्य अथवा केन्द्रीय माहिती आयुक्त/आयोग यांच्याकडे दाद (Appeal) मागू शकतो. दाखल झालेल्या अपील प्रकरणाची योग्य ती शहानिशा करून निर्णय/निवाडा देणे आणि अथवा संबंधित माहिती अधिकाऱ्यास योग्य ते निर्देश देणे आणि अथवा त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करणे ही कामे राज्य आणि केन्द्रीय माहिती आयोगाच्या अधिकार कक्षेत येतात.

निम्नस्तरीय माहिती अधिकाऱ्यांकडून ठरलेल्या मुदतीत मागितलेली माहिती न मिळाल्यास आणि अथवा मिळालेली माहिती अपूर्ण किंवा असमाधानकारक वाटल्यास अर्जदारास उच्चस्तरीय मंडळाकडे दाद मागण्याचे प्रावधान माहिती अधिकार कायद्यात समाविष्ट आहे. यासंदर्भात केन्द्रीय माहिती आयोग आणि राज्य माहिती आयोग या उच्चस्तरीय मंडळांची (Appellate Authority) स्थापना, सदस्यीय मंडळ, सदस्यांची पात्रता, कार्यकाल, वयोमर्यादा, सेवाशर्ती आणि माहिती अधिकार कायद्यांन्वये त्यांना प्रदान केलेले अधिकार याचा तपशील वर दिलेला आहे.

बऱ्याचवेळा केन्द्रीय माहिती आयोग, राज्य माहिती आयोग आणि राज्यस्तरावरील माहिती आयुक्त यांच्या कार्यालयांसंबंधी अर्जदारास माहिती नसते अथवा सहजपणे उपलब्ध होत नाही, आणि ती मिळवण्यासाठी बरीच वणवण करावी लागते, हे लक्षात घेवून केन्द्रीय माहिती आयोग, राज्य माहिती आयोग, आणि आयुक्त यांच्याशी संपर्क करण्यासाठी सदर उच्चस्तरीय कार्यालयांचे पत्ते अर्जदारांच्या माहितीसाठी खाली दिलेले आहेत.

## • आयोग आणि आयुक्त यांचे कार्यालयीन पत्ते :-

केन्द्रीय माहिती आयोग आणि महाराष्ट्रराज्य माहिती आयोग आणि राज्य विभागीय आयुक्त यांच्या कार्यालयाचे पत्ते आणि संकेतस्थळे (Web Site) याचा तपशील खालीलप्रमाणे आहे :-

- **केन्द्रीय माहिती आयोग :-**

  मुख्य कार्यालय: केन्द्रीय माहिती आयोग
  ऑगस्ट क्रांती भवन, दुसरा मजला,
  भिकाजी कामा प्लेस, नवी दिल्ली-११००६६

- **केन्द्रीय माहिती आयुक्त :-**

  क्लब बिल्डिंग, ब्लॉक क्र. ४, पाचवा मजला,
  ओल्ड जे.एन.यु. कॅम्पस, नवी दिल्ली-११००६७
  (Web Site : www.cic.gov.in)

## • महाराष्ट्र राज्य माहिती आयोग- आयुक्त :-

- **मुंबई** :- मुख्य माहिती आयुक्त कार्यालय
  नवीन प्रशासकीय इमारत, १३ वा मजला,
  मॅडम कामा रोड, मंत्रालयासमोर, मुंबई- ४०००३२

- **नागपूर** :- राज्य माहिती आयुक्त कार्यालय
  रवि भवन, कक्ष क्र. १७, नागपूर

- **पुणे** :- राज्य माहिती आयुक्त कार्यालय
  नवीन प्रशासकीय इमारत, ४ था मजला,
  कौंसिल हॉल समोर, पुणे- ४११००१

- **औरंगाबाद** :- राज्य माहिती आयुक्त कार्यालय
  सुभेदारी आतिथीगृह, औरंगाबाद.

(Web Site : http://sic.maharashtra.gov.in)

८

# विनंती अर्ज : नमुना, शुल्कआकार आणि निकाली मुदत

**(Application, Format, Fees Structure & Disposal Time Limit)**

## अ) विनंती अर्ज (Application):-

१) माहिती अधिकार कायदा-२००५ अंतर्गत माहिती मिळवण्यासाठी आणि अपील करण्यासाठी अर्जदाराने करावयाच्या अर्जाचा नमुना परिशिष्ट १,२ आणि ३ मध्ये विषद केले असून ते शेवटी जोडलेले आहेत.

२) अर्जदार साध्या कागदावर विनंती अर्ज करू शकतो.

३) विनंती अर्ज हिन्दी, इंग्रजी अथवा स्थानीय कार्यालयीन भाषेत करता येतो.

४) विनंती अर्जावर अर्जदाराने आपले पूर्ण नाव आणि संपर्कासाठी संपूर्ण पत्ता देणे बंधनकारक आहे.

५) मागणी केलेल्या माहितीसाठी कोणतेही 'कारण' अथवा 'स्पष्टीकरण' देण्याचे अर्जदारावर बंधन नाही.

## ब) शुल्क आकारणी (Fees Structure):-

१) अर्जदाराने विनंती अर्जाबरोबर संबंधित संस्थेच्या हिशेब तपासनीस अधिकाऱ्याच्या (Accounts Officer) नावे रु.१०/-चा डिमांड ड्राफ्ट, बँकेचा चेक अथवा कोर्ट स्टॅम्प जोडणे बंधनकारक आहे. तथापि सोय उपलब्ध असल्यास संबंधित विभागीय खात्यात रोखीने रक्कम जमा करता येवू शकते.

२) दाखल केलेल्या अर्जाची आणि भरलेल्या शुल्काची रीतसर पोचपावती घेण्याची जबाबदारी अर्जदाराची आहे.

३) मागणी केलेल्या माहितीसाठी, कागदपत्रांसाठी जादा शुल्क भरणे आवश्यक असल्यास त्याप्रमाणे संबंधित अधिकाऱ्याने अर्जदारास लेखी आदेश देणे गरजेचे असून त्यात अधिक शुल्क मागणीचा तपशील देणे बंधनकारक आहे.

- **शुल्क आकारणीचा तपशील :-**

  - अर्जाबरोबर शुल्क आकारणी म्हणून रु. १०/- धनादेश अथवा त्या किंमतीचा कोर्ट फी स्टँप जोडावा लागतो.
  - माहिती/दस्तावेजाच्या प्रत्येक पानास (A-4 आकार) रुपये २/- (दोन) याप्रमाणे शुल्क आकारले जाते.
  - कागदपत्रे मोठ्याआकाराची असतील तर त्या आकारानुसार प्रत्येक प्रतीला लागणारी वास्तविक किंमत (Actual Cost) मिळून जी होईल ती रक्कम भरावी लागते.
  - कागदपत्रांची प्रत्यक्ष पाहणी, पडताळणी आणि टिपण घेण्यासाठी पहिल्या एक तासासाठी काहीही शुल्क नाही. तथापि त्यापुढील प्रत्येक तासास रु.५/- याप्रमाणे शुल्क आकारले जाते.
  - मागणी केलेली माहिती संगणक Diskette अथवा Floppy स्वरुपात हवी असल्यास त्याचे किमान प्रत्येकी रु.५०/- (पन्नास) या दराने शुल्क भरावे लागते.
  - कागदपत्राची छायाचित्र नक्कल (Photocopy) हवी असल्यास प्रत्येक प्रतीसाठी रू.२/- (दोन) याप्रमाणे भरणा करावा लागतो.
  - अर्जदार गरीब अथवा दारिद्र्यरेषेखाली असेल तर अशाप्रसंगी अर्जदारावर शुल्क भरण्याचे बंधन नसून सदर माहिती निःशुल्क मिळू शकते. तथापि अशाप्रसंगी निःशुल्क माहितीसाठी संबंधित अधिकाऱ्याची परवानगी/संमती अनिवार्य आहे.

### क) विनंती अर्ज निकाल देण्यासाठी ठराविक मुदत मर्यादा (Disposal Time Limit):-

कायद्यातील कलम ७ अन्वये, संबंधित माहिती अधिकाऱ्यांनी,त्यांच्याकडे दाखल झालेल्या विनंती अर्जाचा विनियोग (Disposal) करून खालील मुदतीत माहिती पुरवणे बंधनकारक आहे.

| **माहिती अधिकारी** | **निकाल मुदत मर्यादा** |
|---|---|
| • सार्वजनिक माहिती अधिकारी | : ३० दिवस |
| • सहाय्यक सार्वजनिक माहिती अधिकारी | : ३५ दिवस |
| • संबंधित माहिती अधिकाऱ्याने सदर अर्ज दुसऱ्या अधिकाऱ्याकडे वर्ग केला असेल तर (Transfer of Application) | : वर्ग केल्यापासून ३० दिवस |
| • विनंती अर्ज भ्रष्टाचार अथवा मानवाधिकारांच्या उल्लंघन संदर्भात असेल तर केन्द्रीय माहिती आयोगाच्या संमतीने उपलब्ध करून देण्याची माहिती | : ४५ दिवस |
| • मागणी केलेल्या माहितीचा कुणाच्या जीविताशी अथवा त्याच्या स्वातंत्र्याशी संबंध असल्याप्रकरणी | : ४८ तास |

*टीप: वरील ठराविक मुदतीत अर्जाचे निराकरण झाले नाही तर सदर विनंती अर्ज फेटाळला गेला आहे असे गृहित धरले जाते. तथापि अशाप्रसंगी वरिष्ठाकडे दाद मागण्याचा (Appeal) अर्जदाराचा अधिकार कायम राहतो.*

९

# विनंती अर्ज : निकाली प्रक्रिया

**(Request for obtaining Information & Disposal Process)**

माहिती अधिकार कायदा-२००५, कलम ६ अन्वये प्रत्येक भारतीय नागरिकास शासकीय आणि सार्वजनिक विभागाकडे उपलब्ध असलेली अथवा उपलब्ध होवू शकेल अशी माहिती मिळवण्यासाठी संबंधित माहिती अधिकाऱ्याकडे "विनंती अर्ज" करण्याचे प्रावधान आहे. विनंती अर्जाची दखल आणि त्याची निकाली प्रक्रिया (Disposal Process) कशाप्रकारे होते याची ढोबळ माहिती आणि कार्यपध्दती खालीलप्रमाणे आहे :-

- **विनंती अर्ज (Application) :-**

१) अर्जदाराला संबंधित माहिती अधिकाऱ्याच्या नावे हवी/उपलब्ध असलेली माहिती मिळवण्यासाठी लेखी विनंती अर्जासोबत ठराविक शुल्क भरावे लागते.

२) विनंती अर्ज इंग्रजी, हिन्दी, अथवा अधिकृत स्थानीय कार्यालयीन भाषेत करता येतो.

३) विनंती अर्जामध्ये हव्या असलेल्या माहितीचा संपूर्ण तपशील अर्जदारास नमूद करावा लागतो.

४) लेखी अर्ज करणे शक्य नसेल तर केन्द्रीय अथवा राज्यस्तरीय माहिती अधिकाऱ्याने अर्जदाराला योग्य ते मार्गदर्शन आणि सहकार्य करून त्यांच्याकडून विनंती अर्ज लिखित स्वरुपात दाखल करून घ्यावा लागतो.

५) संपर्कासाठी विनंती अर्जावर अर्जदाराला फक्त स्वतःचे पूर्ण नाव आणि पूर्ण पत्ता देणे अनिवार्य आहे.

६) मागणी केलेल्या कागदपत्रासाठी/माहितीसाठी अर्जदारास कोणतेही स्पष्टीकरण अथवा कारणे देण्याची आवश्यकता नाही.

७) अर्जदाराने मागणी केलेले दस्तावेज अथवा माहिती संबंधित विभागाकडे निश्चितपणे उपलब्ध असणे आणि अथवा इतर संबंधित विभागाकडून मिळवणे शक्य असेल तरच ती माहिती पुरवली जावू शकते अन्यथा नाही.

या संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाने **"खानापुरम गधैय्या विरुध्द कार्यकारी अधिकारी"** (2010) 2SCC1) प्रकरणी दिलेला महत्वाचा निर्देश लक्षात ठेवणे गरजेचे आहे :-

> **"अर्जदाराने मागणी केलेली माहिती सार्वजनिक अधिकाऱ्याच्या कार्यालयात अस्तित्वात असणे अथवा सुलभतेने उपलब्ध होणे शक्य असणे अनिवार्य आहे."** [1]

- **विनंती अर्ज : निकाली प्रक्रिया (Disposal Process) :-**

१) विनंती अर्ज दाखल झाल्यानंतर संबंधित माहिती अधिकाऱ्याने कोणत्याही परिस्थितीत ३०(तीस) दिवसाचे आत अर्जावर निकाल (Disposal) देणे अपरिहार्य आहे. तथापि अर्जाचे निराकरण करताना काही विशिष्टप्रकरणी कायद्यातील कलम ८ आणि ९ मधील प्रावधानास अनुसरून अर्ज फेटाळण्याचा सदर माहिती अधिकाऱ्यास अधिकार आहे.

२) मागणी केलेल्या माहितीचा कुणाच्या जीविताशी अथवा त्याच्या व्यक्तीस्वातंत्र्याशी संबंध असल्यास अशी माहिती ४८ तासाच्या आत देण्याचे सदर माहिती अधिकाऱ्यावर बंधन आहे.

३) ठराविक मुदतीत, केन्द्रीय अथवा राज्य माहिती अधिकाऱ्याने विनंती अर्जावर निर्णय घेतला नाही तर सदर अर्ज फेटाळला गेला आहे असे गृहित धरले जाते.

४) माहिती तथा कागदपत्रे देण्यासाठी जादा शुल्काची आवश्यकता वाटल्यास अर्जदाराकडे जादा शुल्क भरणा करण्यासाठी लेखी मागणी केली जाते, आणि त्यासाठी जादा शुल्क आकारणीचा तपशील देणे बंधनकारक आहे.

अशावेळी शुल्काची मागणी आणि भरणा या दरम्यानचा काळ ठराविक मुदतीतून वगळला जातो. जादा शुल्काची मागणी अवास्तव वाटल्यास अर्जदारास त्या संबंधी वरिष्ठाकडे दाद मागण्याचा अधिकार आहे.

५) अर्जदार निकाल-निराकरण प्रक्रिया समजून घेण्यास असमर्थ असला तर अशाप्रसंगी संबंधित अधिकाऱ्यांनी त्यास आवश्यक ते मार्गदर्शन आणि सहकार्य करण्याचे बंधन आहे.

६) छापील अथवा तत्सम प्रकारची माहिती हवी असल्यास अर्जदाराला त्यासाठी ठरवलेल्या दराने शुल्क भरावे लागते.

७) अर्जदार गरीब अथवा दारिद्र्यरेषेखाली असून शुल्क भरण्यास असमर्थ असल्याप्रसंगी योग्य पडताळणी करून शुल्क माफ करण्याचा अधिकार संबंधित अधिकाऱ्यास आहे.

८) मागणी कागदपत्रे ठराविक मुदतीत माहिती अधिकाऱ्याकडून उपलब्ध करून न दिल्यास अर्जदारास सदर कागदपत्रे व माहिती निःशुल्क मिळवण्याचा अधिकार आहे.

९) अर्ज फेटाळला गेला तर संबंधित अधिकाऱ्यांने सदर अर्जदारास, अर्ज फेटाळण्याची कारणे कळवणे बंधनकारक आहे. त्याचबरोबर अर्जदारास अपील करण्यासाठी विशिष्ट कालावधी आणि कुणाकडे अपील करावे याची माहिती देणे बंधनकारक आहे.

१०) अर्जदारास हवी असलेली माहिती, कुणा तिऱ्हाईताकडून विश्वासाने मिळवलेल्या गुप्त माहितीवर आधारित असेल तर ती प्रगट करावी की नाही अथवा उपलब्ध करून द्यावी अथवा नाही याचे अधिकार उच्च माहिती अधिकाऱ्यांना प्राप्त आहेत.

---

1. "The Information saught must be in existance and accessable to the Public Authority." (***Khanapurum Gadhayya v/s Executive Authority (2010) 2 SCC 1***)

## १०

# दाद मागण्याचा अधिकार, निकाल आणि दंडाचे प्रावधान

**(Right to appeal, Disposal of appeal and Provision of Penalties)**

माहिती अधिकार कायदा-२००५, कलम १९ अन्वये अर्जदाराने मागणी केलेली माहिती ठराविक मुदतीत मिळाली नाही अथवा माहिती अधिकाऱ्यांकडून मिळालेली माहिती समाधानकारक वाटत नसल्यास अर्जदारास वरिष्ठ माहिती सुनवाई अधिकाऱ्याकडे-आयोगाकडे दाद मागण्याचा (Appeal) अधिकार आहे.

### १) प्रथम दाद- अपील (First Appeal):-

वर विशद केल्याप्रमाणे अर्जदारास वरिष्ठ/केन्द्रीय माहिती सुनवाई अधिकाऱ्याकडे (First Appellate Authority) प्रथम दाद मागता येते. ठराविक मुदतीत माहिती न मिळाल्यास अथवा दिलेली माहिती असमाधानकारक वाटल्यास, अशाप्रसंगी अर्जदारास सदर प्रकरणी ३० (तीस) दिवसाच्या आत संबंधित वरिष्ठ माहिती सुनवाई अधिकाऱ्याकडे दाद अर्ज दाखल करावा लागतो. दाद अर्जासोबत सर्व संबंधित कागदपत्रे, निवाडे आणि दिल्या गेलेल्या माहितीच्या सत्यप्रती जोडणे आवश्यक असते.

दाद अर्ज दाखल झाल्यानंतर वरिष्ठ सुनवाई माहिती अधिकाऱ्यावर, संबंधित पक्षांचे म्हणणे ऐकून घेवून, कागदपत्रांची योग्य ती शहानिशा करून ४५ (पंचेचाळीस) दिवसाच्या आत निकाल/निवाडा देणे बंधनकारक आहे.

### २) द्वितीय दाद-अपील (Second Appeal) :-

'प्रथम दाद' प्रकरणी संबंधित सुनवाई अधिकाऱ्याने वरील मुदतीत (४५ दिवस) निकाल/निवाडा दिला नाही, अथवा दिलेला निकाल/निवाडा असमाधानकारक वाटत असल्याप्रसंगी अर्जदारास केन्द्रीय माहिती आयोगाकडे पुनश्च दाद (Second Appeal) मागण्याचा अधिकार आहे. तथापि अशाप्रसंगी प्रथम अपीलाचा निवाडा मिळाल्यापासून ९० (नव्वद) दिवसाच्या आत द्वितीय अपील

करणे अर्जदारावर बंधनकारक आहे. द्वितीय दाद अर्ज दाखल करताना अर्जदारास सदर दाद अर्जात खालील गोष्टींची पूर्तता करणे आणि त्यासोबत खालील कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे :-

१) अर्जदाराचे पूर्ण नाव आणि संपूर्ण पत्ता इ.

२) ज्यांच्याकडे दाद मागावयाची आहे त्या केन्द्रीय माहिती आयुक्त /आयोग/अधिकाऱ्याचे नाव आणि कार्यालयीन पत्ता.

३) मिळालेल्या प्रथम निवाड्याची/निकालाची (जावक क्रमांकासह) प्रमाणित प्रत.

४) द्वितीय दाद प्रकरणी विषयाची माहिती, खरी वस्तुस्थिती आणि द्वितीय दाद मागण्याची कारणे याचे निवेदन.

५) द्वितीय दाद अर्ज हा पहिल्या निकाल/निवाडयाविरुध्द असेल तर त्यासंदर्भात अर्जदाराने केलेला प्रथम अर्ज (आवक-जावक क्रमांकासह), आणि त्या संदर्भात प्रथम दाद अर्जाची सुनवणी केलेल्या अधिकाऱ्याचे नाव, पत्ता इत्यादी तपशील.

६) अर्जदाराकडून पडताळणी केलेली कागदपत्रे/दस्तावेज याच्या सत्यप्रती.

७) त्या व्यतिरिक्त आयोगाला निवाडा देण्यासाठी आवश्यक वाटतील अशी इतर माहिती अथवा कागदपत्रे इ.

८) दिलासा-दाद प्रकरणी अर्जदाराने मांडावयाची भूमिका आणि त्याची कारणमीमांसा.

९) अर्जदारास नेमका कोणत्याप्रकारचा दिलासा (Relief) अपेक्षित आहे त्याचे विवरण आणि तत्संबंधी केलेली याचना (Prayer) याचा तपशील.

*टीप : द्वितीय दाद अर्ज दाखल करताना अर्जासोबत जोडावयाच्या सर्व संबंधित कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती, आणि ज्या मुद्यावर दाद मागितली आहे त्यासंबंधीची सर्व कादगपत्रे, दस्तावेज आणि जोडलेल्या कागदपत्रांची अनुक्रमणिका (Index) जोडणे अर्जदारावर बंधनकारक आहे.*

## • दाद अर्ज : केन्द्रीय माहिती आयोगाची निकाल प्रक्रिया

**(Disposal of appeal by Central Information Commission)**

सर्वप्रथम केन्द्रीय राज्यस्तरीय माहिती आयोगाकडून प्रथम अपीलाची सर्व कागदपत्रे आणि दिलेल्या निवाड्याची छाननी, पडताळणी केली जाते. त्यानंतर आयोगास संबंधित पक्षकारांचे म्हणणे परत ऐकण्याची इच्छा असेल तर त्याप्रमाणे सुनवाईस हजर राहण्यासाठी संबंधित पक्षकारांना नोटीस पाठवली जाते. त्यात सुनवाईची तारीख, वेळ आणि ठिकाणाची माहिती पुरवली जाते. अशा सुनवाई प्रसंगी अर्जदार/तक्रारदार स्वतः अथवा त्याच्या वतीने त्याचा प्रतिनिधी उपस्थित राहू शकतो. अर्जदाराने हजर राहिलेच पाहिजे अशी सक्ती नसते. सर्व प्रक्रिया पार पडल्यावर केन्द्रीय/राज्यस्तरीय माहिती अधिकाऱ्याकडून अंतिम निवाडा दिला जातो.

## • तक्रार/अपील प्रकरणी दंडाची तरतूद

**(Provisions of Penalties):-**

माहिती अधिकार कायदा - २००५, कलम २० अन्वये केन्द्रीय अथवा राज्य माहिती आयोगाला दंड करण्याचे अधिकार आहेत. दाद अर्जावर निकाल/निवाडा देण्यापूर्वी आयोगाच्या निदर्शनास आले असेल की 'यापूर्वी संबंधित माहिती अधिकाऱ्यांनी विनंती अर्जाचा विनियोग करताना, ठराविक मुदतीची मर्यादा पाळली नाही अथवा हेतूपुरस्सर अर्ज फेटाळला असेल किंवा पुरवलेली माहिती अपूर्ण/दिशाभूल करणारी आहे' तर अशा प्रसंगी संबंधित माहिती अधिकाऱ्याला मुदतीच्या कालमर्यादेतील प्रत्येक दिवसासाठी रू. २५०/- याप्रमाणे दंड ठोठावला जावू शकतो. तथापि दंडाची कमाल मर्यादा रु २५०००/- पेक्षा जास्त नसते. गंभीर प्रसंगी दंडाव्यतिरिक्त संबंधित अधिकाऱ्याविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्यासाठी संबंधित विभागाला/कार्यालयाला आयोगाकडून शिफारस केली जावू शकते.

## ११

# संवेदनशील माहिती : प्रगटीकरणास नकार

## (Exemption from Disclosure of Information)

कोणताही कायदा अंतिम, अमर्याद, अथवा निरंकुश असू शकत नाही. त्याच न्यायाने "माहिती अधिकार कायदा - २००५" त्यास अपवाद असू शकत नाही हे लक्षात ठेवले पाहिजे. कालमानानुसार जसे इतर कायद्यात बदल होतात तसे या कायद्यातही पुढील काळात गरजेपोटी सुधारणा-बदल होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

प्रत्येक कायद्याच्या चौकटीत राहून अंमलबजावणी करण्यासाठी काही नियम असे असतात की ज्यांचा संबंध देशाच्या अखंडत्वाशी आणि स्वातंत्र्याशी निगडित असतो. अशावेळी देशाच्या सार्वभौमत्वासाठी काही माहिती 'गुप्त ठेवणे' भाग असल्याने त्याचे प्रगटीकरण करता येत नाही. याच धर्तीवर काही विशिष्ट प्रकरणी संवेदनशील माहिती नाकारण्याचे प्रावधान या कायद्यातसुध्दा आहे.

देशाची अस्मिता, सुरक्षा, अखंडता आणि स्वातंत्र्य टिकवून ठेवणे ही सरकारची आणि पर्यायाने नागरिकांची नैतिक जबाबदारी असते. हा अमोल ठेवा जतन करण्यासाठी योजिलेल्या काही खास शासकीय व्यवस्था आणि दस्तावेजांची गुप्तता राखणे अनिवार्य असते. त्यामुळे त्यासंबंधीची संवेदनशील माहिती प्रगट करणे कोणत्याही सरकारला शक्य नसते. सबब माहिती अधिकार कायदा-२००५ च्या कक्षेतून अशा महत्वपूर्ण व्यवस्थांना वगळण्यात आले आहे; व त्यासंबंधी कायद्यात विशेष तरतूद केली गेली आहे.

माहिती अधिकार कायद्याच्या कलम ८ आणि ९ व परिशिष्ट-पुरवणी क्रमांक २ (The Second Schedule) अन्वये, काही खास संवेदनशील माहिती प्रकरणी शासनास अथवा सार्वजनिक माहिती अधिकाऱ्यास **स्पष्टीकरण अथवा माहिती न देण्याचे-पुरवण्याचे अधिकार प्राप्त आहेत.** माहिती अधिकार कायदा-२००५ च्या कृतिकक्षेतून वगळण्यात आलेल्या व्यवस्था खालीलप्रमाणे आहेत.

- **खालील महत्वपूर्ण आणि खास प्रकरणी माहिती अधिकार कायदा वापरता येत नाही :-**

१) देशाचे सार्वभौमत्व, स्वातंत्र्य आणि सुरक्षा,

२) राष्ट्रीय संरक्षणव्यवस्था, शस्त्रसंशोधन आणि देशाचे आर्थिक हितसंबंध,

३) राष्ट्रसंरक्षणार्थ केली जाणारी लष्करी कारवाई, लष्कराचे डावपेच, लष्करी आघाडी, इत्यादी,

४) आंतरराष्ट्रीय संबंध,सलोखा, आणि परदेशीय सरकारकडून विश्वासाने मिळवलेली/ मिळालेली संवेदनशील माहिती आणि अथवा त्यासंदर्भात पाळावयाची शासकीय गुप्तता,

५) सामाजिक अन्याय, अत्याचार, अपराध, तथा गुन्हे रोखण्यासाठी, त्याला आळा घालण्यासाठी केलेले कायदे आणि अंमलबजावणी, गुन्ह्याला उत्तेजन-चिथावणी मिळू नये म्हणून घेतलेले निर्णय आणि होणारे प्रयत्न.

६) गुन्हेगाराने केलेल्या गुन्ह्याची छाननी, तपास, अटक आणि खटला या प्रक्रियेस बाधा पोहचू शकेल अशी गुप्त माहिती दस्तावेज, इत्यादी,

७) त्रयस्थाकडून विश्वासाने मिळालेली/ मिळवलेली खास माहिती आणि कटाक्षाने पाळावयाची गुप्तता,

८) संसद आणि राज्यसरकार विधिमंडळाच्या विषेशाधिकाराचा भंग अथवा उल्लंघन होईल असे प्रगटीकरण तसेच संसदेतील कामकाज, चर्चा, विचारविनिमय, त्या संबंधातील अहवाल, व त्याचबरोबर मंत्री आणि त्यांचे सचिव यांच्यातील विचारविनिमय अथवा तत्संबंधी अहवाल, इत्यादी,

९) व्यावसाईक विषेशाधिकार (Professional Privilage),

१०) समाजामध्ये विद्वेष वाढून जनसामान्यांची शांतता धोक्यात येवू शकेल अशा माहितीचे प्रगटीकरण,

११) कोणत्याही न्यायालयाने, खंडपीठाने अथवा आयोगाने निःसंदिग्धपणे मनाई केलेली, निषिध्द ठरवलेली माहिती अथवा दस्तावेज,

१२) सार्वजनिक हिताच्यादृष्टीने व्यापारी देवाणघेवाण आणि विश्वासार्हता, व्यावसाईक गुप्तता अथवा बौध्दीक गुणवत्ता यास बाधा पोचून संबंधित प्रतिष्ठानाची सक्षमता धोक्यात येवू शकेल अशी गुप्त माहिती.

*टीप : कलम ११ अन्वये त्रयस्थाकडून विश्वासाने मिळालेली गुप्त माहिती सदर त्रयस्थास नोटीस पाठवून त्याची लेखी अथवा तोंडी संमती मिळाल्यास ती पुरवण्याचा केन्द्रीय आणि राज्य माहिती अधिकाऱ्यास अधिकार आहे.*

- **माहिती अधिकार कलम २४ आणि परिशिष्ट २ अन्वये केन्द्र शासनाने नियुक्त केलेल्या खालील शासकीय सुरक्षासंघटना आणि राष्ट्रीय हेरसंस्थांना माहिती अधिकार कायद्याच्या कक्षेतून वगळण्यात आलेले आहे :-**

१) गुप्तहेर संघटना (Intelligence Bureau).

२) केन्द्रीय/राज्यस्तरीय मंत्रीमंडळाचा संशोधन आणि निरीक्षण विभाग. (Research and Analysis Wing of Cabinet Secretariate).

३) केन्द्रीय महसूल विभाग गुप्तचर संघटना/ मंडळ (Directorate of Revenue Intelligence).

४) केन्द्रीय वित्त विभाग गुप्तचर संघटना /मंडळ (Central Economic Intelligence Bureau).

५) अंमलबजावणी विभाग-संचालक मंडळ (Directorate of Enforcement).

६) मादक पदार्थाचा वापर-संग्रह नियंत्रण संघटना (Narcotic Control Bureau).

७) वायुसेना संशोधन केन्द्र (Aviation Research Centre).

८) सरहद्दीवर तैनात खास सेना/लष्कर (Special Frontier Force).

९) सरहद्द/सीमा सुरक्षा दल (Border Security Force) .

१०) केन्द्रीय पोलिसांचे राखीव दल (Central Reserve Police Force) .

११) भारत-तिबेट सीमा पोलीस दल (Indo-Tibetan Border Police).

१२) केन्द्रीय औद्योगिक सुरक्षा दल (Central Industrial Security Force).

१३) राष्ट्रीय सुरक्षा रक्षक दल (National Security Guards).

१४) आसाम रायफल्स (Assam rifles).

१५) शस्त्र सीमा बल (Shastra Seema Bal).

१६) प्रमुख संचालक-केन्द्रीय आयकर विभाग (अन्वेषण) (Directorate General of Income Tax (Investigation)).

१७) राष्ट्रीय तांत्रिक संशोधन मंडळ/संस्था (National Technical Research Oraganisation).

१८) भारतीय आर्थिक गुप्तहेर स्वयंपूर्ण गट (Financial Intelligence Unit-India).

१९) खास सुरक्षा दल (Special Protection Group).

२०) संरक्षण (लष्कर) संशोधन आणि विकास मंडळ (Defense Research and Development Oraganisation).

२१) सरहद्द रस्ते विकास मंडळ (Border Road Development Board).

२२) राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार मंडळ (National Security Council Secretariate).

*टीप: वरील संस्था राष्ट्रीय हिताच्या आणि सार्वभौमत्वाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाच्या असल्यामुळे त्यांना माहिती अधिकार कायद्याच्या कक्षेतून वगळण्यात आलेले आहे. तथापि त्या संस्थेत काम करणारे कर्मचारी/अधिकारी यांच्या विरुध्द भ्रष्टाचार अथवा मानवाधिकार उल्लंघन प्रकरणी, केन्द्रीय प्रमुख माहिती अधिकाऱ्याच्या-आयोगाच्या संमतीने संबंधित कागदपत्रे उपलब्ध होवू शकतात.*

# १२

# माहिती अधिकार कायदा : इतर प्रावधाने

**(RTI : Other Provisions)**

## माहिती अधिकार कायदा - २००५ : इतर प्रावधाने

१) **कलम २१** अन्वये, कुणा व्यक्तीने (अर्जदार अथवा अधिकारी) प्रामाणिक आणि शुध्द हेतूने विनंती अर्ज केलेला असेल अथवा त्यावर निवाडा दिला असेल अशा प्रकरणी त्यांच्या प्रामाणिकपणाची खातरजमा करून झाल्यास त्यांच्या विरुध्द कोणताही दावा, अथवा खटला दाखल करणे, चालवणे किंवा कोणत्याही प्रकारची न्यायालयीन कारवाई करण्याचे प्रावधान या कायद्यात समाविष्ट नाही. अशावेळी प्रामाणिक व शुध्द हेतूने केलेल्या कारवाईसाठी संबंधित व्यक्तीला संरक्षण (Protection of action taken in goodfaith) देणे याचे प्रावधान मात्र या कायद्यात अंतर्भूत आहे.

२) **कलम २२** अन्वये या माहिती अधिकार कायद्यास इतर कोणत्याही तत्सम कायद्यातील प्रावधाने लागू होत नाहीत; अथवा त्यामुळे त्याचे कायदेशीर महत्व कमी होत नाही.

३) **कलम २३** अन्वये, केन्द्रीय वरिष्ठ माहिती अधिकारी अथवा आयोग वगळता माहिती अधिकार प्रकरणी इतर कोणत्याही न्यायालयास वेगळी सुनावणी करण्याचा अधिकार नाही.

४) **कलम २४** अन्वये, केन्द्रीय शासनाने देशाचे सार्वभौमत्व आणि सुरक्षेसाठी स्थापन केलेल्या विशेष व्यवस्था उदाहरणार्थ गुप्तहेरखाते अथवा तत्सम सुरक्षा यंत्रणा यांच्याविषयी कलम ८ आणि ९ व परिरीष्ट क्रमांक २ मध्ये अंतर्भूत केलेल्या प्रावधानास अनुसरून त्यासंबंधी माहिती प्रगट न करण्याचा अथवा मागणी नाकारण्याचा अधिकार या कायद्यात समाविष्ट आहे.

५) **कलम २५** अन्वये, केन्द्रीय आयोग आणि राज्य माहिती आयोगाने प्रत्येक वर्षाखेरीस माहिती अधिकार कायद्याच्या अंमलबजावणीचा संपूर्ण अहवाल तयार करणे आणि त्याची एक प्रत संबंधित राज्य विधिमंडळ आणि केंद्र सरकार लोकसभेपुढे ठेवण्यासाठी पाठवणे अनिवार्य आहे.

६) **कलम २७** अन्वये, कार्यालयीन खर्च, शुल्क आकारणी, कर्मचाऱ्यांचे पगार, सेवाशर्ती यात वेळोवेळी योग्य ते बदल करण्याचे अधिकार संदर्भित राज्यशासनाला असून त्यासाठी योग्यत्या शासकीय प्रक्रिया-नियम पाळणे आणि अशा प्रस्तावित बदलास जनतेच्या माहितीसाठी शासकीय राजपत्रात प्रसिध्दी देणे बंधनकारक आहे.

७) **कलम ३०** अन्वये, माहिती अधिकार कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी काही अडचणी निर्माण होत असल्याचे निदर्शनास आल्यास सदर अडचणींच्या निराकरणासाठी केन्द्र सरकारला आवश्यक त्या शासकीय प्रक्रिया आणि नियम पाळून त्यात योग्य ते बदल करण्याचे अधिकार प्राप्त आहेत.

*टीप : वरील यादी स्पष्टीकरणात्मक असून मूळ कायद्यातील प्रावधानेच नेहमी अंतिम म्हणून ग्राह्य धरले जातात हे लक्षात ठेवणे गरजेचे आहे.*

# १३

# माहिती अधिकार कायदा : प्रभाव, वस्तुस्थिती आणि गैरवापर

## (Impact, Ground Realities & Misuse of RTI)

### • प्रभाव (Impact of RTI):-

तमाम भारतीय नागरिकांना, मुख्यतः अशिक्षित, गोरगरीब, उपेक्षित तथा समाजातील दुर्बल घटकांना माहिती अधिकार-२००५ च्या रुपाने एक प्रभावी शस्त्र मिळालेले आहे यात वाद नाही. गेली कित्येक दशके शासकीय, निमशासकीय आणि सार्वजनिक प्रतिष्ठान यांच्याकडून इच्छित माहिती मिळवणे जवळपास अशक्यप्राय होते. त्यामुळे त्यांच्या जुलुमांविरुध्द, कृष्णकृत्यांविरुध्द हातात कुठलाही अधिकृत पुरावा नसल्याने सामान्यजनांना सहजासहजी न्याय मिळत नव्हता हे विधान वावगे ठरू नये.

२००५ साली माहिती अधिकार कायदा अस्तित्वात येवून त्याची १२ ऑक्टोबर २००५ पासून अंमलबजावणी सुरू झाली, तेव्हापासून आजतागायत जनसामान्यांना हळूहळू माहिती अधिकाराच्या प्रभावाची आणि इच्छित परिणामांची जाणीव होत आहे. या अधिकाराचा वापर केल्याने दैनंदिन जीवनामध्ये नेहमी त्रासदायक ठरणारे पाणी पुरवठा, वीज पुरवठा, रस्ते बांधणी, दुरुस्ती, नागरी सोईसुविधा इत्यादी यक्षप्रश्न व समस्या सोडवण्यासाठी फार मोठी मदत झाली आहे. कधी नव्हे तो नागरी समस्यांना तोंड फुटून संबंधित प्रतिष्ठानांची कोंडी होवू लागली आहे. परिणामी हे प्रश्न त्वरित सुटण्यास मदत झाली आणि यापुढेही होत राहील. दूरदर्शन आणि वृत्तपत्रमाध्यमांनी अशा प्रश्नांना योग्य ती प्रसिध्दी देवून जनमानसातील आग धगधगती ठेवल्याने संबंधित अधिकारी अडचणीत येवू लागले आहेत. परिणामी आपल्यावर शिस्तभंगाची कारवाई होईल या भीतीपोटी अधिकाऱ्यांच्या मुजोरवृत्तीला काही अंशी का होईना लगाम बसतो आहे, हे या कायद्याचे यश आणि प्रभाव आहे असे समजण्यास हरकत नसावी.

## • वस्तुस्थिती (Ground Realities of RTI) :-

भारतात आजमितीला सर्वक्षेत्रात लागू असलेले कायदे जनहिताच्यादृष्टीने समर्पक आहेत यात दुमत नसावे. तथापि कोणत्याही कायद्याच्या कठोर आणि काटेकोर अंमलबजावणीवरच त्याचे यशापयश अवलंबून असते. भारतासारखा खंडप्राय देश, अफाट लोकसंख्या, फार मोठ्या प्रमाणात असलेली निरक्षरता, समाजातील धार्मिक रुढी-रिवाज, कमालीचे औदासिन्य, सोशिकता आणि अंधश्रध्दा या व अशा अनेक कारणांमुळे कायद्याची अंमलबजावणी परिणामकारकपणे होताना दिसून येत नाही ही वस्तुस्थिती नाकारून चालणार नाही.

समाजात सर्वथरावर वैय्यक्तिक आणि सामाजिक बांधिलकी, निष्ठा, समर्पणाची भावना, सक्रीय सहभाग आणि प्रामाणिकता असेल तरच कोणत्याही कायद्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे सुलभ होते. अशावेळी एक लक्षात ठेवले पाहिजे की कोणताही कायदा अंतिम अथवा अमर्याद असू शकत नाही. कालमानपरत्वे त्यात बदल होतात/करावे लागतात आणि हाच नियम माहिती अधिकार कायदा-२००५ ला पण लागू होतो. कोणत्याही कारणांमुळे अंमलबजावणीवर मर्यादा आल्या की कायद्याची धार बोथट होते. परिणामी त्याचा गैरवापर होवू शकतो हे आपण पाहत आहोतच.

बऱ्याचवेळा केन्द्रीय अथवा राज्यस्तरावर माहिती अधिकारी/आयुक्त ठराविक कालमर्यादेत अर्जाचा विनियोग तथा निवाडा/निकाल देवू शकत नाहीत असे निदर्शनास आले आहे. अशावेळी फक्त अधिकाऱ्यांनाच दोष देवून चालत नाही. त्यासाठी खरी वस्तुस्थिती जाणून घेणेही तितकेच महत्वाचे ठरते. त्याचबरोबर कुणीही कायद्याचा दुरुपयोग करू नये, त्याचा कुणाला छळण्यासाठी शस्त्र म्हणून वापर करू नये यासाठी संबंधितांना वेळोवेळी खबरदारी घ्यावी लागते. अंमलबजावणी काटेकोरपणे होवू शकत नसेल, त्यात काही त्रुटी राहिल्या असतील तर अशावेळी न्यायव्यवस्थेला हस्तक्षेप करणे भाग पडते..

डोंबिवलीतील ज्येष्ठ माहिती अधिकार कार्यकर्ते श्री. **विजय गोखले** यांना **माहिती अधिकार कायदा** अंमलबाजावणी संदर्भात, केन्द्रीय माहिती आयोगाने पुरवलेली, गेल्या पाच वर्षातील आकडेवारी फारशी समाधानकारक नाही. वाचकांच्या माहितीसाठी या आकडेवारीचा महत्वपूर्ण तपशील खालीलप्रमाणे आहे :-

- २००६ ते २०११ पर्यंत दाखल तक्रारी : ९४२०९
- तक्रारींची दखल अणि विनियोग प्रकरणे : ७५२८४
- अधिकाऱ्यांवर दंडात्मक कारवाई प्रकरणे : ६४८
- नुकसान भरपाई मिळालेली प्रकरणे : १३४
- अधिकाऱ्यांवर शिस्तभंग कारवाई प्रकरणे : २२

वरील आकडेवारी फारशी समाधानकारक नसली तरी मोठ्याप्रमाणात परिणामकारक आहे हे मान्य करावेच लागेल. तथापि हे चित्र बदलण्यासाठी, संबंधित अधिकाऱ्यांवर सतत अंकूश ठेवणे, त्यांना ठराविक मुदतीत निवाडे, माहिती देण्यास भाग पाडणे यासाठी जनमताचा रेटा आणि दबाव कायम ठेवणे अनिवार्य आहे, आणि हे काम सामाजिक संस्था आणि माहिती अधिकार कार्यकर्ते मोठ्या तडफेने करत आहेत ही अत्यंत समाधानाची गोष्ट आहे.

## • माहिती अधिकार : गैरवापर-दुरुपयोग (Misuse of RTI) :-

सार्वजनिक जीवन सुसह्य होण्यासाठी प्रशासनात पारदर्शकता आणि जबाबदारीची जाणीव असणे अत्यंत गरजेचे आहे. प्रशासनावर अंकुश ठेवण्यासाठी भारतीय नागरिकांना माहिती अधिकार कायदा-२००५ च्या रूपाने एक प्रभावी शस्त्र उपलब्ध झाले आहे यात शंका नाही. या कायद्याचा एकूण प्रभाव आणि वस्तुस्थितीचे वर्णन यापूर्वी आलेले आहेच.

कोणत्याही महत्वपूर्ण आणि लोकप्रिय कायद्याचे जेवढे फायदे मिळतात तेवढ्याच प्रमाणात त्याचा गैरवापर होताना पण दिसून येतो ही वस्तुस्थिती आहे. माहिती अधिकार कायदा-२००५ हा सुध्दा यासंदर्भात अपवाद आहे असे म्हणता येणार नाही. स्वतःच्या स्वार्थासाठी कोणत्याही कायद्याचे उल्लंघन करणे अथवा त्याचा गैरवापर करणे ही सामाजिक गैरप्रवृत्ती अजूनही कमी होताना दिसत नाही. खरेतर हाच चिंतेचा मुख्य विषय आहे.

बऱ्याचवेळा स्वतःच्या वैय्यक्तिक फायद्यासाठी आणि स्वार्थापोटी या कायद्याचा सर्रास गैरवापर होताना दिसून येत आहे. त्यामुळे प्रत्येक जनसंपर्क कार्यालयात माहिती अधिकारासाठी दाखल होणाऱ्या अर्जांचे प्रमाण दिवसेंदिवस विराट रूप धारण करीत आहे. ३० ते ९० दिवसाच्या ठराविक मुदतीच्या आत माहिती पुरवणे कायद्याने बंधनकारक असल्यामुळे कार्यालयीन कर्मचाऱ्यांचा ७५%हून

अधिक कार्यालयीन वेळ या कामी खर्च होत असल्याने सदर कर्मचाऱ्यांना त्यांची नेहमीची कामे करण्यास पुरेसा वेळ मिळत नाही. परिणामी इतर कामे खोळंबून राहतात आणि जनतेची अपरिहार्यपणे गैरसोय होते असे या घडीचे सर्वसाधारण चित्र आहे. अशावेळी कायद्याची काटेकोर अंमलबजावणी होण्यासाठी, त्याचे फायदे मिळवण्यासाठी नागरिकांच्या प्रामाणिक आणि सक्रिय सहकार्याचीसुध्दा तितकीच आवश्यकता असते हे लक्षात ठेवले पाहिजे. कोणत्याही कायद्याचे नियम शासनाबरोबर नागरिकांनाही लागू असतात. त्यामुळे वैय्यक्तिक स्वार्थापोटी उठसूठ माहिती अधिकाराचा वापर करताना आपल्या जबाबदाऱ्या आणि कर्तव्याची जाण ठेवणे तितकेच महत्वाचे आहे. स्वार्थीवृत्तीमुळे माहिती अधिकार कायद्याचा गैरवापर होण्यासाठी आपण स्वतःहून त्यास खतपाणी तर घालत नाहीत ना? याचे भान ठेवणे एक जबाबदार नागरिक म्हणून प्रत्येकाचे कर्तव्य आहे.

सध्या समाजातील बराच मोठा वर्ग (सुशिक्षित-अशिक्षित) आपला वैय्यक्तिक फायदा, कौटुंबिक समस्या, घटस्फोट, पोटगी आणि राजकीय स्वार्थासाठी या कायद्याचा सर्रास गैरवापर करीत असल्याचे दिसत आहे असे मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निदर्शनास आले असून मा. सर्वोच्च न्यायालयाने अशा गैरप्रवृत्तीची फार गंभीर दखल घेतली आहे. या संदर्भात **"सेंट्रल बोर्ड ऑफ सेकंडरी एज्युकेशन ॲण्ड अनदर विरुध्द आदित्य बंडोपाध्याय आणि इतर"** (2011) 8 SCC 497 या प्रकरणी मा. सर्वोच्च न्यायालयाचे **मा.न्या.श्री. आर. व्ही. रविन्द्रन** आणि **मा.न्या.श्री. एस.के. पटनाईक** यांच्या खंडपीठाने केलेले जळजळीत भाष्य महत्वाचे ठरावे:-

> **"माहिती अधिकार कायदा हा सरकारी अथवा सार्वजनिक अधिकाऱ्यांना निष्कारण छळण्याचे साधन नाही. आपल्या क्षुल्लक मागणीसाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांना वेठीला धरणे आणि त्यांच्या कार्यालयीन वेळेचा अपव्यय करणे केव्हाही समर्थनीय ठरत नाही. अशा गैरप्रवृत्तीमुळे माहिती अधिकाराचा वारंवार दुरुपयोग झाल्यास प्रशासन व्यवस्थेची कार्यक्षमता धोक्यात येवू शकते हे सर्वांनी समजून घेतले पाहिजे."** [1]

"देशाची एकात्मता, राष्ट्रीय विकास आणि सामान्य नागरिकातील एकोपा-ऐक्य, शांतता आणि स्थिरता यास हानी पोचवण्यासाठी माहिती अधिकार कायद्याचा साधन म्हणून (गैर)वापर करणे केव्हाही समर्थनीय होत नाही." [2]

"माहिती अधिकार कायद्याच्या कलम ८ मध्ये प्रतिबंधित केलेली माहिती नाकारणे म्हणजे आपल्या न्याय हक्कांची पायमल्ली आहे असे कुणीही समजण्याचे कारण नाही. खरेतर ती लोकशाहीमूल्यांच्या रक्षणासाठी कायद्यात केलेली खास तरतूद आहे याचे भान माहिती अधिकाराचा वापर करणाऱ्या प्रत्येक अर्जदाराने ठेवणे आवश्यक आहे." [3]

"अनेकदा जनसंपर्क माहिती अधिकारी अति उत्साहापोटी स्वयंस्फूर्तीने नागरिकांना माहिती अधिकार कायद्याविषयी मार्गदर्शन, स्वतःचे मत आणि सल्ला देतात असे निदर्शनास आले आहे. तथापि अशावेळी तो त्यांचा वैय्यक्तिक दृष्टीकोन मानला पाहिजे. माहिती अधिकार कायद्यातील प्रावधानाप्रमाणे कोणत्याही माहिती अधिकाऱ्याचे वैय्यक्तिक मत हे कायद्यानुसार त्यांचे कर्तव्य अथवा जबाबदारी ठरू शकत नाही." [4]

वरील विवेचनावरून एक गोष्ट लक्षात येईल की माहिती अधिकार गैरवापर प्रकरणी उच्च न्यायालयाने कठोर भूमिका घेतली असून संबंधितांवर वेळच्यावेळी योग्य ती कारावाई करण्याचे निर्देश न्यायालयांना दिलेले आहेत. परिणामी गेल्या काही वर्षात माहिती अधिकाराचा स्वतःच्या स्वार्थासाठी दुरुपयोग करणाऱ्या मतलबी अर्जदारांना दंड ठोठावून त्यांच्या याचिका फेटाळल्यागेल्याची अनेक उदाहरणे पाहावयास मिळतील.

एखादे प्रभावी शस्त्र आपल्या स्वार्थासाठी उठसूठ वापरल्यास त्याची तीव्रता आणि धार बोथट होते या कटुसत्याचा सर्व संबंधितांनी गंभीरपणे विचार करण्याची वेळ आली आहे.

---

1. "The RTI Act is not meant to be a "Tool for Oppression" of public authorities. The nation cannot afford to have the honest public officials' bogged down with all and sundry requests unrelated to corruption. It will adversely affect the efficiency of the administration."
2. "It cannot become a "Tool to obstruct the national development and integration or to destroy the peace, tranquility and harmony among its citizen."
3. "Information seekers should not consider the exemptions listed out in Section 8 of the RTI Act as" a fetter on the right to information, but as an equally important provision protecting other public interests essential for the fulfillment and preservation of democratic ideas."
4. "Many public authorities, as public relation, exercise, provide advice, guidance and opinion to the citizens. But that is purely voluntary and should not be confused with any obligation under the RTI Act."

(***Reference : Central Board of Education and another v/s Aditya Bandopadhyay and others (2011) 8 SCC 497***)

# १४

# माहिती अधिकार कायदा : सरकारचे खास परिपत्रक

## (RTI : DoPT Circular Dt. 16-09-2011)

सध्या गाजत असलेल्या 2G प्रकरणी वित्तमंत्र्यांच्या वादग्रस्त ठरलेल्या नोंदीवरून देशभरात जे वादळ उठले आहे, यावरून केन्द्र शासनाला बसलेला झटका किती जबरदस्त आहे याची एव्हाना सर्वांना कल्पना आलेली असेलच. या संदर्भात दि. ४-१०-२०११ च्या दि इंडियन एक्सप्रेस (मुंबई शहर आवृत्ती) मध्ये आलेली बातमी तितकीच महत्वाची आहे. 2G च्या धक्क्यातून सावरल्यावर केन्द्र सरकारच्या 'डिपार्टमेंट ऑफ पर्सनेल ॲण्ड ट्रेनिंग'(DoPT) यांचेकडून दि. १६-०९-२०११ ला, सर्व राज्यांना, मंत्र्यांना आणि संबंधित विभागांसाठी खास परिपत्रक (Circular) जारी करण्यात आले असून त्यात 'माहिती अधिकार कायद्यांतर्गत' माहिती पुरवताना संबंधित माहिती अधिकाऱ्यांनी त्यावर **"आपले मत, गृहितता अथवा तर्क-कयास याबद्दल टिपण्णी करू नये"** असा सज्जड दम दिला आहे.

त्या परिपत्रकात असेही म्हटले आहे की "माहिती अधिकाऱ्याने माहिती पुरवताना त्याने स्वतःहून अति उत्साहापोटी कायद्याचा अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न करू नये." त्यासाठी या परिपत्रकात **सी.बी. एस.ई. विरुध्द आदित्य बंडोपाध्याय** या प्रकरणी (2011) 8 SCC 497) मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या खालील निर्देशांचे स्मरण करून दिले आहे:-

> **"अर्जदाराने मागितलेली माहिती जर सार्वजनिक अधिकाऱ्याच्या खात्यात/विभागात उपलब्ध नसेल अथवा कोणत्याही कायद्यान्वये अशी माहिती संग्रही ठेवणे त्यांच्यावर बंधनकारक नसेल, तर अशा परिस्थितीत तशी माहिती (अन्य मार्गाने) मिळवणे, ताडून पाहणे आणि पुरवण्याचा प्रयत्न करणे ही संबंधित माहिती जनसंपर्क अधिकाऱ्याची जबाबदारी ठरू शकत नाही."** [1]

"सार्वजनिक जनसंपर्क अधिकाऱ्याने अर्जदारास माहिती पुरवताना त्यासंदर्भात स्वतःचा तर्क-अनुमान अथवा वैय्यक्तिक अन्वयार्थ लावून अर्जदाराला मार्गदर्शन करणे अथवा सल्ला देणे केव्हाही उचित अथवा समर्थनीय ठरू शकत नाही आणि कायद्याला तसे अपेक्षित पण नाही." [2]

"माहिती पुरवताना अधिकाऱ्याने स्वतःहून माहिती मिळवणे, तयार करणे, त्याचा अन्वयार्थ लावणे आणि अथवा अर्जदाराच्या गृहित प्रश्नांना उत्तरे देण्याचा प्रयत्न करणे हे उपद्व्याप कायद्याला अपेक्षित नाहीत." [3]

केन्द्र सरकारने DoPT द्वारे जारी केलेल्या वरील परिपत्रिकेवरून "माहिती अधिकार कायद्याचे शस्त्र किती प्रभावी आहे" हे सहज ध्यानात येईल.

---

1. "Where the information sought is not a part of the record of the public authority and where such information is not required to be maintained under any law or the rules or regulations of the public authority, the Act does not cast an obligation upon the public authority to collect or collate such non-available information and then furnish it to an applicant."

2. "A public authority is not required to furnish information which require drawing of inferences and/or making of assumptions (and) it is also not required to provide 'advice' or 'opinion' to an applicant and furnish any 'opinion' or 'advice' to an applicant"

3. "Public information officer is not supposed to create information or to interpret information or to solve the problems raised by the applicants or to furnish replies to hypothetical questions."

***(Reference : Circular dt. 16-09-2011 issued to all states by The Department of Personal and Training (DoPT).***

# १५

## व्यर्थ न हो बलिदान

### (Those Who lost their lives)

स्वतःचा स्वार्थ साधण्यासाठी समाजातील काही विघ्नसंतोषी मंडळी अथवा गट जनहित संरक्षणार्थ केलेल्या कोणत्याही प्रभावी कायद्याला, नेहमी विरोध करतात यात काही नवल नाही. अशी मंडळी स्वतःच्या स्वार्थाआड येणाऱ्या कुणाचीही, अगदी कायद्याचीही गय करत नाहीत. याकामी आघाडीवर असतात ते अप्रामाणिक राजकारणी, मुजोर शासकीय अधिकारी, तथाकथित स्वयंभू समाजसेवक/नेते आणि विशेष करून विविध क्षेत्रातील माफिया मंडळी. साम-दाम-दंड-भेद या नीतीचा वापर करून अशी मंडळी अन्यायाविरुध्द झगडणाऱ्या निस्वार्थी आणि सालस कार्यकर्त्यांची सतत कोंडी करतात, छळतात, प्राणघातक हल्ला करतात आणि वेळप्रसंगी त्यांचा जीवही घेतात हे आता लपून राहिलेले नाही.

माहिती अधिकारासाठी झटणाऱ्या कार्यकर्त्यांच्या नशिबीसुध्दा असे भोग आलेले आहेत व पुढेही येत राहतील. यासंदर्भात घडलेल्या भीषण घटना पाहिल्यास अंगावर काटा उभा राहिल्याशिवाय राहणार नाही. फक्त गेल्या २ वर्षाच्या काळात १८ हून अधिक निष्ठावंत कार्यकर्त्यांना आपले बलिदान द्यावे लागले असून कित्येकजणांवर प्राणघातक हल्ले झाले आहेत ही वस्तुस्थिती आहे. हे दृष्टचक्र असेच चालू राहील की काय याचीच भीती वाटते.

तथापि अन्यायाविरुध्द लढण्यासाठी लागणारी निष्ठा, सोशिकता आणि प्रामाणिकपणा बाळगणारे कार्यकर्ते समाजकंटकांना कधीच घाबरत नाहीत. त्यांचा वसा आणि व्रत ते सोडत नाहीत. त्यामुळेच अशा सक्रिय आणि निर्भय कार्यकर्त्यांची समाजकंटकांना नेहमी भीती वाटत असते. स्वार्थाला लगाम बसला की ही संधीसाधू मंडळी चवताळून उठतात आणि सरळसरळ खून करण्यापर्यंत त्यांची मजल जाते. पण ते सोईस्करपणे विसरतात की अशा निस्वार्थी कार्यकर्त्यांच्या बलिदानातून प्रेरणा घेवून अनेक कार्यकर्ते जन्म घेतात आणि त्यांचा लढा पुढे चालू ठेवतात.

गेल्या दोन वर्षात ज्या निर्भय कार्यकर्त्यांनी माहिती अधिकारासाठी आपली आहुती दिली त्याचा आलेख सुन्न करणारा आहे. त्याची झळ विवेकी वाचकांना समजावयास हवी. अशा समर्पित कार्यकर्त्यांच्या बलिदानातून स्फूर्ती घेवून यापुढे समाजातून अनेक निष्ठावंत कार्यकर्ते उदयास येतील असा विश्वास वाटतो. ज्यांनी सत्याची कास धरून आयुष्यभर अन्यायाचा पाठपुरावा केला, स्वतःचे प्राण पणाला लावले, आणि प्रसंगी स्वतःच्या छातीवर वार झेललेल्या या निर्भय वीरांच्या त्यागाची गाथा आणि रक्त गोठवणारी बलिदान कहाणी, प्रत्येक वाचकाला अंतर्मुख आणि अस्वस्थ करून जाईल.

## ● बलिदान :

### १) १३-०१-२०१० : कै. श्री. सतीश शेट्टी (महाराष्ट्र):-

पुणे जिल्ह्यातील तळेगाव येथील ३८ वर्षाच्या या तडफदार आणि तरुण कार्यकर्त्याने माहिती अधिकाराचा वापर करून धनदांडग्यांचे जमीन अतिक्रमण संदर्भातील अनेक घोटाळे उघडकीस आणले होते. परिणाम. ते सकाळी फिरावयास गेले असता लॅण्ड माफियाकडून दिवसाढवळ्या गोळ्या झाडून त्यांचा अमानुषपणे खून करण्यात आला. एक धगधगते व्यक्तिमत्व कायमसाठी पडद्याआड गेले.

### २) ११-०२-२०१० : कै. श्री. विश्राम लक्ष्मण डोडिया (गुजरात):-

अहमदाबाद येथील अत्यंत कार्यक्षम आणि निर्भय असलेल्या या कार्यकर्त्याने अवैध वीज जोडण्या प्रकरणी होत असलेला गैरव्यवहार चव्हाट्यावर आणण्यासाठी संबंधित खाजगी वीज पुरवठा कंपनीकडे माहिती अधिकाराखाली अनेक अर्ज करून माहिती उपलब्ध करून देण्यासाठी प्रचंड दबाव आणला होता. परिणाम तोच. एक दिवस सदर वीज कंपनीच्या अधिकाऱ्यांबरोबर चर्चा संपवून घरी परत जात असताना त्यांच्यावर जीवघेणा हल्ला झाला आणि त्यातच त्यांची प्राणज्योत मालवली.

### ३) १४-०२-२०१० : कै श्रीधर मिश्रा (बिहार) :-

बिहार राज्यात बेगुसराई जिल्ह्यातील फुलवारी गावात राहणाऱ्या या तरुण कार्यकर्त्याने माहिती अधिकाराचा वापर करून राज्याच्या समाजकल्याण खात्यातला

निधीगैरवापर आणि भ्रष्टाचार उघडकीस आणला. परिणाम. दिवसाढवळ्या स्थानीय गुंडांकरवी त्याची क्रूरपणे हत्या करण्यात आली.

**४) २६-०२-२०१० : कै. श्री अरूण सावंत (महाराष्ट्र) :-**

बदलापूर जिल्हा ठाणे, येथील या प्रसिध्द सामाजिक कार्यकर्त्याने माहिती अधिकार कायद्यांतर्गत बदलापूर नगरपालिकेतील विविध घोटाळे प्रकरणी अनेक अर्ज करून माहितीची मागणी केल्यामुळे अनेक लोकांचे पितळ उघडे पडण्याची भीती निर्माण होवून एकच खळबळ उडाली. परिणाम तोच झाला. पाळलेल्या गुंडांकरवी दिवसाढवळ्या गोळ्या झाडून त्यांची निर्घृण हत्या करण्यात आली.

**५) ११-०४-२०१० : कै. श्री. सोला रंगा राव (आंध्रप्रदेश) :-**

आंध्रप्रदेशाच्या या समाजसेवी कार्यकर्त्याने माहिती अधिकाराचा वापर करून ग्रामीण सांडपाणी योजनेवर किती रक्कम मंजूर झाली आणि किती खर्च झाला याचा अहवाल संबंधित मंडळ, आणि परिषद विकास कार्यालयाकडून मागवला. या योजनेत भ्रष्टाचार बोकाळल्याची खात्री पटताच संदर्भित माहिती मिळवण्यासाठी त्यांनी शर्थीचे प्रयत्न केले, आणि सर्वांचे धाबे दणाणले. परिणाम तोच. भ्रष्टाचारी यंत्रणेकडून त्याची निर्घृण हत्या करण्यात आली.

**६) २०-०५-२०१० : कै. श्री. विठ्ठल गिते (महाराष्ट्र):-**

बीड जिल्ह्यातील वाघबेट गावचा विठ्ठल गिते हा एक सामान्य शेतकरी. अन्यायाची चीड असणाऱ्या या ३९ वर्षांच्या तरुण कार्यकर्त्याने माहिती अधिकाराचा वापर करून स्थानीय शाळांमधील गैरव्यवहार चव्हाट्यावर आणून भल्याभल्यांची अब्रू वेशीला टागंली. परिणामी समान्यातील असामान्य ठरलेल्या या निर्भय कार्यकर्त्याला सत्ताधाऱ्यांच्या गुंडांकरवी आपला जीव गमवावा लागला.

**७) २२-०५-२०१० : कै. श्री. दत्तात्रय पाटील (महाराष्ट्र):-**

कोल्हापूर जिल्ह्यातील इचलकरंजीच्या या तडफदार कार्यकर्त्याने माहिती अधिकाराचा वापर करून हातमाग सोसायट्यांतील अवैध नोंदण्या (Registretions) उघड्या करून एकच खळबळ उडवून दिली होती. श्री. दत्तात्रय पाटील डोईजड होत

आहेत हे पाहून खवळलेल्या स्वार्थसाधूंनी डाव साधून त्यांचा अमानुषपणे वध केला. एक निष्ठवान कार्यकर्ता समाजाने गमावला.

**८) २०-०७-२०१० : कै. श्री. अमीत जेठवा (गुजरात) :-**

गुजरातच्या या तडफदार आणि निर्भय कार्यकर्त्याने माहिती अधिकार कायद्याचा वापर करून गीरच्या जंगलातील अवैध खाणकाम आणि भ्रष्टाचार उजेडात आणून जनहित याचिका दाखल केली. परिणामी त्यांचा बुलंद आवाज कायमचा बंद करण्यासाठी, चक्क गुजरात उच्च न्यायालयासमोरच गोळ्या झाडून भाडोत्री गुंडांकरवी त्यांची अमानुषपणे हत्या केली गेली.

**९) २५-०७-२०१० : कै. बाबू सिंह (उत्तरप्रदेश) :-**

उत्तरप्रदेशातील बहरिया जिल्ह्यातील काटघर गावचा हा तरुण कार्यकर्ता जनतेचा लाडका समाजसेवक. माहिती अधिकाराचा वापर करून समाजकल्याण आणि ग्रामविकास निधीवाटपातील भ्रष्टाचार आणि गैरव्यवहार त्यांनी उघडकीस आणण्याचा प्रयत्न करताच, स्थानीय नेते मंडळींच्या पायाखालची वाळू सरकली. परिणाम तोच : राजकीय गुंडांकरवी त्यांची अमानुषपणे हत्या करण्यात आली.

**१०) २७-०८-२०१० : कै. रामदास घाडेगावकर (महाराष्ट्र) :-**

४३ वर्षाचा रामदास हा नांदेड जिल्ह्याचा रहिवासी. समाजसेवेचा वसा घेवून त्याने जिल्ह्यातील अवैध वाळू उपसा करणाऱ्या सॅण्ड माफियाचा मोठ्या धीराने सामना केला. स्थानीक अधिकारी आणि वाळू माफिया टोळींची कृष्ण कृत्ये त्यांनी माहिती अधिकाराचा वापर करून उघडकीस आणली. प्रकरण गळ्याशी येताच वाळू माफियांच्या गुंडांकरवी त्यांची निघृण हत्या करण्यात आली.

**११) ०२-०३-२०११ : कै. नियामत अन्सारी (झारखंड) :-**

''राष्ट्रीय ग्रामविकास नोकरी हमी योजने' अंतर्गत उपलब्ध विकासनिधीचा गैरवापर आणि बोकाळलेल्या भ्रष्टाचाराला वाचा फोडण्यासाठी, लेहथर जिल्ह्यातील जेरुमा गावच्या या समाजसेवी कार्यकर्त्याने माहिती अधिकाराचा वापर करून सर्व संबंधितांचे पितळ उघडे पाडले. परिणामी राजकीय गुंडांकरवी प्रत्यक्ष राहत्या घरासमोरच बेदम मारहाण करून त्यांची हत्या करण्यात आली.

### १२) कै. श्री. ललीतकुमार मेहता (झारखंड):-

झारखंडच्या या बहाद्दर कार्यकर्त्याने, National Rural Employment Guarantee Act अंमलबजावणीतील भ्रष्टाचाराची कित्येक प्रकरणे उघडकीस आणून शासनावर दबाव आणला होता. साहजिकच संबंधितांमध्ये एकच खळबळ माजली. आपल्या पापावर पांघरुण घालण्यासाठी या कृतघ्न समाजकंटकांनी शेवटी मेहतांची निर्घृण हत्या करून त्यांचा आवाज कायमचा बंद केला.

### १३) कै. श्री. शशीधर मिश्रा (बिहार):-

बिहारमधील बारौनी गावचा हा सामजिक क्रियाशील कार्यकर्ता समाजकंटकांच्या डोळ्यात खुपत होता. माहिती अधिकाराद्वारे त्यांनी स्थानीय समाजकल्याण योजनेतील भ्रष्टाचार उघडकीस आणण्याचा प्रयत्न करताच, प्राणघातक हल्ला होवून त्यांना प्राणार्पण करावे लागले.

### १४) कै. श्री. व्यंकटेश (कर्नाटक):-

बंगलोरच्या या प्रभावी कार्यकर्त्याने माहिती अधिकाराचे शत्र वापरून सरकारी जमिनीवरच्या अतिक्रमणाची अनेक प्रकरणे उघडकीस आणल्यामुळे लॅण्ड मफियाने त्यांचा निघृण खून केला, आणि त्यांना अपघाती मृत्यू झाला अशी आवई उठवून दिली. तथापि मरणोत्तर शवचिकित्सेनंतर त्यांचा खून झाला हे निर्विवादपणे सिध्द झाले.

### १५) कै. श्री. सत्येंद्र कुमार दुबे (बिहार):-

नॅशनल हायवे ॲथॉरिटी ऑफ इंडिया या संस्थेत प्रकल्प संचालक म्हणून काम पहाणारा हा तडफदार अभियंता कर्तव्यात आणि कामात एकदम चोख. माहिती अधिकाराचा वापर करून गोल्डन क्वाड्रीलॅटरल हायवे कन्स्ट्रक्शन प्रकल्पात माजलेला भ्रष्टाचार त्याने उघडकीस आणण्यासाठी लढा दिला. परिणामी गया (बिहार) येथे त्यांची अमानुषपणे हत्या करण्यात आली.

### १६) कै. श्री. मंजुनाथ शन्मुगम (तामिळनाडू) :-

तामिळनाडू राज्यात पेट्रोलियम पदार्थांच्या विक्री प्रकरणी होत असलेला भ्रष्टाचार उघडकीस आणण्याचा श्री. मंजुनाथ शन्मुगम या निधड्या छातीच्या

कार्यकर्त्याने कित्येक महिने निकराचा प्रयत्न केला. सर्व संबंधितांचे धाबे दणाणले तेव्हा परिणाम तोच. पेट्रोलियम माफियांकडून त्यांची निघृण हत्या करण्यात आली.

**१७) २४-०६-२०११ : कै. श्री. भागू देवानी (गुजरात) :-**

तरुणाईला लाजवील अशी तडफ आणि उरक असलेल्या ७२ वर्षीय श्री. भागू देवानी यांनी माहिती अधिकाराचा वापर करून शासनाच्या गैरव्यवहाराची आणि मंत्र्यांच्या भ्रष्टाचाराची अनेक प्रकरणे उघडकीस आणून भल्याभल्यांचे वस्त्रहरण केले होते. शेवटी परिणाम व्हायचा तोच झाला. पोरबंदर येथे दिवसाढवळ्या सुरा भोसकून त्यांचा अमानुषपणे खून करण्यात आला.

**१८) १६-०८-२०११ : कै. शेहला मासूद (मध्यप्रदेश) :-**

भोपाळ येथील ही तडफदार महिला कार्यकर्ती जनहितासाठी राबत होती. भाजपचे खासदार अनील दवे यांच्या ट्रस्टमधील आर्थिक घोटाळे, कान्हा व बांधवगडमधील अवैध मृगया, काही हिरेखाणींचा अवैध आर्थिक व्यवहार, याचा तपशील तिने माहिती अधिकार कायद्याच्या माध्यमातून मिळवून जाहीर करताच संबंधितांच्या पायाखालची जमीन हादरली. परिणाम तोच. 'शेहला मासूद'ची तिच्या घरासमोरच निघृणपणे हत्या करण्यात आली. अन्यायाविरुध्द लढताना या बहाद्दर महिलेस आपले प्राण गमवावे लागले हे कटुसत्य विषण्ण आणि विदीर्ण करणारे आहे.

## • प्राणघातक हल्ला : जखमी-जायबंदी झालेले कार्यकर्ते :-

वरील बलिदान केलेल्या १८ ज्ञात कार्यकर्त्यांशिवाय गेल्या २ वर्षात असंख्य माहिती अधिकार कार्यकर्त्यांना समाजकंटकांच्या हातून जबर मारहाण होवून त्यांचा आवाज बंद करण्याचा प्रयत्न झालेला आहे. प्राणघातक हल्ल्यामुळे जायबंदी झालेल्या या वीर समाजसेवकांची संक्षिप्त यादी खाली दिलेली आहे :-

**१) ३१-०५-२०१० : श्री. गुलाम नबी शाह (जम्मू-काश्मिर) :-**

जम्मू-काश्मिरच्या बडगाम चा हा ग्रामवासी. अन्यायाची चीड असणाऱ्या या तडफदार कार्यकर्त्याने माहिती अधिकाराचा वापर करून 'इंदिरा आवास योजनेतील' भ्रष्टाचार उघडकीस आणला. परिणाम : प्राणघातक हल्ला आणि त्यात जबर जखमी-जायबंदी.

**२) १४-०७-२०१० : श्री. अशोककुमार शिंदे (महाराष्ट्र) :-**

माहिती अधिकाराचा वापर करून मुंबईच्या या तरुण समाजसेवकाने PWD खात्यातील गैरव्यवहार आणि भ्रष्टाचार चवाठ्यावर आणण्याचा प्रयत्न करताच अज्ञात गुंडांकरवी त्यांच्यावर प्राणघातक हल्ला होवून त्यांना जबर जखमी करण्यात आले.

**३) ०२-०१-२०११ : श्री अरुण माने (महाराष्ट्र) :-**

माहिती अधिकाराचा वापर करून लॅण्ड माफिया आणि प्रशासन यांच्या संगनमताने परिसरातील अवैध भूसंपादन आणि जमीन बळकावण्याची प्रकरणे या पठ्ठ्याने उघडकीस आणण्याचा प्रयत्न केला. परिणाम : तळेगाव-दाभाडे येथील जिजामाता चौकात आपल्या दुकानात बसलेल्या या कार्यकर्त्याला दिवसाढवळ्या जबर मारहाण करून त्यांचा आवाज बंद करण्याचा प्रयत्न केला गेला.

**४) १७-०१-२०११ : श्री. सलमान रेड्डी (ओरिसा) :-**

ओरिसातील रायगाडाचा हा तरुण कार्यकर्ता. ग्रामविकास निधीचागैरवापर आणि भ्रष्टाचार उघडकीस आणण्याचा प्रयत्न करताच संबंधितांचे पाय लटपटले. परिणामी त्यांच्यावर गुंडांकरवी प्राणघातक हल्ला करून त्यांना कायमचे जायबंदी करण्यात आले.

**५) १७-०१-२०११ : श्री. सफदर अली (जम्मू-काश्मिर) :-**

माहिती अधिकाराचा वापर करून ग्रामविकास योजनेअंतर्गत पाण्याच्या टाक्या बांधण्याच्या कंत्राट प्रकरणी या समाजसेवी कार्यकर्त्याने संबंधितांचा भ्रष्टाचार उघडकीस आणण्याचा प्रयत्न करताच भानगोडा (जि. दोडा) येथे त्यांच्यावर भाडोत्री गुंडांकरवी जीवघेणा हल्ला करण्यात आला.

**६) २५-०१-२०११ : श्री. विक्रांत कर्णिक (महाराष्ट्र) :-**

ठाणे (पश्चिम) येथील तरुण सामाजिक कार्यकर्ते श्री. विक्रांत कर्णिक यांनी राजकीय वरदहस्त लाभलेल्या काही विकासकांच्या अवैध बांधकामाचा तपशील माहिती अधिकाराखाली मिळवून गृहनिर्माण-विकास कामातील गैरव्यवहार आणि अवैध बांधकामाचे प्रकार चवाठ्यावर आणण्याचा प्रयत्न करताच विकासकांच्या गुंडांकरवी त्यांना बेदम मारहाण करण्यात आली.

**७) २६-०१-२०११ : श्री. अमरनाथ पांडे (उत्तरप्रदेश) :-**

सोनेभद्र-उत्तरप्रदेशच्या ह्या ५५ वर्षाच्या सामाजिक कार्यकर्त्यांने दीपानगर-विकास परिसरयोजनेत चाललेला गैरकारभार आणि भ्रष्टाचाराच्या विरुध्द आवाज उठवण्याचा प्रयत्न करताच संबंधितांनी गुंडांकरवी त्यांना अमानुषपणे मारहाण केली गेली आणि त्यात ते जबर जखमी झाले.

**८) १०-०२-२०११ : श्री. जगदीश शर्मा (हरियाणा) :-**

चंद्रावल (जि. फतेहाबाद) येथील जगदीश शर्मा या तरण्याबांड समाजसेवी कार्यकर्त्यांने ग्रामपंचायतीत चाललेला गैरकारभार आणि भ्रष्टाचार उघडकीस आणण्याचा प्रयत्न करताच गावच्या सरपंचाकडून त्यांना जबर मारहाण करून जायबंदी केले गेले आणि झालेल्या झटापटीत त्यांच्या सुनेवर प्राणघातक हल्ला करून तिची अमानुषपणे हत्या करण्यात आली.

**९) ०३-०३-२०११ : श्री. मंगलराम मेघावल (राजस्थान) :-**

बामगोर (जि. बारमेर) येथील या दलित कार्यकर्त्यांने माहिती अधिकाराचा वापर करून "राष्ट्रीय ग्रामिणविकास सेवा हमीयोजनेतील" गैरव्यवहार आणि भ्रष्टाचार उजेडात आणण्याचा प्रयत्न करताच गावचा सरपंच गुलाम शहा याने गुंडांकरवी मंगलराम यास त्याच्या घरासमोरच दिवसाढवळ्या जबर मारहाण करून कायमसाठी जायबंदी केले गेले.

**१०) २१-०८-२०११ : श्री. जयसुख भंबानिया (दीव-दमण) :-**

केन्द्रशासित प्रदेश 'दीव' येथे कार्यरत असलेल्या जयसुख भंबानिया या ३९ वर्षीय सामाजिक कार्यकर्त्यांने माहिती अधिकाराचा वापर करून परिसरातील धन दांडग्यांनी कायदा धाब्यावर बसवून सुरू केलेली अवैध बांधकाम प्रकरणे उजेडात आणण्याचा प्रयत्न करताच, 'उना' (जि.जुनागड-गुजरात) येथे त्यांच्यावर ॲसिड फेकून तीक्ष्ण हत्यारांनी हल्ला चढवला गेला, आणि त्यात ते गंभीरपणे जखमी झाले.

***टीप :*** *ही यादी बरीच मोठी आहे. तथापि काही निवडक प्रकरणांचा या ठिकाणी उल्लेख केला आहे.*

***सौजन्य :*** *एशियन सेंटर ऑफ ह्युमन राईटस या संस्थेची इंटरनेटवर उपलब्ध लेख :*

*(RTI Activists : Sitting ducks of India)*

देशभरातील वेगवेगळ्या राज्यातील तळागाळातून पुढे आलेल्या, समाजसेवेचा वसा घेतलेल्या वरील निर्भय आणि प्रामाणिक कार्यकर्त्यांनी सामान्य नागरिकांच्या कल्याणासाठी प्रसंगी आपले बलिदान देवून, प्राणघातक हल्ले पचवून माहिती अधिकार कायद्याची ज्योत जागती ठेवली आहे, ही गोष्ट सर्व भारतीयांसाठी अभिमानास्पद आहे. ज्योतीने ज्योत उजळते या नात्याने अशा निष्ठावान कार्यकर्त्यांच्या त्यागातून प्रेरणा घेवून आज देशाच्या कानाकोपऱ्यात तळमळीच्या कार्यकर्त्यांची फळी हळूहळू का होईना उभी राहते आहे यासारखी समाधानाची बाब दुसरी नाही.

अशा महान समाजसेवकांसाठी एक सामान्य नागरीक म्हणून प्रत्येकाने आपापल्यापरीने सहकार्य आणि प्रोत्साहन दिले तर देशभरात अशा नवोदित कार्यकर्त्यांची कायमस्वरुपी भक्कम फळी उभी होवून त्यांच्याकडून समाजकल्याणाचा तोच वसा पुढे चालू राहिला तर या लढ्यात प्राणार्पण करणाऱ्या आणि जन्मभरासाठी अपंगत्व पत्करलेल्या असंख्य वीर कार्यकर्त्यांचे बलिदान आणि त्याग व्यर्थ जाणार नाही, याची खात्री वाटते.

# १६

# कार्यकर्त्यांच्या हत्या : प्रतिबंधात्मक उपाययोजना

## (Killings of PIL Activists : Preventive Measures)

माहिती अधिकार कायदा-२००५ अंमलात आल्यापासून सर्वस्तरांवरील माफियांकडून माहिती अधिकार कार्यकर्त्यांना त्रास देणे, त्यांच्यावर, त्यांच्या कुटुंबियांवर प्राणघातक हल्ले करणे, शारीरिक इजा पोचवणे, प्रसंगी त्यांची हत्या करणे असे विघातक प्रकार जवळपास प्रत्येक राज्यात झाल्याचे, होत असल्याचे सर्वश्रूत आहे. तथापि गेल्या २/३ वर्षात हल्ले आणि हत्यांचे प्रमाण वाढले असून सर्वांसाठी तो मोठा चिंतेचा विषय बनला आहे. यावर वेळीच उपाययोजना झाली नाहीतर हा भस्मासूर जनसामान्यांच्या मानगुटीवर केव्हा बसेल हे कळणार देखील नाही.

विषयाचे गांभीर्य लक्षात घेवून अनेक राज्यातील समाजसेवीसंस्था, समाजसेवक, सामाजिक कार्यकर्ते, मान्यवर व्यक्ती, वृत्तपत्रे आणि प्रसिध्दी माध्यमांनी या अमानुष कृत्यांना सतत झोतात ठेवून राज्य आणि केन्द्र सरकारवर प्रचंड दबाव आणला आहे हे मान्य करावेच लागेल. परिणामी माहिती अधिकार कार्यकर्त्यांच्या वारंवार होणाऱ्या हत्या आणि प्राणघातक हल्ले कसे रोखता येतील हा केन्द्रीय आणि राज्य शासनासाठी मोठ्या आव्हानाचा विषय बनल्यामुळे त्यावर शासनाला कायमस्वरुपी उपाय योजना तयार करणे आणि अंमलात आणणे भाग होते.

असे भ्याड हल्ले आणि हत्या रोखण्यासाठी त्वरित ठोस पावले उचलण्याची आवश्यकता आहे याची तीव्र जाणीव झाल्याबरोबर केन्द्र सरकारने त्या दृष्टीने प्रयत्न सुरू केले. परिणामस्वरुपी राज्य आणि केन्द्रीय माहिती आयोगाबरोबर विचारविनिमय होवून प्रतिबंधात्मक उपाय योजनेचा आराखडा तयार होवून त्या दिशेने कार्यवाही सुरू झाल्याचे समजते. त्यासंदर्भात दि. ५-१०-२०११ च्या "दि टाईम्स ऑफ इंडिया" या प्रतिथयश इंग्रजी दैनिकात या संदर्भात आलेली बातमी सर्व समाजाला दिलासा देणारी आहे.

केन्द्रीय माहिती आयोगाचे अध्यक्ष श्री. शैलेश गांधी यांनी राज्य आयोगाच्या-आयुक्तांच्या सल्लामसलतीने प्रतिबंधक उपाय योजनेचा आराखडा तयार केला आणि त्यासंदर्भात केन्द्रीय माहिती आयोगाच्या सप्टेंबर २०११ च्या सर्वसाधारण सभेत अत्यंत महत्वाचे ठराव पारित करून घेतले. या ठरावांमुळे भविष्यात माहिती अधिकार कार्यकर्त्यांवर होणारे हल्ले आणि हत्या मोठ्या प्रमाणात निश्चितपणे रोखल्या जावू शकतील अशी आशा निर्माण झाली आहे. केन्द्रीय माहिती आयोगाने या ठरावात स्पष्टपणे नमूद केले आहे की :-

> **"यापुढे देशातील कोणत्याही माहिती अधिकार कार्यकर्त्यावर हल्ला होवून त्यात सदर कार्यकर्ता जखमी-जायबंदी झाला अथवा त्याला आपले प्राणार्पण करावे लागले तर त्या कार्यकर्त्याच्या सर्व प्रलंबित अर्जांची छाननी करून त्यावर त्वरित निर्णय घ्यावा आणि संबंधित विभागाने तो निर्णय जनतेच्या माहितीसाठी आपल्या संगणकीय वेबसाईटवर (Website) प्रसिध्द करावा."** [1]

केन्द्रीय माहिती आयोगाच्या सदर पारित ठरावाचा इतिवृत्तांत ४ ऑक्टोबर २०११ ला प्रसिध्द झाला असून आयोगाने त्याची माहिती जनतेसाठी संकेतस्थळावर उपलब्ध करून दिली असून अशा निंदनीय प्रकाराला रोखण्यासाठी नागरिकांनीही योग्य ते सहकार्य द्यावे अशी विनंती करण्यात आली आहे. या संदर्भात केन्द्रीय माहिती आयोगाने सदर इतिवृत्तांत अशी आशा व्यक्त केली आहे की :-

> **"हत्या झालेल्या कार्यकर्त्याने माहिती अधिकाराचा वापर करून आजवर मिळवलेली सर्व संवेदनशील माहिती आम जनतेच्या माहितीसाठी इंटरनेटद्वारे प्रसिध्द झाल्यास समाजकंटकांवर निश्चितपणे जरब बसेल. परिणामी कार्यकर्त्यांवर होणाऱ्या प्राणघातक हल्ल्यांना आपोआपच फार मोठ्याप्रमाणात आळा बसू शकेल."** [2]

अशा प्रकरणी प्रतिबंधात्मक कार्यपध्दती कशी अंमलात येवू शकेल यासंबंधी ठरावात पुढे जावून असेही म्हटले आहे की :-

**“अशा कार्यकर्त्यांनी मिळवलेल्या माहितीच्या आधारे संबंधित प्रकरणाची सखोल चौकशी करण्यासाठी गतिमान कार्यपध्दतीचा अवलंब केल्यास या दुष्ट प्रवृत्तींना निश्चितपणे लगाम बसेल.”**[3]

केन्द्रीय माहिती आयोगाच्या या महत्वपूर्ण ठरावावर प्रतिक्रिया देताना माहिती अधिकार कार्यकर्ते श्री. मिलिंद मुळे यांनी म्हटले आहे की, “यापुढे RTI कार्यकर्त्यावर हल्ला करण्यापूर्वी (संबधित मंडळीना) दहा वेळा विचार करावा लागेल”. श्री. चेतन कोठारी यांनी ठरावाचे स्वागत करताना म्हटले आहे की, “या ठरावामुळे एकूणच प्रक्रियेत पारदर्शकता येवून अशा प्रकारांना निश्चितपणे आळा बसेल यात शंका नाही.”

---

1. “If the Commission receives a complaint regarding the assault or murder of an Information Seekers, it will exmine all the pending RTI applications of victim and order the departments to publish the requested information *suo motu* on their own websites.”

2. “If all information sought by an RTI activist, who is attacked or killed, is published on the internet, it will defeat the very purpose of attacking an activist.”

3. “The Commission also resolves that it will take proactive steps in ascertaining the status of investigations / prosecutions of cases involving information seekers and endeavors to have these processes expedited.”

***(Reference : Resolutations passed by The Central Information Commission in its meeting held in September 2011 and published on 04-10-2011)***

परिशिष्ट-१

## माहिती अधिकार कायदा-२००५ : माहिती मिळवण्यासाठी करावयाचा अर्जाचा नमुना

| या ठिकाणी रू १०/-चा न्यायालयीन मुद्रांक लावावा. |
|---|

प्रति,
राज्य माहिती अधिकारी/ जनसंपर्क अधिकारी,

____________________________(पत्ता)

१) अर्जदाराचे पूर्ण नाव : श्री./सौ./मे. __________________

२) अर्जदाराचा पूर्ण पत्ता : ________________________

३) हव्या असलेल्या माहितीचा तपशील

अ) संबधित विभाग खाते : ________________________

ब) (i) हव्या असलेल्या संबंधित माहितीचे सविस्तर वर्णन : ________________________

(ii) माहितीशी संबंधित कालावध : ________________________

(iii) इतर खास विभागीय तपशील : ________________________

४) माहिती कशाप्रकारे उपलब्ध करून हवी आहे. : (अ) स्वतः घेवून जाणार (ब) साध्या टपालाद्वारे (क) नोंदणीकृत टपालाद्वारे (ड) शीघ्र टपालाद्वारे (शुल्क आकारणीत टपाल खर्चाच समावेश आहे)

५) अर्जदार दारिद्र्यरेषे खालील आहे का : होय / नाही (प्रमाणपत्राची सत्यप्रत जोडावी)

६) अर्जदारांचे अभिवचन :

मी स्पष्टपणे विधान करतो/ते की मी मागितलेली माहिती कायद्याच्या (कलम ____ व परिशिष्ट क्र. _____ प्रमाणे) निर्बंधित विषयांशी संबंधित नसून, माझ्या ज्ञानाप्रमाणे सदर माहिती आपल्या विभागाशी/खात्याशी निगडीत आहे.

स्थळ : ____________

दिनांक : ____________

(____________________)
अर्जदाराचे पूर्ण नाव आणि स्वाक्षरी

(Email Address) __________________

दूरध्वनी क्रमांक : ______________ (घरचा)

______________ (कार्यालयाचा)

## माहिती अधिकार कायदा-२००५, कलम १९(१) अन्वये
## प्रथम अपील अर्जाचा नमुना

> या ठिकाणी रू २०/-चा
> न्यायालयीन मुद्रांक लावावा.

प्रेषक :

______________________________

( अपीलकर्त्यांचे संपूर्ण नाव व पत्ता)

प्रति :

______________________________

______________________________

( अपिलेट अधिकाऱ्याचे नाव, पद, आणि कार्यालयाचा पत्ता)

१) अपीलकर्त्यांचे संपूर्ण नाव : ____________________

२) अपीलकर्त्यांचा संपूर्ण पत्ता : ____________________

३) माहिती अधिकाऱ्याचा तपशील
(नाव, हुद्दा आणि पूर्ण पत्ता) : ____________________

४) माहिती अधिकाऱ्याने दिलेल्या
आदेशाविरुध्द, अपील असेल तर
तो आदेश प्राप्त झाल्याचा दिनांक : ____________________

५) अपील दाखल करण्याची शेवटची तारीख : ____________________

६) अपीलाची कारणे : ____________________

७) माहितीचा तपशील
अ) माहितीचा विषय आणि स्वरुप : ____________________
ब) माहिती ज्या अधिकाऱ्याशी
संबंधित आहे त्या कार्यालयाचे
विभागाचे नाव : ____________________

स्थळ : ____________________

दिनांक : ____________________

(____________________)
अपीलकर्त्यांचे पूर्ण नाव आणि स्वाक्षरी

## माहिती अधिकार कायदा : कलम १९ (३) अन्वये
## द्वितीय अपील अर्जाचा नमुना

या ठिकाणी रू २०/-चा
न्यायालयीन मुद्रांक लावावा.

प्रेषक :

( अपीलकर्त्याचे संपूर्ण नाव व पत्ता)

प्रति :

( राज्य माहिती आयोगाच्या आयुक्ताचे
नाव, पद, हुद्दा आणि पत्ता)

१) अपीलकर्त्याचे संपूर्ण नाव :

२) अपीलकर्त्याचा पूर्ण पत्ता :

३) प्रथम अपील प्राधिकाऱ्याचा तपशील :

४) प्रथम अपील निकालाचा दिनांक :

५) ज्या आदेशाविरुध्द अपील केले असेल
तो प्रथम आदेश प्राप्त झाल्याचा दिनांक :

६) द्वितीय अपील दाखल करण्याची शेवटची तारीख :

७) द्वितीय अपीलाची कारणे :

८) माहितीचा तपशील

अ) हव्या असलेल्या माहितीचा विषय आणि स्वरुप :

ब) हव्या असलेल्या माहितीशी निगडीत
असलेल्या कार्यालयाचे/विभागाचे नाव :

स्थळ :

दिनांक :

(अपीलकर्त्याचे पूर्ण नाव आणि स्वाक्षरी)

# • विभाग दोन •

# जनहित याचिका

## ( PUBLIC INTEREST LITIGATION – PIL )

## अनुक्रमणिका

पृष्ठ क्रमांक


| | | |
|---|---|---|
| १. | जनहित याचिका : ऐतिहासिक पार्श्वभूमी | ७९-८४ |
| २. | जनहित याचिका : व्याख्या आणि भाष्य | ८५-८६ |
| ३. | पारंपरिक न्यायनिवाडा : उदारीकरण | ८७-८९ |
| ४. | लोकस स्टॅण्डी : उदारीकरण | ९०-९३ |
| ५. | जनहित याचिका : संकल्पना आणि उद्देश | ९४-९६ |
| ६. | जनहित याचिका : प्राथमिक आक्षेप आणि अधिकारक्षेत्र | ९७-९९ |
| ७. | जनहित याचिका : निकष आणि कार्यपध्दती | १००-१०३ |
| ८. | जनहित याचिका : ग्राह्य आणि अग्राह्य विषय | १०४-१०६ |
| ९. | पर्यायी न्याय उपलब्ध असल्यास : जनहित याचिका अग्राह्य | १०७-१११ |
| १०. | जनहित याचिका : सीमारेषा-मर्यादा | ११२-११३ |
| ११. | जनहित याचिका दाखल करताना घ्यावयाची काळजी | ११४-११६ |
| १२. | जनहित याचिका : न्यायिक सक्रियता आणि मर्यादा | ११७-११९ |
| १३. | जनहित याचिका : गैरवापर | १२०-१३२ |
| १४. | जनहित याचिका : साध्य आणि सफलता | १३३-१३८ |
| १५. | संविधानिक अधिकार आणि जनहित याचिकेचे योगदान | १३९-१४६ |
| १६. | सामाजिक न्याय, न्यायिक उपाययोजना आणि नि:शुल्क विधिसहाय्यता | १४७-१५१ |
| १७. | संकीर्ण (Miscellaneous) | १५२-१५४ |

# १

# जनहित याचिका : ऐतिहासिक पार्श्वभूमी

## ( Historical Perspective of PIL )

जागतिकस्तरावर जनहितासाठी आजवर अनेक कायदे झालेले असून कालमानानुसार त्यात यापुढेही भर पडेल यात शंका नाही. लोकशाहीप्रणित विकसित देशांनी त्यानुसार फार पूर्वीपासून प्रयत्न केल्याचे दिसून येते. त्यात अमेरिका आणि ब्रिटन आघाडीवर आहेत. भारतात जनहित याचिकेची संकल्पना आणि विकास याचे मूल्यमापन करण्यापूर्वी इतर देशात अस्तित्वात असलेल्या तत्सम कायद्यांची ऐतिहासिक पार्श्वभूमी समजावून घेणे तितकेच महत्वाचे ठरते. या संदर्भात इतर देशांनी दिलेले योगदान यापुढे नमूद केले आहे :-

● **अमेरिका :**

१९६० ते १९७० या दरम्यान, अमेरिकेत सर्वप्रथम 'जनहित याचिकेची' संकल्पना अस्तित्वात आली. सर्वसाधारण १९६५ च्या जवळपास अमेरिकन न्यायव्यवस्थेत Public Interest Law या 'जनहित कायद्याचा' समावेश करण्यात आला. सामान्य जनतेच्या वैय्यक्तिक अधिकारांना अथवा त्यांच्या आर्थिक हितसंबंधाना बाधा पोचत असल्यास त्यांच्या रास्त तक्रारींचे निराकरण करून त्यांना योग्य तो न्याय मिळवून देण्यासाठी "Office of Economic Opportunity of Federal Government of U.S.A." या कार्यालयाची स्थापना करण्यात आली.

धनदांडग्या मालकांविरुध्द दाद मागण्यासाठी गोरगरीब आणि शेतकऱ्यांना विधिसेवा आणि विधिसहाय्य देण्यासाठी १९७४ साली अमेरिकेन कायदेमंडळाने (U.S. Congress) 'विधिसेवा महामंडळ' (Legal Services Corporation) या स्वतंत्र यंत्रणेची स्थापना केली. अशिक्षित, गोरगरीब, असहाय्य, आणि तळागाळातील विस्कळीत अथवा असंघटीत जनतेला सरकारी अधिकारी अथवा राज्य सरकारांतर्फे दिल्या जाणाऱ्या लहरी आणि एकतर्फी निर्णयाविरुध्द योग्य तो न्याय मिळवून देणे हे या संकल्पनेचा मूळ उद्देश होता.

सुरवातीला या कायद्यात (१) वंश विद्वेष तथा वर्ण सापत्नभाव (Racial Discrimination), (२) बाल अधिकार आणि संरक्षण (Child Protection), (३) तुरुंग व्यवस्थेतील गैरकारभार (Mis-management in Prisons), (४) पर्यावरण प्रदूषण (Envoirnmental Polution) आणि (५) ग्राहक-ग्राहकाधिकार संरक्षण (Consumer Protection) या समस्यांचा समावेश होता. तथापि पुढच्या दहा वर्षात जनहित याचिकेचे कृतिक्षेत्र वाढून त्यात (६) कर सुधारणा-पुनर्रचना (Tax Reforms), (७) सार्वजनिक आरोग्य संवर्धन (Health Care), (८) जमीन आणि उर्जेचा वापर (Use of Land and Energy), (९) शिक्षण (Education), (१०) नोकरी-व्यवसाय फायदे (Employment Benifits), (११) मानव साधन विकास (Human Resourses Development), (१२) प्रसार माध्यमाद्वारे व्यक्तिगत पातळीवर कुणाच्या नावलौकिकाला प्रतिष्ठेला बाधा अथवा अपाय होणे (Injury caused to reputation through Media), (१३) कारखान्यातील मजूर-कामगार, शेतकरी, खाण कामगार यांच्या समस्या आणि गाऱ्हाणी (Labour Disputes), (१४) अनाथ, बेवारस मुले आणि स्त्रिया यांच्या समस्या आणि गाऱ्हाणी (Protection related to neglected or orphaned Children and Women), (१५) सुनावणी चालू असलेले कैदी (Under-trial Prisoners), (१६) आर्थिक घोटाळे (Financial Scams) आणि (१७) संविधानिक अधिकाराचे संरक्षण (Protection of Constitutional Rights) यांचा समावेश झाल्यामुळे या संकल्पनेला सामान्य जनतेचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. त्याच बरोबर मानवाधिकार संघटनेच्या चळवळीमुळे (Human Rights) जनहित याचिकेच्या विकासासाठी फार मोठी मदत झाली. या पार्श्वभूमीवर **"जनहित याचिका"** हे पूरक न्यायदान, अमेरिकन न्याय व्यवस्थेचा एक अविभाज्य घटक म्हणून कार्यान्वित आहे.

न्यायालयात आपली बाजू मांडून दाद मागण्याचा अधिकार असलेल्या व्यक्तीस **Locus-standi** म्हणून ओळखले जाते. सर्वप्रथम न्यायासनासमोर दाद मागण्यासाठी आलेली व्यक्ती वादी अथवा प्रतिवादी म्हणून कायद्याने पात्र आहे का याचा विचार केला जातो. १९६० साली **युनायटेड स्टेट्स विरुध्द विल्सन** ((1960) 362 US IT) या प्रकरणी अमेरिकन उच्च न्यायालयाने **Locus-standi** संबंधी दिलेले निर्देश खालीलप्रमाणे आहेत :-

**"व्यक्तिगत अथवा सार्वजनिक वादापोटी न्यायालयात दाद मागणाऱ्या वादी-फिर्यादीच्या पात्रतेची (Locus standi) न्यायालयाने सर्वप्रथम खातरजमा करून घेतली पाहिजे."** [1]

सर्वसाधारणपणे प्रत्येक देशात निरक्षर, गोरगरीब, पीडित आणि आर्थिक पाठबळ नसलेल्या जनसामान्यांना न्यायालयाचे दार ठोठावणे शक्य होत नाही ही वस्तुस्थिती आहे. तथापि ही अडचण ओळखून अमेरिकेत जनहित याचिका प्रकरणी **Locus-standi** संबंधीचे कठोर धोरण उदार करण्यासाठी त्यात योग्य त्या सुधारणा करून एकूणच व्याप्ती वाढवण्यात आली. एखाद्या व्यक्तीच्या मानवाधिकार अथवा संविधानिक अधिकाराची पायमल्ली झाल्याचे आढळून आल्यास आणि तशा व्यक्तीकडे कोर्टात जाण्यासाठी आर्थिक पाठबळ उपलब्ध नसल्यास त्याच्यावतीने कुणी अन्य नागरिक जनहित याचिका दाखल करू शकतो अशी व्यवस्था करण्यात आली. परिणामी सामान्य नागरिकांना जनहित याचिकेद्वारे तक्रारी/गाऱ्हाणे मांडून त्वरित न्याय मिळवण्याचा मार्ग मोकळा झाला. या पर्यायी गतिमान न्यायदानामुळे अमेरिकन न्यायव्यवस्थेला फारमोठी बळकटी प्राप्त झाली आहे यात वाद नाही.

## • ब्रिटन :

ब्रिटिश न्यायव्यवस्थेप्रमाणे शासननियुक्त 'प्रमुख कायदा अधिकारी' (Attorney General) हा नागरिकांच्या संविधानिक अधिकारांचा एकमेव हितरक्षक म्हणून ओळखला जात असे. त्यामुळे १९ व्या शतकापर्यंत जनहित याचिका फक्त **Attorney General** यांच्या संमतीनेच दाखल केली जावू शकत होती. जनहित याचिकेसाठी **Attorney General** यांची संमती अथवा परवानगी सक्तीची असल्याने ब्रिटिश न्यायव्यवस्थेत, २०व्या शतकाच्या मध्यापर्यंत ही ताठर भूमिका आणि व्यवस्था कायम होती.

तथापि उत्तरार्धात ब्रिटनमध्ये सामाजिक आणि आर्थिक धोरणात जनहिताच्यादृष्टीने अमुलाग्र बदल झाले. **Locus-standi** संदर्भात असलेले पूर्वीचे ताठर निर्बंध शिथिल होवून उदार धोरण स्वीकारल्यामुळे नागरिकांना कोणत्याही अडथळ्याशिवाय अन्यायाविरुध्द दाद मागण्यासाठी जनहित याचिकेचे दरवाजे खुले झाले. याचे सारे श्रेय **'लॉर्ड डेनिंग'** व त्यांचे समर्थक-सहकारी **'लॉर्ड रीड'** आणि **'लॉर्ड वायबरफोर्स'** यांना द्यावे लागेल. इतके होवूनसुध्दा तुलनाच करावयाची

झाल्यास ब्रिटनमधील जनहित याचिकेची व्याप्ती आणि कृतिकक्षा अमेरिकेच्या मानाने अजूनही खूप मर्यादित आहे हे मान्य करावेच लागेल.

## • भारत :

जनहित याचिका 'प्रारंभ' आणि 'विकास' विषद करण्यापूर्वी भारतीय न्यायव्यवस्थेत अस्तित्वात असलेल्या एका महत्वाच्या तरतुदीकडे वाचकांचे लक्ष वेधणे आवश्यक आहे. भारतीय दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ (Code of Civil Procedure : 1908) यामध्ये कलम ९१ (१) (ब) अन्वये **"कुणाच्या अनैतिक अथवा उपद्रवकारक कृत्यामुळे आम जनतेचे हित बाधित होत असेल, अथवा त्यांच्यावर अन्याय होत असेल तर अशावेळी तशा कृत्याशी संबंध नसलेल्या दोन अथवा त्याहून अधिक व्यक्ती एकत्र येवून न्यायालयाकडे मनाई हुकूम अथवा दाद मागू शकतात"** अशी तरतूद आहे. त्या व्यतिरिक्त कलम १३३ मध्ये जनहित आणि नागरी अधिकार यांच्या संदर्भात असलेल्या तक्रारी सामंजस्याने सोडवण्याचे प्रावधान सुध्दा त्यात अंतर्भूत आहे.

अमेरिकेत जनहित यचिकेचा प्रयोग यशस्वी होवून त्यास जनतेचा उत्स्फूर्त प्रतिसाद आणि मिळालेले यश ही भारतीय न्यायप्रक्रियेत जनहित याचिकेला प्राधान्य मिळवून देण्यासाठी 'प्रेरणा' ठरली यात संशय नाही. १९७६ च्या आणीबाणी (Emergency) नंतर स्व. इंदिरा गांधीचे केन्द्रीय सरकार कोसळले, आणि तेव्हापासूनच विकासात्मक बदल करण्यासाठी भारतीय न्यायव्यवस्थेत बदल प्रक्रियेला सुरवात झाली. परिणामी १९७७ साली भारत सरकारने राष्ट्रीय न्यायसंस्था समितीची (A Committee on National Judicature) स्थापना केली. या समितीचा अहवाल सरकारने स्वीकारून १९८० साली राष्ट्रीय विधिसहाय्य (Legal Aid) योजनेची अंमलबजावणी करण्यास सुरवात केली.

भारतामध्ये जनहित याचिकेला सर्वाधिक लोकप्रियता मिळवून देण्याचे श्रेय खऱ्याअर्थाने मा. सर्वोच्च न्यायालयाचे तत्कालीन **मा.न्या. भगवती** आणि **मा. न्या. कृष्णा अय्यर** यांनाच द्यावे लागेल. या संदर्भात त्यांनी एक पाऊल पुढे टाकून जनहितरक्षणार्थ वृत्तपत्रात आलेली बातमी अथवा एखाद्या व्यक्तीने सर्वोच्च न्यायालयाला लिहिलेले साधे पत्रसुध्दा जनहित याचिकेच्या अधिकारक्षेत्रात आणून फार मोठे योगदान दिले हे मान्य करावेच लागेल. विशेषतः **लोकस स्टॅण्डी** संबंधी

उदारात्मक सुधारणेचे समर्थन आणि अवलंब केल्यामुळे गोरगरीब, उपेक्षित आणि दुर्बल जनसामान्यांना उच्च न्यायालयात दाद मागण्यासाठी फार मोठा आधार मिळाला हे नाकारता येणार नाही. या सकारात्मक परिवर्तनामुळे बेताल आणि जुलमी शासकीय अधिकाऱ्यांच्या मनमानीला लगाम बसला ही वस्तुस्थिती आहे. या संदर्भात **प्रो. एस.पी. साठे** यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या सकारात्मक भूमिकेवर फार मार्मिक स्पष्टीकरण दिलेले आहे. ते म्हणतात :-

> **"(या निमित्ताने) मा. सर्वोच्च न्यायालयाने भारतीय संविधानातील व्यक्तिस्वातंत्र्य आणि न्यायिक समानता यासाठी केलेल्या कायदेशीर तरतुदींचा अन्वयार्थ लावताना उदारीकरणाची भूमिका घेतल्याने संविधानाच्या कलम २१ मधील "जीवन आणि व्यक्तिस्वातंत्र्य" या अधिकारांना व्यापक अर्थ प्राप्त झाला आहे. या उदार धोरणामुळे सुनावणी चालू असलेले अथवा सुनावणीविना कारागृहात खितपत पडलेले कैदी, कोवळी मुलें, बालगुन्हेगार, स्त्रियां यांचे व्यक्तिगत मूलभूत अधिकार, खटल्यांची गतिमान सुनावणी आणि कार्यक्षम व पारदर्शक राज्यव्यवस्था यांना आपोआप बळकटी प्राप्त झाली आहे. (पहा:- "हुसैनआरा खातून विरुध्द बिहार राज्य" प्रकरण (AIR 1979 SC 1360))"** [2]

'जनहित याचिका' ही जनहितासाठी, त्यांच्या मूलभूत अधिकारांचे रक्षण करण्यासाठी म्हणून दाखल केलेली सार्वजनिक तथा सामाजिक याचिका म्हणून ग्राह्य धरल्यामुळे भारतीय 'न्यायव्यवस्था आणि न्याय', हा सहजरित्या गोरगरीब आणि उपेक्षितांच्या आवाक्यात येवून त्याला कायदेशीर प्रमाण आणि प्रतिष्ठा मिळाली हे सत्य नाकारून चालणार नाही. यावरून ही गोष्ट स्पष्ट होईल की भारतात जनहित याचिकेच्या विकासासाठी खालील गोष्टी कारणीभूत ठरल्या आहेत :-

१) लोकस स्टॅण्डी (Locus standi) संदर्भात उदार धोरण स्वीकारून पूर्वी असलेले कडक नियम शिथिल करण्यात आले.

२) लोकहितरक्षणार्थ वृत्तपत्रात आलेली बातमी अथवा एखाद्या सामान्य नागरिकाने न्यायालयाकडे पाठवलेले साधे पत्रसुध्दा जनहित याचिकेच्या कृतिकक्षेत आणले गेले.

३) न्यायिक उपचार तथा उपाय यांचे खऱ्या अर्थाने लोकशाहीकरण केले गेले.

४) भारतीय संविधान अभिप्रेत, सामाजिक न्यायास जनहित याचिकेद्वारे तर्कशुध्द आणि कायदेशीर प्रामाण्य लाभले.

*टीप : लोकस स्टॅण्डी संदर्भात अवलंबिलेल्या उदार धोरणाचा परामर्ष पुढील प्रकरणात घेण्यात आलेला आहे.*

---

1. "Normally the requirement of Locus standi of a party to any litigation whether private or public action in relation to any specific remedy sought for, has to be ascertained at the threshold." ***(United States v/s Mr. Willson : (1960) 362 US IT)***

2. "The court i.e. the Supreme Court took an opportunity to expand the rights of the people through liberal interpretation of the constitutional provisions regarding right to equity and right to personal liberty. It gave expansive meaning to the words 'Life and personal liberty contained in Article 21 of the Constitution'. By such interpretation it recognised the right of under trial prisoners, prison inmates, children, juvenile delinquents etc. and right to privacy, speedier trial and right to efficient and transparent governances." ***(Hussainara Khatoon V. State of Bihar, AIR 1979 SC 1360)***

## २

# जनहित याचिका : व्याख्या आणि भाष्य

### (Definitions and Coments on PIL)

'जनहित' आणि 'जनहित याचिका' यांची व्याख्या ठरवताना आणि त्याचे योग्य ते मूल्यमापन करताना कायदेपंडितांनी, आणि न्यायालयांनी खालीलप्रमाणे भाष्य केले आहे :-

**व्याख्या :-**

- **जनहित (Public Interest)**
  - **Stroud's Judicial Disctonary** प्रमाणे 'जनहिताचा' अर्थ खालील प्रमाणे स्पष्ट केला आहे :-

    > "Public Interest" means, a matter in which a class of community have pecunary interest or some interest by which their lagal rights or liabilities are affected. (Volume - IV, 4th Edition)

  - **C.J. Campbell** यांनी जनहिताची व्याख्या करताना म्हटले आहे की :-

    > " In the context of justice "Public Interest" implies general interests that are associated with the community or society which affects the rights and liabilities of the people."

- **जनहित याचिका (Public Interest Litigation)**
  - सर्वोच्च न्यायालयाने "**जनतादल विरुध्द एच. एस. चौधरी** (AIR 1993 SC892(para -52))" प्रकरणी 'जनहित याचिकेची' व्याख्या खालीलप्रमाणे केली आहे :-

> Public Interest Litigation to mean " The Legal action initiated in a Court of Law for the enforcement of public interest in which public or class of the community have pecunary interest or some interest by which their legal rights or libilities are affected."

- फोर्ड फाउंडेशन (अमेरिका) या संस्थेने जनहित कायद्याचे स्पष्टीकरण देताना म्हटले आहे की :-

> "Public Interest Law is the name that has recently been given to efforts that provide legal representation to previously unrepresentated groups and interests. Such efforts have been undertaken in the recognition that ordinary marketplace for legal services fails to provide such services to significant segment of the population and to significant interests. Such groups and interests include the proper environmentalists, consumers, racial and ethnic minorities and others. "

वरील विवेचनावरून हे स्पष्ट होते की, ज्या कृतीमुळे सर्वसामान्य जनता, समाजातील उपेक्षित अथवा दुर्बल जातीजमातीचे कायदेशीर अधिकार आणि जबाबदाऱ्या यांना बाधा पोचत असेल आणि विशेषतः त्यांचे आर्थिक अथवा सामाजिक हितसंबंध धोक्यात येत असतील अशा अवैध कृतिविरुध्द न्यायसंस्थेने करावयाची पूरक न्यायदान व्यवस्था हीच "जनहित याचिकेची" मूळ संकल्पना आहे असे म्हणावे लागेल.

## ३

# पारंपरिक न्यायनिवाडा : उदारीकरण

**( Liberalisation of Adversarial Adjudication )**

जनहित याचिकेच्या माध्यमातून जनसामान्यांना अल्पखर्चिक आणि गतिमान न्यायनिवाडा देण्यासाठी, पारंपरिक क्लिष्ट न्यायपध्दतीचा पुनर्विचार करणे आणि त्याचे योग्यप्रकारे उदारीकरण करणे आवश्यक आहे याचे भारतीय न्यायव्यवस्थेला महत्व पटल्याने जनहित याचिका माध्यमाद्वारे एक पूरक आणि गतिमान न्यायदान अस्तित्वात येवू शकले यात दुमत होण्याचे कारण नाही. तथापि हे उदारीकरण समजून घेण्यापूर्वी पारंपरिक न्यायदान पध्दती आणि त्यांच्या मर्यादा जाणून घेणे महत्वाचे आहे.

केवळ वैय्यक्तिक वैमनस्य अथवा विरोधापोटी गुदरलेल्या दाव्याप्रसंगी न्यायदान करताना न्यायालयास कायद्याने घालून दिलेली बंधने आणि नेमून दिलेल्या काही मर्यादा पाळाव्या लागतात. अशावेळी संबंधित न्यायाधीशास वादी-प्रतिवादीची भूमिका आणि म्हणणे ऐकून घेताना एक निष्पक्ष निरीक्षक या नात्याने न्यायालयीन सुनावणीचे सर्व सोपस्कार पूर्ण करून कायद्याच्या कक्षेत राहून कुणावरही अन्याय होवू न देता फार काळजीपूर्वक न्यायदान करावे लागते.

खालील निकषांवरून अशा संघर्षपूर्ण परिस्थितीत न्यायदान करताना न्यायासनास पाळावयाच्या मर्यादा आणि कृतिकक्षा स्पष्ट होण्यास मदत होईल.

## प्रचलित/पारंपारिक न्यायनिवाडा प्रकरणी :-

१) खटल्यासंदर्भात वादी आणि प्रतिवादी यांच्या फक्त वैय्यक्तिक आणि न्यायिक अधिकारांचाच विचार केला जातो. त्यात जनसामान्यांच्या मूलभूत अधिकारांच्या हिताची, रक्षणाची जबाबदारी अंतर्भूत नसते.

२) **Locus standi** प्रकरणी प्रचलित कायदा काटेकोरपणे पाळला जातो. त्यामुळे ज्याच्यावर अन्याय झाला आहे फक्त अशाच व्यक्तीला कोर्टात दाद मागण्याचा अधिकार असतो, इतरांस नाही.

३) न्यायाधीशांचे कार्य निःपक्षपातीपणे न्यायदान करण्याचे असल्याने सुनावणी दरम्यान त्यांना पीडितांचा कैवारी अथवा संरक्षक म्हणून भूमिका घेता येत नाही.

४) वादी-प्रतिवादीस विधिसहाय्य, न्यायिक मदत अथवा तत्सम सहकार्य करणे अभिप्रेत नसते.

५) फक्त संबंधित पीडितालाच दिलासा-न्याय मिळू शकतो, इतरांस नाही.

६) वैय्यक्तिक स्वार्थापोटी बहुतांशी श्रीमंत आणि कावेबाज व्यक्तीच, न्यायालयाकडे वारंवार धाव घेताना दिसून येतात. कारण पारंपरिक न्याय प्रक्रिया फार क्लिष्ट आणि खर्चिक असल्याने ती गोरगरीबांच्या खिशाला परवडत नाही. सहाजिकच ते न्यायापासून कायम वंचित राहतात, या वस्तुस्थितीचे न्यायासनास सदैव भान ठेवावे लागते.

नेहमीच्या क्लिष्ट आणि जाचक न्यायप्रणालीपासून जनसामान्य मुक्त होण्यासाठी जनहित याचिकेच्या माध्यमातून न्यायनिवाडा सुलभ आणि गतिमान होईल याची खात्री पटल्याने जनहित याचिकेच्या समर्थनार्थ १९८२ साली सर्वोच्च न्यायालयाने **"पिपल्स युनियन फॉर डेमोक्रेटिक राईट्स विरुध्द भारत सरकार (एशियाड)"** प्रकरणी (AIR 1982 SC 1473) केलेले भाष्य महत्वाचे ठरावे :-

> **"गरीब आणि श्रमजीवी जनतेच्या हितासाठी त्यांचे हितरक्षक म्हणून न्यायालयांना भूमिका निभावण्याची वेळ आलेली आहे. शतकानुशतके जुलमी समाजव्यवस्थेने न्याय नाकारलेल्या दीनदुबळ्या आणि उपेक्षित समाजाच्या व्यथा ओळखून त्यांना न्याय मिळवून देण्याचे काम यापुढे न्यायालयास करणे भाग आहे. जनहित याचिकेच्या माध्यमातून अशा पिचलेल्या जनतेच्या प्रश्नांना वाचा फुटून ते ऐरणीवर आल्यामुळे न्यायदानाच्या प्रक्रियेत सकारात्मक आणि सक्रिय बदल होत आहेत. यामुळे भविष्यात गतिमान न्याय गोरगरीबांच्या अजून जवळ पोचेल यात दुमत होण्याचे कारण नाही."** [1]

1. "The time has now come when the court must become the courts for poor and the struggling masses of the country. They must shed their character as upholders of the established order and the "status quo". They must be sensitised to the need of doing justice to the large masses of people to whome the justice has been denied by a cruel and heartless society for generations. It is through public interest litigation that the problems of the poor are now coming to the forefront and the entire theatre of the Law is changing, it holds out great possibilities for the future."

***(People's Union for Democratic Rights v/s Union of India (Asiad Workers) AIR 1982 SC 1473)***

# ४

# लोकस स्टॅण्डी : उदारीकरण

## (Liberalisation of Locus standi)

कायद्याच्या भाषेत सांगावयाचे झाल्यास, न्यायासनासमोर आपली बाजू मांडून न्याय मागण्याचा अधिकार प्राप्त असलेली व्यक्ती ही **Locus standi** म्हणून ओळखली जाते.

फार पूर्वीपासून **Locus standi** प्रकरणी कायद्याने ठरवून दिलेली पात्रता अनिवार्य असल्यामुळे सामान्य माणसाला इतरांच्या हितासाठी न्यायालयात दाद मागता येत नव्हती. थोडक्यात फक्त ज्याच्यावर अन्याय झाला आहे अथवा ज्यास पीडा/दुःख पोचले आहे अशीच व्यक्ती स्वत: वादी अथवा प्रतिवादी (**Locus standi**) म्हणून कोर्टासमोर दाद मागू शकत असे.

जनहित याचिका या पूरक गतिमान न्यायदानासाठी **"लोकस स्टॅण्डी"** ची पात्रता हा न्यायव्यवस्थेसाठी फार मोठा अडथळा होता. त्यामुळे यातून मार्ग काढण्यासाठी, **Locus standi** प्रकरणी सकारात्मक आणि उदार धोरण ठरवण्याची आवश्यकता भासू लागली. याकामी सर्वोच्च न्यायालयाने पुढाकार घेवून जनहित याचिकेसाठी कायद्यात योग्य तो बदल केल्यामुळे **Locus standi** संबंधी असलेले पूर्वीचे कठोर नियम शिथिल झाले आणि एकूणच ही पूरक न्यायप्रक्रिया सोपी आणि सुलभ झाली हे मान्य करावे लागेल.

भारतीय नागरिकांना दिलासा देणाऱ्या या सकारात्मक आणि उदार धोरणाचे सारे श्रेय सर्वोच्च न्यायालयास जाते. या उदार धोरणामुळे न्यायतत्वशास्त्रात नवीन अध्याय सुरू होवून भारतीय न्यायव्यवस्थेत मानवी अधिकाराला प्राधान्य मिळाले ही उपलब्धी नाकारता येत नाही. या सकारात्मक धोरणाचा फायदा लवकरच दिसून आला, हे खालील विवेचनावरून स्पष्ट होईल :-

• "बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र विरुध्द एस.व्ही. दाभोळकर ((1976) 1 SCR 306)" या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाचे तत्कालीन न्यायमूर्ती मा. श्रीकृष्ण अय्यर यांनी दिलेला निवाडा आणि त्यावर केलेले भाष्य महत्वाचे ठरावे:-

> "समाजातील दुर्बलघटक, अशिक्षीत, उपेक्षित आणि गोरगरीबांना त्यांचे सामाजिक, आर्थिक आणि संविधानिक हक्क मिळवून देण्यासाठी धडपड करणाऱ्या एखाद्या सामाजिक कार्यकर्त्यालासुध्दा जनहित याचिका दाखल करण्याचा अधिकार आहे. त्यासाठी अर्जदाराचा संबंधित याचिकेशी प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष संबंध असणे आवश्यक नाही." [1]

• "मनेका गांधी विरुध्द भारत सरकार (AIR 1976 SC 597)" या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने भारतीय संविधान कलम २१ चा व्यापक अन्वयार्थ लावताना म्हटले आहे :-

> "संविधान कलम-२१ याचा शब्दशः अर्थ लावायचा प्रयत्न केल्यास तो 'राज्यसरकारला एखाद्या व्यक्तीविरुध्द (काही अपवादात्मक प्रसंगी) त्याचे वैय्यक्तिक स्वातंत्र्य आणि जीवनात हस्तक्षेप करण्याचा कायदेशीर अधिकार असू शकतो' असा होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तथापि त्याचे विस्तृत स्पष्टिकरण करावयाचे झाल्यास सरकारचा कायदेशीर अधिकार आणि वापर हा अत्यंत वाजवी आणि न्याय्यपध्दतीनेच करावयास हवा. त्यात किंचितही लहरी, जुलमी अथवा सूडाची भावना असता कामा नये." [2]

• "हुसैनारा खातून विरुध्द बिहार राज्य या प्रकरणी (AIR 1979 SC 360)" १९७९ साली सर्वोच्च न्यायालयाने **Locus standi** संदर्भात कार्यकक्षा अजून विस्तृत आणि सकारात्मक केल्याचे दिसून येईल.

बिहारमधील एका वकीलाने राज्यातील तुरुंगांची दयनीय अवस्था आणि सुनावणीशिवाय वर्षानुवर्षे खितपत ठेवलेल्या हजारो कैद्यांसंबंधी वृत्तपत्रात आलेल्या एका बातमीकडे सर्वोच्च न्यायालयाचे लक्ष वेधले. बातमीचे गांभीर्य ओळखून जनहित

याचिका दाखल करून घेताना न्यायालयाने सुनावणीशिवाय वर्षानुवर्षे तुरुंगात डांबून ठेवलेल्या कैद्यांची दुरावस्था पाहून बेताल आणि जुलमी तुरुंगव्यवस्थेबद्दल तीव्र चिंता आणि नाराजी व्यक्त केली. या प्रकरणी बिहार सरकारवर सणसणीत आसूड ओढताना मा. न्यायालयाने म्हटले आहे की :-

> **“सुनावणीविना वर्षानुवर्षे एखाद्या व्यक्तीस कारागृहात डांबून ठेवणे बेकायदेशीर असून तसे कृत्य संबंधित व्यक्तीच्या संविधानिक अधिकाराचे (कलम-२१) हेतुपुरस्सर उल्लंघन ठरते. गतिमान सुनावणी ही प्रत्येक आरोपीचा संविधानिक अधिकार असून आर्थिक अथवा व्यवस्थापकीय असमर्थतेच्या नावाखाली राज्यसरकार याबाबतीत स्वतःची नैतिक जबाबदारी टाळू शकत नाही.”** [3]

न्यायालयाचा दणका बसल्याबरोबर बिहार सरकारला खडबडून जाग आली आणि सरकारला १९८१ साली तब्बल १८००० कैद्यांची बिनशर्त सुटका करावी लागली हे सद्यपरिस्थितीत अनाकलनीय वाटत असले तरी ते कटुसत्य आहे. न्यायालयाच्या हस्तक्षेपामुळे वर्षानुवर्षे सुनावणीशिवाय खितपत पडलेल्या हजारो कैद्यांना उशिरा का होईना न्याय मिळाला हे न्यायव्यवस्थेचे योगदान नाकारून चालणार नाही.

मा. सर्वोच्च न्यायालयाने **Locus standi** संदर्भात दिलेल्या वरील निवाड्यांवरून हे स्पष्ट होईल की जनहित याचिके संदर्भात न्यायदान करताना त्यातील आशय आणि विषय लक्षात घेवून न्यायव्यवस्थेने उदार धोरण ठेवले आहे आणि खऱ्याअर्थाने अंमलात आणले आहे ही फार समाधानाची गोष्ट आहे.

जनहित याचिका ही न्यायालयीन प्रक्रियेचाच एक अविभाज्य भाग असल्यामुळे **Locus standi** संदर्भात न्यायसंस्थेस उदार दृष्टीकोन ठेवणे अपरिहार्य ठरले ही फार मोठी सकारात्मक न्यायालयीन उपलब्धी म्हणावी लागेल.

---

1. “A public spiritual litigant should have a right to file a writ petition for making justice available to the weaker section of the community who are down-trodden,

ignorant, illiterate, and are deprived of their right to social, economic and political justice, even if the petitioner does not have any direct or indirect interest in the case." ***(Bar Council of Maharashtra v/s S.V. Dabholkar : (1976) 1 SCR 306)***

2. "When literally read, it empowers the state to interfere with the enjoyment of life and liberty of a person according to procedure establish by law, but giving a wider interpretation to this term, the court held it impliedly includes "due processes" as well, that is the procedure established by law must be fair and reasonable and not arbitrary or vindictive." ***(Maneka Gandhi v/s Union of India : AIR 1976 SC 597)***

3. "Incarceration of undertrials who had virtually spend their whole period of sentence was clearly illegal and blatant violation of their fundamental rights guaranteed under Article 21 of the Constitution. "Speedy trial" is a constitutional mandate and state can not avoid its constitutional obligations by pleading financial or administrative inability." ***(Husainara Khatoon v/s State of Bihar : AIR 1979 SC 360)***

५

# जनहित याचिका : संकल्पना आणि उद्देश

## (Concept & Objects of Public Interest Litigation)

### • संकल्पना (Concept) :

जनसामान्यांच्या हिताचे आणि त्यांच्या संविधानिक अधिकारांचे संरक्षण करणे हा 'जनहित याचिकेचा' मूळ गाभा आहे. अल्पखर्चिक आणि गतिमान न्यायदान व्यवस्थेच्या माध्यमातून मागासवर्गीय, उपेक्षित, अशिक्षित, गोरगरीब, अल्पसंख्यांक यांच्या सामाजिक, आर्थिक आणि मानवी अधिकारांचे जतन होईल, त्यांना त्वरित न्याय मिळेल अशी व्यवस्था करणे व त्याचबरोबर जनतेच्या वैधानिक आणि संविधानिक अधिकाराची पायमल्ली होत असेल अशावेळी हस्तक्षेप करून पीडितांना आणि समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना सुयोग्य व त्वरित न्याय मिळेल अशी व्यवस्था करणे ही जनहित याचिकेची मूळ संकल्पना आहे. म्हणूनच नागरिकांच्याहितास बाधा पोचेल अशी कृती झाल्याप्रकरणी न्यायालयास 'जनहित याचिका' दाखल करून घेण्याचा अधिकार प्राप्त आहे.

जनहित याचिकेद्वारे या वैकल्पिक न्यायदानाची संकल्पना, महत्व व उद्देश स्पष्ट करताना सर्वोच्च न्यायालयाने **बंधुआ मुक्तीमोर्चा विरुध्द युनियन ऑफ इंडिया प्रकरणी** (AIR 1984 SC 802) अधोरेखित केलेले आहे की :-

> **"गोरगरीब, उपेक्षित आणि समाजातील दुर्बलघटक, आपल्या संविधानिक अधिकाराच्या संरक्षणार्थ कोर्टात जावून दाद मागण्यासाठी असमर्थ असल्याने जनहित याचिका प्रकरणी वादी-प्रतिवादी, राज्यसरकार-सरकारी अधिकारी आणि न्यायालय यांच्या सक्रिय सहभागाने खटला चालवला जातो. अशावेळी परस्परांना प्रामाणिकपणे सहकार्य करण्याची, या सर्वांवर संविधानात्मक आणि नैतिक जबाबदारी आहे."** [1]

## • उद्देश (Objects) :

वरील संकल्पनेच्या पार्श्वभूमीवर जनहित याचिकेचे प्रमुख उद्देश कोणकोणते आहेत याचे स्पष्टीकरण खालीलप्रमाणे विशद करता येईल :-

१) भारतीय नागरिकांच्या वैय्यक्तिक, वैधानिक, संविधानिक आणि मानवी अधिकाराचे रक्षण करण्यासाठी न्याय यंत्रणा वापरणे.

२) न्यायापासून वंचित असणाऱ्या समाजातील गोरगरीब, उपेक्षित, मागासवर्गिय आणि दुर्बल घटकांपर्यंत न्याय पोचवणे.

३) नेहमीच्या न्यायालयीन क्लिष्टप्रक्रिया टाळून अल्पखर्चात गतिमान पध्दतीने न्यायनिवाडा करणे.

४) वादी-प्रतिवादी, सरकारी-सार्वजनिक अधिकारी आणि न्याययंत्रणा यांना एकत्र आणून परस्पर सहकाराने जनतेच्या समस्या-तक्रारींचे निराकरण करून यथोचित न्यायनिवाडा करणे.

५) न्यायनिवाड्यांची अंमलबजावणी राज्यसरकार व्यवस्थितपणे आणि सक्तीने करते आहे की नाही यावर नजर ठेवणे, संबंधितांना कडक सूचना/आदेश देणे, आणि प्रसंगी कारवाई करणे.

६) काही अपरिहार्य प्रसंगी अर्जदाराकडून ठराविक कालमर्यादेत जनहित याचिका दाखल करण्यास विलंब झाला असेल तर त्याची सखोल चौकशी करून झालेला विलंब समर्थनीय वाटल्यास जनहित याचिका दाखल करून घेवून न्यायनिवाडा करणे.

७) जनहित यचिका दाखल करून घेण्यापूर्वी विषयाची ग्राह्यता आणि अग्राह्यता तपासून पाहणे.

८) अर्जदार हेतूपुरस्सर जनहित याचिकेच्या माध्यमातून न्यायप्रणालीचा दुरुपयोग तर करीत नाही ना? याची खातरजमा करून घेणे.

९) कायद्याचा उद्देश आणि संदर्भित न्यायनिवाडा एकमेकांस पूरक आहेत याची खातरजमा करून घेणे.

वरील विवेचनावरून हे स्पष्ट होईल की जनहित याचिकेच्या माध्यमातून अल्पखर्चिक आणि गतिमान पध्दतीने न्यायनिवाडा सामान्यजनांच्या आवाक्यात आणणे हीच या कायद्याची मूळ संकल्पना आणि प्रमुख उद्देश आहे. या वैकल्पिक प्रक्रियेमुळे कधी नव्हे तो न्याय गोरगरीबांच्या दाराजवळ नेण्याची किमया साध्य झाली आहे. त्यामुळे भारतीय न्यायव्यवस्थेने पूरक आणि गतिमान न्यायदानासाठी जनसामान्यांच्या हाती **'जनहित याचिका'** हे एक प्रभावी अस्त्र प्रदान केले आहे हे म्हणणे अतिशयोक्ती ठरू नये.

---

1. "PIL is a co-operative litigation in which the petitioner, the state or public authority and the court are to co-operate with one another in ensuring the constitutional obligation towards those who can not resort to court for the protection of their constitutional or legal rights."

   ***(Bandhua Mukti Morcha v/s Union of India : AIR 1984 SC 802)***

## ६

# जनहित याचिका : प्राथमिक आक्षेप आणि अधिकारक्षेत्र

**(Preliminary Objections And Jurisdiction)**

### • प्राथमिक आक्षेप (Objections) :

बऱ्याचवेळा **'जनहित याचिका'** दाखल करताना अथवा दाखल करून घेण्यापूर्वीच प्रतिवादीतर्फे खुद्द न्यायालयाच्या अधिकारक्षेत्रालाच आक्षेप घेतला जावू शकतो. याचिकेसंबंधी न्यायालयाच्या अधिकारक्षेत्राला आक्षेप घेताना प्रतिवादीच्या वकीलांकडून प्रामुख्याने खालील मुद्यांवर युक्तिवाद केला जातो :-

१) सदर याचिकेत वादीच्या संविधानात्मक अधिकाराचे उल्लंघन होत नाही, अथवा त्यात कोणत्याही प्रकारचा कर्मचारी अथवा मजूरांच्या हक्कांची पायमल्ली होत नसल्याने संविधानाच्या कलम ३२ च्या तरतुदी प्रस्तुत प्रकरणी लागू होत नाहीत. सबब प्रस्तुत याचिका कोर्टाच्या अधिकारक्षेत्रात बसत नाही.

२) प्रस्तुत प्रकरणी प्रचलित न्यायप्रणाली उपलब्ध असून वादीला योग्य न्यायालयात दाद मागता येवू शकते. सबब सदर याचिकेवर विचार करण्याचा कोर्टाला अधिकार नाही.

३) याचिकेचा विषय जनहिताशी निगडित नसल्यामुळे एखादे साधे पत्र, बातमी अथवा विनंती अर्ज 'दावा' म्हणून दाखल करून घेण्याचा या न्यायालयाला अधिकार नाही.

४) प्रस्तुत प्रकरणातील विषय भारतीय संविधानाच्या कलम ३२ अंतर्गत येत नसल्यामुळे प्राथमिक छाननी अथवा तपासणी करण्यासाठी चौकशी समिती-आयोग नेमण्याचा न्यायालयास अधिकार नाही.

वरील आक्षेपासंदर्भात **"बंधुआ मुक्ती-मोर्चा विरुध्द भारत सरकार"** हे प्रकरण AIR 1984 SC-802 महत्वाचे ठरावे. सदरप्रकरणी सर्वोच्च न्यायालयाचे तत्कालीन न्यायमूर्ती **मा. श्री. ए.एन.सेन** यांनी प्रतिवादीचे वरील सर्व युक्तिवाद फेटाळून लावताना म्हटले आहे की :-

> **"वादी ही समाजातील उपेक्षितांच्या, पीडितांच्या कल्याणार्थ झटणारी समाजसेवी संस्था असून संविधानाच्या कलम २३ अन्वये वेठबिगारी कायद्याने प्रतिबंधक आहे. भारतीय संविधानाच्या कलम ३२ अन्वये वेठबिगारांसाठी दाद मागण्याविषयी याचिका दाखल करून घेण्याचा कोर्टाला पूर्ण अधिकार आहे. एखाद्या प्रकरणी जनसामान्यांचे हितसंबंध धोक्यात येत असतील तर तत्संबंधी न्यायालयापुढे आलेले एखादे साधे पत्र अथवा वृत्तपत्रात आलेली बातमीसुध्दा याचिका म्हणून दाखल करून घेण्याचा न्यायालयास अधिकार आहे. त्याचबरोबर सामाजिक हिताच्या रक्षणासाठी महत्वाच्या अथवा संवेदनशील प्रकरणी चौकशी समिती-आयोग नेमण्याचा कोर्टाला स्वयंसिध्द अधिकार आहे."**

## • अधिकारक्षेत्र (Jurisdiction) :

जनसामान्यांच्या हितरक्षणासंबंधी खालील प्रकरणी कोर्टाकडे आलेले साधे पत्र अथवा वृत्तपत्रातील बातमीसुध्दा जनहित याचिका म्हणून दाखल करून घेण्याचा न्यायालयास अधिकार आहे :-

१) शासन अथवा शासकीय अधिकारी यांच्याकडून त्यांच्या कर्तव्यात हलगर्जीपणा घडला असेल अथवा त्यांच्याकडून जनसामान्यांना सापत्नभावाची वागणूक देण्यात येत असेल तर.

२) एखाद्या कैद्याला जामीन (Bail) मिळवण्याची शक्यता असूनसुध्दा त्याची जामीनावर सुटका होत नाही या अर्थाचे जामीन मंडळाद्वारे (Parole Board) तक्रारपत्र पाठवले गेले असेल तर.

३) पोलीस कोठडीत कैद्याला बेदम मारहाण अथवा त्याचा अमानुषपणे शारीरिक छळ होत असेल तर.

४) कमीतकमी जीवनावश्यक सुविधांपासून कैद्यांना वंचित ठेवलले असेल तर.

५) समाजकंटकांद्वारे स्त्रियां आणि मुलें यांच्यावर अत्याचार होत असतील, त्यांची पिळवणूक होत असेल तर.

६) तपासकामात पोलिसांकडून अक्षम्य दिरंगाई अथवा हलगर्जीपणा होत असेल तर.

७) बालगुन्हेगारांच्या सुधारकेन्द्रात अत्यावश्यक शैक्षणिक सुविधा पुरवल्या जात नसतील तर.

८) शाळेत मुलांच्या शरीरस्वास्थ्यासाठी स्वच्छतागृहे, वाचनालय, खेळांच्या सुविधा पुरवल्या नसतील तर.

९) महाविद्यालयीन प्रवेश प्रक्रियेत अनियमितता अथवा भ्रष्टाचार होत असेल आणि अथवा नव्याने दाखल झालेल्या विद्यार्थ्यांची वरिष्ठ वर्गातील विद्यार्थी छळवणूक (Ragging) करत असल्याचे निदर्शनास आले तर.

१०) वधुपित्याकडे हुंडा मागणी अथवा तगादा होत असेल तर.

११) स्वातंत्र्य सैनिकांच्या निवृत्ती वेतनासंबंधी तक्रार असेल तर.

१२) प्राचीन आणि सांस्कृतिक स्मारकांचे संरक्षण केले जात नसेल तर.

*(टीप : वरील यादी परिपूर्ण नसून स्पष्टीकरणात्मक आहे.)*

## ७

# जनहित याचिका : निकष आणि कार्यपध्दती

**(Criterias & Procedure of Public Interest Litigation)**

आपल्यासारख्या खंडप्राय प्रजासत्ताक देशासाठी भारतीय न्यायव्यवस्था ही लोकशाहीचा तृतीय स्तंभ म्हणून ओळखली जाते. अर्वाचीन न्यायव्यवस्था ही भारतीय संविधानाने नागरिकांना बहाल केलेली सर्वोत्तम देणगी आहे. भारतीय संविधानात संघराज्यवादी संसदीय शासनव्यवस्था (Federal Parliamentary Form of Governmant) अभिप्रेत असून त्यात सरकारी अधिकारी (Executives) कायदेमंडळ (Legislature) आणि न्यायव्यवस्था (Judiciary) यांची भूमिका, अधिकार, कृतिक्षेत्र आणि कार्यसीमा स्पष्ट केलेल्या आहेत.

भारतीय संविधानानुसार भारतीय न्यायव्यवस्था ही स्वायत्तसंस्था असून निःपक्ष न्यायदानाबरोबर संविधानिक कायदेकानून यांचा अन्वयार्थ लावणे, स्पष्टीकरण देणे, उकल करणे व त्याचबरोबर नागरिकांच्या मूलभूत अधिकारांचे रक्षण करणे आणि जनकल्याणासाठी वेळेवर हस्तक्षेप करणे ही न्यायपालिकेची प्रमुख कर्तव्ये आहेत. अशावेळी सामान्य नागरिक आणि अल्पसंख्यांकाच्या मूलभूत अधिकारांचे रक्षण करण्यासंदर्भात आपल्या न्यायव्यवस्थेने फार मोठे आणि मौलिक योगदान दिलेले आहे हे कदापि विसरून चालणार नाही.

## ● जनहित याचिका : निकष (Criterias of PIL)

जनहित याचिकेसाठी सर्वोच्च न्यायालयाने **Locus standi** संदर्भात उदार धोरण अंमलात आणल्यामुळे भारतीय संविधानाच्या कलम-३२ अन्वये, प्रामाणिक जनसेवक अथवा सामाजिककार्य करणाऱ्या संस्थाना काही विशिष्ट प्रकरणी इतरांच्यावतीने जनहितार्थ याचिका दाखल करण्याची मुभा सर्वोच्च न्यायालयाने दिलेली आहे. 'जनहित याचिका' या पूरक न्याय विकल्पाची कार्यपध्दती खालील निकषांवर बेतलेली आहे :-

१) निःपक्षपाती निवाडा मिळू शकेल याची व्यवस्था करणे.

२) **Locus standi** प्रकरणी उदार धोरण कायम ठेवणे.

३) भारतीय संविधानाच्या कलम ३२ अन्वये, सर्वोच्च न्यायालयाने समाजसेवी कार्यकर्ता आणि अथवा सामाजिक सेवा-संस्था/मंडळे यांना सामान्य नागरिकांच्यावतीने जनहित याचिका दाखल करण्याची परवानगी देणे.

४) संविधानाच्या कलम २२६ अन्वये जनहितार्थ केलेल्या याचिका उच्च न्यायालयाने दाखल करून घेणे.

५) खटल्याच्या सुनावणी अगोदर कोर्टाच्या कृतिक्षेत्राबद्दल कुणाचे आक्षेप असतील तर त्याचे निराकरण करणे.

६) एखाद्या वृत्तपत्रात जनहितासंबंधी आलेली विशेष बातमी अथवा सामान्य नागरिकाने पाठवलेले साधे पत्रसुध्दा जनहित याचिका म्हणून योग्य आहे याची खात्री करून, वरिष्ठ न्यायालयाने ती बातमी अथवा पत्र 'जनहित याचिका' म्हणून दाखल करून घेणे व त्यासंदर्भात सुनावणी सुरू करणे.

७) सुनावणी दरम्यान काही विशिष्ट प्रकरणी न्यायालयास आवश्यकता वाटल्यास सरकारी यंत्रणेस पुढील तपास अथवा चौकशी संदर्भात योग्य त्या सूचना आणि हूकूम जारी करणे.

८) खटल्याची सुनावणी पूर्ण करून यथोचित न्यायनिवाडा देणे.

## • जनहित याचिका : कार्यपध्दती (Procedure of PIL)

जनहित याचिका प्रकरणी, नेहमीच्या किचकट आणि क्लिष्ट न्यायपध्दतीचे शब्दशः अथवा तंतोतंत पालन करण्याचे न्यायालयावर बंधन नसते. जनसामान्यांच्या संविधानिक अधिकाराचे रक्षण करण्यासाठी, त्यांना गतिमान पध्दतीने न्याय मिळवून देण्यासाठी परंपरागत, रूढ आणि कठोर न्यायपध्दती बाजूला ठेवून जनहित याचिके संदर्भात त्या त्या प्रकरणी नियम शिथिल करण्याचे अधिकार न्यायालयास असतात. जनहित याचिका दाखल करून घेताना कार्यपध्दतीत सर्वसाधारणपणे खालील नियमांची पूर्तता झालेली आहे याची खातरजमा करून घेवून न्यायालयीन कार्यवाही सुरू केली जाते :-

१) न्यायालयाकडे आलेली याचिका दाखल करूनघेण्यापूर्वी सर्वप्रथम संबंधित अर्जदाराने याचिकेसाठी दिलेली, पुरवलेली माहिती ही अस्सल, खरी आणि विश्वासनीय असून संबंधित सूत्रांकडून पडताळून पाहिली गेली आहे या आशयाचे, सक्षम अधिकाऱ्यासमक्ष शपथेवर दिलेले प्रतिज्ञापत्र (Affidavit) आणि त्याचबरोबर 'सदर माहिती खोटी अथवा अविवेकी आढळून आल्यास त्यासाठी मी सर्वस्वी जबाबदार राहीन' असे हमीपत्र (Undertaking) जोडले आहे याची खातरजमा केली जाते. थोडक्यात अर्जदाराने मनात कसलाही आकस, द्वेष अथवा स्वार्थ न बाळगता निर्मळमनाने कोर्टाकडे दाद मागितली आहे हे त्यास न्यायालयास पटवून द्यावे लागते.

२) जनसामान्यांच्या मूलभूत अधिकारांचे रक्षण करण्यासाठी आणि संबंधिताना योग्य तो न्याय मिळवून देण्यासाठी सदर याचिकेची खरोखर आवश्यकता आहे अशी न्यायालयाची खात्री पटल्यासच याचिका दाखल करून घेतली जावू शकते.

३) याचिका दाखल करून घेण्यापूर्वी विनंतीअर्जासोबत अर्जदाराने आवश्यक असलेली सर्व कागदपत्रे व दस्तावेज जोडले आहेत याची खात्री करणे.

४) प्रस्तावित जनहित याचिका संदर्भात काही संविधानिक पूर्ततेची आवश्यकता असेल तर ती प्रक्रिया पूर्ण झाल्यावरच योग्य वाटेल त्या पध्दतीने विनंतीअर्जाचा विचार करण्याची न्यायालयास मुभा आहे.

५) संदर्भित याचिकेच्या सुनावणीसाठी नैसर्गिक न्यायाला अनुसरून जी पध्दत ठरवली असेल त्यानुसार वादी आणि प्रतिवादी यांना त्यांची बाजू मांडण्याची समान संधी देणे न्यायालयावर बंधनकारक आहे.

६) जनहित याचिका संदर्भात अर्ज करण्यापूर्वी, अर्जदारावर सदर प्रकरणी जनसामान्यांवर झालेल्या/होत असलेल्या अन्यायाविषयी संबंधित अधिकाऱ्यांना निवेदन देवून त्यावर त्वरित उपाय योजना करण्याची विनंती करणे, त्यासाठी स्मरणपत्रे लिहिणे व त्यासंबंधात कारवाई होते की नाही याची काही काळ वाट पहाणे बंधनकारक आहे. अर्जदाराने सदर प्रक्रिया

पूर्ण केलेल्या असून संबंधित अधिकाऱ्यांकडून कुठलाच प्रतिसाद मिळत नाही याची खातरजमा झाल्यावरच न्यायालय याचिका दाखल करून घेण्यासाठी आज्ञा देवू शकते.

७) जनहिताच्यादृष्टीने याचिका प्रकरण उचित आणि योग्य वाटल्यास **Locus standi** संबंधी नियम शिथिल करण्याचे न्यायालयास आधिकार आहेत.

८) जनहित याचिका दाखल करून घेतल्यानंतर वादीने दिलेले प्रतिज्ञापत्र आणि हमीपत्र यांच्या आधारावर संबंधित प्रतिवादींना कोर्टातर्फे नोटिसा पाठवल्या जातात. त्यांचे नोटिशीला दिलेले उत्तर मिळाल्यानंतरच जनहित याचिका प्रकरणी सुनावणी सुरू होते.

९) संबंधित याचिका प्रकरणी प्रतिवादीने अजून काही तपशील, अथवा दस्तऐवजाची मागणी केल्यास व ती योग्य वाटल्यास ती पुरवण्यासंबंधी कोर्टातर्फे वादीला अथवा संबंधितांना तसे आदेश दिले जातात.

१०) वादीच्या प्रतिज्ञापत्रातील विधानांवर आपलीबाजू मांडण्यासाठी प्रतिज्ञापत्र सादर करण्यासाठी न्यायालय प्रतिवादीस त्याप्रमाणे आदेश देवू शकते.

११) याचिकाकर्ता गरीब अथवा आर्थिकदृष्ट्या कमकुवत असेल तर अशावेळी सदर अर्जदाराला "तुमची बाजू मांडण्यासाठी कार्यक्षम वकील उपलब्ध आहे का?" अशी विचारणा केली जाते. मुख्यत्वे फौजदारी प्रकरणी अशा गरीब अर्जदाराला निःशुल्क विधी मदत आणि सहाय्यता पुरवण्यासाठी न्यायालय राज्य सरकारला तसे आदेश देवू शकते.

१२) वादी-प्रतिवादी, साक्षीदार यांचे जबाब नोंदणी पूर्ण झाल्यावर जनहित याचिकेची न्यायालयीन सुनावणी प्रक्रिया पूर्ण होते आणि त्यानंतर न्यायासनातर्फे न्यायनिवाडा दिला जातो.

*टीप : जनतेच्या आणि वृत्तवाहिनींच्या माहितीसाठी जनहित याचिकेची सुनावणी संदर्भित न्यायालयात आठवड्यातून ठरवून दिलेल्या दिवशीच केली जाते.*

# जनहित याचिका : ग्राह्य आणि अग्राह्य विषय

## (Acceptable & Non Acceptable Issues under PIL)

समाजातील जनसामान्य, गोरगरीब, उपेक्षित आणि दुर्बल घटकांना त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाविरुध्द दाद मागण्यासाठी जनहित याचिका हा सर्वोत्तम पर्याय ठरला आहे. तथापि जनहित याचिका प्रकरणी त्यात असंख्य समस्या अंतर्भूत असल्याने त्यांचे ठराविक पध्दतीने वर्गीकरण करणे शक्य होत नसल्याने याचिकेसंदर्भात ग्राह्य आणि अग्राह्य विषय कोणते आहेत याचे स्पष्टीकरण देण्यात आलेले आहे. त्यानुसार खालील प्रकरणी न्यायालयाकडून जनहित याचिका दाखल करून घेतली जावू शकते.

### ● जनहित याचिका : ग्राह्य विषय-समस्या :-

**(Acceptable Issues under PIL)**

१) मानवाधिकार आणि संविधानिक मूलभूत अधिकारांचे उल्लंघन झाल्या प्रकरणी.

२) वेठबिगारांच्या समस्या आणि अथवा अन्याय झाल्या प्रकरणी.

३) कामगारांना किमान वेतन देण्यास नकार, कंत्राटी कामगारांची पिळवणूक आणि कामगार कायद्याचे उल्लंघन (वैय्यक्तिक वाद सोडून) झाल्या प्रकरणी.

४) तुरुंग व्यवस्थापनातील गैरव्यवहार-कारभार, कैद्यांची छळवणूक तसेच प्रलंबित सुनावणी आणि अथवा सुनावणीशिवाय कैद्यांना भोगाव्या लागणाऱ्या कारावास प्रकरणी.

५) उपेक्षित बालक आणि कोवळ्या मुलांवरील अत्याचार प्रकरणी.

६) पोलीसांच्या ताब्यात असलेल्या आरोपींचा अमानुष छळ करून कैद्यांच्या मूलभूत मानवाधिकाराचे उल्लंघन झाल्या प्रकरणी.

७) स्त्रियांवरील अत्याचर, हुंडाबळी, विवाहितेचे आत्मदहन आणि अथवा तिला जिवंत जाळणे, अशा प्रकरणी.

८) अनुसूचित जाती-जमाती आणि समाजातील दुर्बल घटक यांची छळवणूक, नाडणूक करणे आणि अथवा वर्णद्वेष पसरवणे अशा प्रकरणी.

९) पर्यावरण रक्षण, प्रदूषण, अन्नधान्यात भेसळ, अवैध जंगलतोड, वन्य पशु-पक्षी आणि वन संरक्षण, प्राचीन संस्कृती आणि स्मारकांचे जतन, या संदर्भात असलेल्या कायद्यांच्या उल्लंघन प्रकरणी.

१०) सार्वजनिक दंगल, जाळपोळ, जातीय-वर्णविद्वेष यातून उद्भवलेल्या सामाजिक समस्यांप्रकरणी.

११) अपवादात्मक परिस्थितीत कौटुंबिक निवृत्तीवेतन प्रकरणी.

१२) शासकीय आणि सार्वजनिक संस्था, आणि त्यांच्या अधिकाऱ्यांकडून होणारा गैरव्यवहार आणि भ्रष्टाचार झाल्या प्रकरणी.

१३) प्रचलित न्यायपध्दतीप्रमाणे न्याय उपलब्ध होवू शकत नसेल अशा प्रकरणी.

*टीप : वरील यादी स्पष्टीकरणात्मक असून जनहित रक्षणार्थ काही विशिष्टप्रसंगी आणि अथवा अपवादात्मक परिस्थितीत यात वाढ करण्याचा न्यायालयास पूर्ण अधिकार आहे.*

## • जनहित याचिका : अग्राह्य विषय-समस्या

**(Issues not acceptable under PIL)**

सर्वोच्च न्यायालयाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशाप्रमाणे जनहित याचिकेचा विषय न्यायालयीन कृतिकक्षेच्या बाहेर असल्यास खालील प्रकरणी जनहित याचिकेचा विचार केला जात नाही :-

१) केवळ स्वतःच्या वैय्यक्तिक स्वार्थापोटी गुदरलेल्या खटल्याप्रकरणी.

२) घरमालक आणि भाडेकरू यांच्यातील वादविवाद प्रकरणी.

३) नोकरी, चाकरी, निवृत्तीवेतन आणि निवृत्तीनंतर मिळणारे आर्थिक लाभ अशा वैय्यक्तिक समस्या प्रकरणी.

४) इतर कोर्टात प्रलंबित असलेल्या दाव्याची सुनावणी त्वरित व्हावी म्हणून केलेल्या विनंती अर्ज प्रकरणी.

५) वैद्यकीय, अभियांत्रिकी आणि इतर शैक्षणिक अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेत हस्तक्षेप करण्याबाबत विनंती अर्ज प्रकरणी.

६) राज्य सरकार, केन्द्र सरकार आणि अथवा शासकीय विभागाबरोबर सुरू असलेल्या अथवा, प्रलंबित असलेल्या न्यायालयीन वादविवाद प्रकरणी.

७) पर्यायी प्रचलित न्याय प्रक्रिया उपलब्ध असल्या प्रकरणी.

**टीप :** *संदर्भित समस्येच्या निराकरणासाठी पर्यायी प्रचलित न्यायप्रक्रिया उपलब्ध असल्यास अशा जनहित याचिकेचा न्यायालयाकडून विचार केला जात नाही. याबाबतीतील सविस्तर विवरण पुढील प्रकरणात आलेले आहे.*

९

# पर्यायी न्याय उपलब्ध असल्यास : जनहित याचिका अग्राह्य

**(Where Alternative remedy is available : PIL is not Acceptable)**

जनहित याचिकेद्वारे त्वरित वैकल्पिक न्याय मिळू शकतो हे एकदा लक्षात आल्यावर स्वतःच्या खाजगी वादासाठी नियमित कोर्टात जावून दाद मागण्याऐवजी आणि अथवा प्रलंबित खटल्यातून मार्ग काढण्यासाठी तसेच आपापसातील वैयक्तिक वाद 'जनहित याचिकेत' परिवर्तित करून घेण्यासाठी चढाओढ सुरू झाल्यामुळे न्यायालयावर निष्कारण कामाचा बोजा वाढला आहे ही वस्तुस्थिती नाकारता येत नाही. अशा स्वार्थीवृत्तीस आळा घालण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने **"मे. प्रकाश रोडवेज (प्रा.) लि. विरुध्द भारत सरकार"** या प्रकरणी (1989) 4 SCC 15) निर्देश दिले आहेत की :-

> **"एखादा खटला वादी-प्रतिवादी यांच्या वैय्यक्तिक विवादा /स्वार्थापोटी गुदरला गेला असेल तर अशा दाव्याला पारंपरिक न्यायपध्दतीचा पर्याय उपलब्ध असल्यामुळे वादीला सदर खटला 'जनहित याचिकेत' रुपांतरित करण्याचा मुळीच अधिकार नाही. जेव्हा पारंपरिक न्यायालयीन पर्याय उपलब्ध होण्याची शक्यता नसेल तरच अशा बाबतीत जनहित याचिका ग्राह्य ठरू शकते अन्यथा नाही."** [1]

वैय्यक्तिक स्वार्थापोटी ऊठसूठ जनहित याचिकेद्वारे न्यायालयाकडे धाव घेण्याच्या अपप्रवृत्तीला आळा घालण्यासाठी कठोर उपाययोजना आवश्यक होती. त्यामुळेच जनहित याचिका संदर्भात कोर्टात जाण्यापूर्वी अर्जदाराला 'प्रस्तावित याचिका ही त्याच्या वैयक्तिक स्वार्थापोटी अथवा वादासंबंधी नसून त्यात खरोखरच

सामान्यजनांचे हित गुंतले आहे’ हे सिध्द करण्यासाठी याचिका प्रकरणी पूर्ण शहानिशा-खातरजमा करून घेणे अर्जदारावर बंधनकारक आहे.

या पार्श्वभूमीवर सर्वोच्च न्यायालयाने वेळोवेळी फेटाळलेल्या काही जनहित याचिकेंचा तपशील खालीलप्रमाणे आहे :-

● **‘‘डॉ. नानजी सिंह विरुध्द पी.जी. मेडिकल स्टुडंट्स असोसियेशन’’** या प्रकरणी दिलेला निर्णय (AIR 1993 SC 2264) महत्वाचा ठरावा. सर्वोच्च न्यायालयाने सदर याचिका फेटाळताना आपल्या निर्णयात म्हटले आहे की:-

> **‘‘सदर प्रकरणी ‘असोसियेशन ऑफ मेडिकल स्टूडन्टस’ ने कोणत्या आधारावर त्यांच्या वैय्यक्तिक वादाचे जनहित याचिकेत रुपांतर करण्याचा प्रयत्न केला हे कळण्यास अवघड आहे. ज्या ज्या वेळी केवळ वैय्यक्तिक स्वार्थापोटी वादाला जनहित याचिकेत रुपांतरित करण्याचा प्रयत्न केला जाईल त्या त्या वेळी अशा याचिका कायमस्वरुपी फेटाळण्यात आल्या पाहिजेत.’’** [2]

● **‘‘बलजीत सिंह मलिक विरुध्द दिल्ली गोल्फक्लब व इतर’’** (1998) 1 SCC 486) या प्रकरणी अर्जदाराची याचिका फेटाळताना मा. न्या. श्री. पंची, मा.न्या. श्री. थॉमस आणि मा.न्या.श्री. राजेन्द्र बाबू या त्रीसदस्सीय खंडपीठाने स्पष्ट केले आहे की:-

> **‘‘दिल्ली गोल्फक्लबच्या प्रस्तावित तरणतारण तलावाच्या बांधकामामुळे परिसरातील संरक्षित प्राचीन स्मारकांना अथवा त्या सभोवार असलेल्या जमिनीला कोणत्या कारणांमुळे इजा पोचू शकते आणि अथवा त्यामुळे परिणामी जलप्रदुषण कसे होवू शकेल हे अर्जदाराला पटवून देता आलेले नाही. मुळातच या जनहित याचिकेचा विषय हा अनिश्चित आणि संदिग्ध असल्यामुळे ही याचिका दखलपात्र ठरू शकत नसल्याने तिचा विचार करता येत नाही.’’** [3]

● **"नर्मदा बचाव आंदोलन विरुध्द भारत सरकार"** प्रकरणी (AIR 2000 SC 3751 (3787) दाखल झालेली याचिका फेटाळताना मा. सर्वोच्च न्यायालयाने भाष्य केले आहे की :-

> **"प्रकल्प विस्थापित अदिवासी जनतेला इतरत्र ठिकाणी त्यांचे पुनर्वसन करण्याचे सरकारने मान्य केल्यामुळे संविधानिक अधिकाराचे उल्लंघन होत नाही. खरेतर चांगल्या सोईसुविधा प्राप्त झाल्यावर आदिवासींची इतर समाजाबरोबर एकात्मता वाढून त्यांचे सामाजिक कल्याणच होईल. सबब सदर याचिकेचा विचार करता येत नाही."** [4]

सर्वोच्च न्यायालयाने, जनहित याचिका या लक्षणीय न्यायदान प्रक्रियेचा कुणी दुरुपयोग करू नये, यासाठी संबंधित कोर्टांनी या वैकल्पिक न्यायप्रणालीचे काटेकोर पालन करणे आणि त्यासंदर्भात योग्य ती काळजी घेणे यासाठी काही मार्गदर्शक नियम घालून दिलेले असून जनहित याचिका दाखल करून घेण्यापूर्वी संबंधित न्यायालयाने खालील गोष्टींची शहानिशा करून घेण्याचे निर्देश दिलेले आहेत:-

## ● सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश :-

१) अर्जदार सद्हेतूने आणि केवळ जनहितार्थ न्यायासनासमोर आलेला असून याचिकेसंदर्भात त्याची स्वतःची वैयक्तिक कमाई, फायदा अथवा राजकीय स्वार्थ दडलेला नाही याची खातरजमा करून घ्यावी.

२) जनहित याचिकेचा गैरवापर करून कुणी राजकारणी अथवा पुढारी न्यायालयीन कार्यवाहीमध्ये हेतूपुरस्सर अडथळे आणण्याचा अथवा प्रकरण प्रलंबित करण्याचा प्रयत्न तर करीत नाही ना? याची सर्वप्रथम शहानिशा करून घ्यावी.

३) जनहित याचिकेच्या निवाड्यामुळे इतरांच्या मूलभूत अधिकाराला बाधा पोचण्याची शक्यता निर्माण होत असेल अशावेळी अशा सर्व संबंधिताना निवाडा देण्यापूर्वी नोटीसेस पाठवून त्यांनाही त्यांची बाजू मांडण्याची संधी देणे आवश्यक आहे आणि या नियमाचे काटेकोर पालन करावे.

४) सर्वप्रथम कोर्टाकडे आलेली याचिका ही जनहित याचिकेच्या कार्यकक्षेत बसते अथवा नाही याची छाननी सर्वोच्च न्यायालयाच्या जनहित याचिका कक्षाकडून केली जाते. समाधानकारक प्रकरणीच जनहित याचिकेची पुढील प्रक्रिया चालू होते. जनहित प्रकरणी साधे पत्रसुध्दा जनहित याचिका म्हणून दाखल करून घेण्याचे न्यायालयास अधिकार आहेत. तथापि अर्जदार व्यक्ती अथवा एखादी सेवाभावी संस्था, पीडितांच्या, उपेक्षितांच्या संविधानिक अथवा सामाजिक अधिकारांचे उल्लंघन झाल्यामुळे त्यांच्यातर्फे दाद मागत असतील तरीही, प्रस्तुत प्रकरणी खरोखरच जनहिताचा प्रश्न मांडला/गुंतला आहे का? याची संबंधित न्यायालयाने याचिका दाखल करून घेण्यापूर्वी खातरजमा करून घ्यावी.

---

1. "Where the case is strictly an individual dispute and alternative remedy is available to the petitioner he can not be permitted to convert the (individual) dispute in to public interest litigation; and therefore in such cases PIL Writ should not be encouraged. In other words, PIL remedy is available only in those cases where an alternative remedy is not available to the petitioner." ***(M/s Prkash Roadways (Pvt.) Ltd v/s Union of India and another (1989) 4 SCC 15)***

2. "We have not understood as to how the respondent (Association of Medical Students) would convert an individual dispute in to public interest litigation. Where an individual dispute is sought to be converted in to PIL, it should be rejected out right." ***(Dr. Nanji Singh v/s P.G. Students' Association : AIR 1993 SC 2264)***

3. "The petitioner had not classified as to in what manner the alleged disfiguration of the said protected monuments and soil degradation and consequent

water pollution was likely to occur. The subject matter of the PIL being uncertain and ambigious, the case is not worthy of being entertained as a Public Interest Litigation." ***(Baljeet Singh Malik v/s Delhi Golf Club and others : (1998) 1 SCC 486)***

4. "The Government policy to shift the "Adivasi" residents from their dwellings to another place for their rehabilitation cannot be said to be violation of their fundamental rights, because they have been provided better living facilities in their new habitation. In fact it was intended to bring about integration of Adivasi population with the general society and was aimed at their social welfare. The PIL petition was therefore dismissed." ***(Narmada Bachav Andilan v/s Union of India (AIR 2000 SC 3751 (3787))***

# जनहित याचिका : सीमारेषा-मर्यादा

**(Parameters of Public Interest Litigation)**

समाजातील गोरगरीब, उपेक्षित, अशिक्षीत, मागासवर्गीय आणि दुर्बल घटकांना त्यांच्या मूलभूत न्यायिक अधिकारासाठी स्वतःहून झगडणे शक्य नसते. परिणामी योग्य आणि त्वरित न्यायापासून ते सदैव वंचित राहतात. समाजातील या घटकाचे अश्रू पुसण्यासाठी, परस्पर सहकार्याने त्यांना त्वरित न्याय मिळवून देण्यासाठी 'जनहित याचिकेद्वारे' गतिमान न्याय निवाडा पध्दती अस्तित्वात आली आहे. म्हणूनच त्यास 'जनहिताचा दावा/खटला' असे समर्पक नामाभिदान आहे.

ऊठसूठ कुणालाही वैय्यक्तिक कारणासाठी/ स्वार्थासाठी जनहित याचिका दाखल करता येत नाही. जनहित याचिकेच्या कृतिकक्षेत/परिसीमेत (Parameter) जनहित संदर्भात कोणते विषय, समस्या, तक्रारी अथवा गाऱ्हाणी यांचा समावेश होवू शकतो याचा सखोल विचार केला गेला आहे. एकूणच या न्यायप्रक्रियेत सुसूत्रता असण्यासाठी जनहित याचिकेसंदर्भात सीमारेषा-मर्यादा स्पष्ट करण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे जनहित याचिका दाखल करून घेण्यापूर्वी त्यातील समस्या जनहिताच्यादृष्टीने ग्राह्य आहेत याची न्यायालयाला खातरजमा करून विचार करावा लागतो.

**जनहित याचिका : कार्यकक्षा, मर्यादा आणि ग्राह्य विषय :-**

कायद्याच्या कार्यकक्षेत राहूनच याचिकेचा विचार करावा लागतो. जनहिताच्यादृष्टीने अत्यंत महत्व असलेल्या काही गंभीर आणि संवेदनशील समस्येप्रकरणी न्यायासनास अशा ग्राह्य याचिकांना अग्रक्रम देवून त्यांची दखल घ्यावी लागते. अग्रक्रम प्राप्त विषय कोणते आहेत याची माहिती खाली दिली आहे

१) मुख्यत्वे वेठबिगार, सुनावणी शिवाय तुरुंगात वर्षानुवर्षे खितपत पडलेले कैदी, औद्योगिक कामगार अथवा समाजाचा उपेक्षित समुदाय यांच्या हितासाठी आलेल्या याचिकेचाच विचार करणे.

२) पीडित स्त्रिया, मुले आणि अथवा असंघटीत कामगार यांच्यावरील अन्यायाला वाचा फोडण्यासाठी, त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी केलेल्या याचिकेचा विचार करणे.

३) कोवळ्या मुलांचे/बालकांचे राष्ट्रीय अथवा आंतरराष्ट्रीयस्तरावर होणारे बेकायदेशीर दत्तक प्रकरणे, दत्तक विधाने, स्त्री कर्मचाऱ्यांचा लैंगिक छळ या व अशा अनेक प्रकरणी या घडीला विविक्षीत कायदे अस्तित्वात नसल्यामुळे अशा प्रश्नांना सार्वजनिकपणे वाचा फोडण्यासाठी, आणि पीडितांना न्याय मिळवून देण्यासाठी कोर्टाने हस्तक्षेप करण्यासाठी विनंती केलेल्या याचिकेचा विचार करणे.

४) भारतीय न्यायव्यवस्था (Judiciary) ही सामान्यजनांवर होणाऱ्या अन्यायाविरुध्द दिलासा देणारा मंच (Grievances Redressal Forums) असल्याने, लोकशाही पूरक संस्थाचे स्वातंत्र्य अबाधित राखण्यासाठी न्यायालयाने हस्तक्षेप करण्याची विनंती केलेल्या याचिकेचा विचार करणे.

५) पर्यावरणाला धोका-इजा पोचेल असे प्रकल्प अथवा शासकीय निर्णय राबवण्यामुळे जनसामान्यांच्या मूलभूत अधिकारावर गदा येत असेल, त्याचबरोबर हवा, पाणी अथवा तत्सम नैसर्गिक स्त्रोतांचा गैरवापर होवून जनजीवन धोक्यात येण्याची शक्यता निर्माण होत असेल अशा प्रकरणी दाद मागण्यासाठी आलेल्या याचिकेचा विचार करणे.

# ११

# जनहित याचिका दाखल करताना घ्यावयाची काळजी

**(Precautions to be taken before Filling PIL)**

गतिमान आणि पूरक न्यायनिवाड्यासाठी भारतीय न्यायव्यवस्थेने जनहित याचिकेच्या रूपाने प्रत्येक भारतीय नागरिकाला बहाल केलेला एक अद्वितीय अधिकार आहे. समाजातील गोरगरीब, उपेक्षित आणि दुर्बल घटकांवर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी, त्यांच्या मूलभूत आणि संविधानिक अधिकारांचे रक्षण करण्यासाठी 'जनहित याचिका' हे फार मोठे प्रभावी शस्त्र आहे. त्यामुळे त्याचा वापर करण्यापूर्वी आणि करताना संबंधित अर्जदाराला फार काळजी आणि खबरदारी घेणे आवश्यक आहे, नसता याचिका फेटाळली जाण्याची भीती असते. या संदर्भात अर्जदाराने घ्यावयाची काळजी आणि कार्यपूर्तता याचा ढोबळ तपशील खालीलप्रमाणे आहे :-

## • जनहित याचिका दाखल करण्यापूर्वी :-

१) अर्जदारास इतरांच्यावतीने जनहित याचिका दाखल करावयाची असल्यास ती नोंदणीकृत (Registered) संघटना/संस्थेमार्फतच दाखल करण्याचे अर्जदारावर बंधन आहे. त्यामुळे आपण संबंधित संस्थेचे/संघटनेचे सभासद अथवा पदाधिकारी आहात का? याची खात्री करून घ्यावी.

२) जनहित याचिकेसाठी निवडलेल्या समस्येचा विषय हा वैय्यक्तिक स्वार्थासाठी नसून सदर समस्या बहुजनांच्या हितरक्षणासाठीच आहे याची रीतसर खात्री करून घ्यावी.

३) संदर्भित विषयावर यापूर्वीच इतर कुणाची याचिका दाखल झालेली आहे का? याची माहिती/खातरजमा करून घ्यावी, नसता अशा याचिकेचा वेगळा विचार केला जात नाही.

४) संदर्भित विषयासंबंधी कार्यरत असलेल्या इतर समविचारी सेवाभावी संस्था, संघटनांची माहिती मिळवून त्यांच्या बरोबर चर्चा करावी आणि त्यांना आपल्या संघर्षात सामील करून घ्यावे, म्हणजे याचिकेला आवश्यक ते वजन प्राप्त होईल.

५) याचिका दाखल करण्यापूर्वी खालील गोष्टींचा सखोल विचार करावा :-

- खटल्याचे कामकाज खर्चिक असते, याचे भान ठेवावे.
- खटल्याचे काम पूर्ण होण्यासाठी खूप कालावधी लागू शकतो हे कायम लक्षात ठेवावे.
- खटल्याचा प्रतिकूल निर्णय संदर्भित संघटनेच्या चळवळीसाठी घातक ठरू शकतो.
- न्यायालयीन प्रक्रियेमुळे दावा वर्षानुवर्ष प्रलंबित झाला तर लक्ष विचलित होवून जनसामान्यांचे मूळ समस्येकडे दुर्लक्ष होण्याची शक्यता नाकारता येत नाही हे लक्षात ठेवावे.
- संदर्भित खटल्यासाठी लागणारा आवश्यक तो खर्च आणि हवा तेवढा वेळ आपण देवू शकतो की नाही याची खातरजमा करून घ्यावी, नसता लढा अर्ध्यावरच सोडण्याची पाळी येवू शकते.

६) याचिका मुख्यत्वे सरकार, सरकारी अधिकारी, सार्वजनिक संस्था आणि अथवा त्यांचे पदाधिकारी यांच्या विरोधात असल्यामुळे त्यांच्याकडून साम-दाम-दंड-भेद या चाणक्यनीतीचा वापर होवू शकतो. प्रसंगी आपल्या जिवावरसुध्दा बेतू शकते याचे भान आणि एकूणच पूर्ण मानसिक तयारी ठेवणे आवश्यक आहे. आजवर दुर्दैवाने बऱ्याच माहिती अधिकार कार्यकर्त्यांचा शारीरिक आणि मानसिक छळ आणि निघृण हत्या झालेल्या आहेत हे जरी खरे असले तरी निर्भयपणे सामोरे गेल्यास नक्की यश मिळू शकते, हे लक्षात ठेवावे.

## • जनहित याचिका दाखल करताना :-

१) याचिके प्रकरणी सर्वप्रकारची आवश्यक ती समर्पक आणि संदर्भित माहिती गोळा करावी.

२) याचिकेसाठी मिळवलेली/ मिळवायची सर्व उपयुक्त माहिती आणि बारीकसारीक तपशील अत्यंत काटेकोरपणे तपासून पहावा.

३) याचिकेत छायाचित्रांचा (Photos) समावेश करावयाचा असेल तर ती छायाचित्रे चांगल्या छायाचित्रकाराकडून (Photographer) काढून, सदर छायाचित्रकाराच्या प्रमाणित प्रतिज्ञापत्रासह याचिका दाखल करणे आवश्यक आहे. त्याचबरोबर सर्व छायाचित्राच्या मूळ प्रतिमा (Negatives) आणि खर्चाची बिले संग्रही ठेवावीत.

४) याचिकेविषयी संबंधित अधिकाऱ्याला/खात्याला विनंती अर्ज लिहून त्यात आपल्या मागण्या स्पष्टपणे मांडाव्यात. प्रत्युत्तरास विलंब झाल्यास स्मरणपत्रे दाखल करावीत. दाखल केलेल्या प्रत्येक कागदपत्रांची पोचपावती घेवून सर्व कागदपत्रे संग्रही ठेवावेत.

५) याचिके संदर्भात जमवलेल्या/मिळवलेल्या सर्व कागदपत्रांची/दस्तावेजांची त्यांच्या अनुक्रमाप्रमाणे सूची तयार करून ठेवावी.

६) याचिका दाखल करण्यासाठी समविचारी संघटनेची निवड, वकिलांच्या सल्ल्याप्रमाणे करावी.

७) याचिकेप्रकरणी न्यायालयात तुमच्यावतीने बाजू मांडण्यासाठी सक्षम वकील/कायदेपंडिताची नेमणूक करून त्यांचे मानधन ठरवून घ्यावे.

८) याचिकेप्रकरणी तुम्ही स्वतः न्यायालयात आपली बाजू मांडणार असाल तर त्या संदर्भात तज्ञ वकिलांचा सल्ला व मार्गदर्शन अवश्य घ्यावे.

९) जनहित याचिका दाखल करण्यापूर्वी कमीत कमी दोन महिने अगोदर, सर्व संबंधितांना योग्य ती नोटीस पाठवून आपला मनोदय जाहीर करावा.

वरील विवेचनावरून हे स्पष्ट होईल की योग्य ती काळजी घेतल्यास आणि मार्गदर्शन लाभल्यास जनहित याचिकेचा निवाडा निःपक्षपातीपणे मिळवण्यास सहजासहजी कोणतीही अडचण येणार नाही.

# १२

# जनहित याचिका : न्यायिक सक्रियता आणि मर्यादा

## (Judicial Activism & Limitation of PIL)

भारतात जनहित याचिकेच्या माध्यमातून गतिमान पूरक न्यायप्रक्रियेची व्यवस्था झाल्यामुळे प्रत्येक राज्यसरकारांच्या जबाबदाऱ्या वाढल्या असून तत्संबंधी एकूणच कार्यकक्षा विस्तारल्या आहेत. सरकार अथवा सरकारी अधिकारी यांच्या मुजोरी-मनमानीमुळे जनसामान्यांवर अन्याय होत असेल, अथवा त्यांच्या संविधानात्मक अधिकाराची पायमल्ली होत असेल अशावेळी सामान्य नागरिकाला अथवा त्याच्यावतीने प्रतिष्ठीत समाजसेवी संस्थेला जनहित याचिकेच्या माध्यमातून उच्च अथवा सर्वोच्च न्यायालयात दाद मागता येते याचा तपशील इतरत्र आलेला आहेच.

प्रामुख्याने समाजातील गोरगरीबांना, उपेक्षितांना, अल्पसंख्यांकांना त्यांचे मानवाधिकार आणि संविधानात्मक अधिकार नाकारले जात असतील तर अशा प्रसंगी जनहित याचिकांना अग्रक्रम दिला जातो. त्यामुळे या घडीला जनहित याचिका हा एकमेव उत्तम पर्याय म्हणून सामान्यजनांना मोठा दिलासा मिळाला आहे यात वाद नसावा.

जनहित याचिका प्रकरणी न्यायालयीन कृतिक्षेत्राची व्याप्ती वाढल्यामुळे, जनहित याचिकेचा केवळ स्वार्थासाठी दुरुपयोग करण्याकडे मतलबी लोकांचा कल झुकत आहे हे सत्य नाकारता येणार नाही. परिणामी मागचापुढचा विचार न करता फक्त आपल्या वैयक्तिक स्वार्थासाठी ऊठसूठ जनहित याचिका दाखल करण्याची सर्वस्तरावर सध्या स्पर्धाच चालू झाली आहे हे आपण पाहतो आहोत.

तथापि अशावेळी जनहित याचिका कृतिक्षेत्राच्याही काही मर्यादा आहेत याचे भान सोईस्करपणे विसरले जात आहे. गेल्या ३०/३५ वर्षाच्या कालखंडात विविध राज्यात आणि विविध विषयांवर दाखल होणाऱ्या जनहित याचिकांचा वाढता ओघ पाहिल्यास, प्रचलित न्यायव्यवस्था उपलब्ध असूनसुध्दा सार्वजनिक जीवनातील जवळपास प्रत्येक समस्येवर न्यायालयाने हस्तक्षेप करून जनहित याचिकेच्या

माध्यमातून त्वरित न्यायनिवाडा करावा ही अपेक्षा दिवसेंदिवस वाढत असल्याने, तो फार मोठा चिंतेचा विषय ठरला आहे.

नियामकमंडळ (Executive), कायदेमंडळ (Legislature) आणि न्यायसंस्था (Judiciary) यांचे स्वतःचे अस्तित्व आणि निश्चित असे कार्यक्षेत्र असून त्या चौकटीत राहूनच त्यांना कार्य करावे लागते. त्याचवेळी ह्या संस्थांना इतरांच्या कार्यक्षेत्रात अतिक्रमण होणार नाही याची दक्षता घ्यावी लागते. न्याययंत्रणेचा समतोल राखण्यासाठी भारतीय संविधानाप्रमाणे या संस्थाच्या फक्त कर्तव्यात (Functions) विभागणी अपेक्षित आहे, अधिकारात नाही हे अशावेळी लक्षात ठेवणे फार गरजेचे आहे.

मूलतः जनहित याचिका न्यायप्रणाली समाजातील गोरगरीब, उपेक्षित आणि दुर्बल घटकांना न्यायासनासमोर आपल्या तक्रारी-गाऱ्हाणी मांडून सहजासहजी न्याय मिळवण्यासाठी अस्तित्वात आली आहे. गेल्या ४ दशकात जनहित याचिकेचा नगण्य कारणांसाठी फार मोठ्याप्रमाणात वापर होत असल्याचे निदर्शनास आल्यामुळे नियामकमंडळ आणि कायदेमंडळ यांच्या कृतिक्षेत्रावर-अधिकारांवर आक्रमण तर होत नाही ना हा नवीन यक्षप्रश्न न्यायसंस्थेसमोर उभा राहिला आहे. त्यामुळे जनहित याचिका संदर्भातील प्रस्तुत उदार धोरणांचा पुनर्विचार करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे, असा मतप्रवाह वाढीस लागल्याचे सध्या दिसून येत आहे.

या पार्श्वभूमीवर **"युनियन कार्बाईड कॉर्पोरेशन विरुध्द युनियन ऑफ इंडिया"** (AIR 1992 SC 248) प्रकरणी जनहित याचिका कृतिक्षेत्राची मर्यादा स्पष्ट करताना कोणत्याही परिस्थितीत न्यायालयाच्या प्रतिष्ठेला बाधा पोचू नये आणि अथवा न्यायव्यवस्था मलीन होवू नये या गोष्टीची काळजी घेण्यासाठी मा.सर्वोच्च न्यायालयाने आपल्या निकालपत्रात निःसंदिग्धपणे म्हटले आहे की :-

> **"समाजसेवी कार्यकर्त्यांना गोरगरीबांच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचा, त्यासाठी न्यायालयात हिरिरीने दाद मागण्याचा अधिकार असला तरी त्यांच्यावर विशिष्ट मर्यादा पाळणे बंधनकारक असायला पाहिजे. न्यायालयाच्या प्रतिष्ठेला बाधा पोहचेल असे कोणतेही कृत्य अशा समाजसेवी कार्यकर्त्यांच्या हातून घडता कामा नये. न्यायव्यवस्थेशी संलग्न असलेल्या**

व्यक्तिंनी अशावेळी पुढाकार घेवून अशा कार्यकर्त्यांना न्यायालयीन मर्यादा सांभाळण्यासाठी योग्य ते मार्गदर्शन करणे आवश्यक आहे. कोणत्याही परिस्थितीत न्यायव्यवस्था मलीन होणार नाही याची जबाबदारी सर्वांची आहे याचे प्रत्येकाने भान ठेवणे आवश्यक आहे." [1]

---

*1.* "Public activist should be permitted to expose the cause of poor citizens but there must be a limit to such activity and nothing should be done which would affect the dignity of the court and bring down the serviceability of the institution to the people at large. These who are acquainted with jurisprudence and enjoy social privilege as men educated in laws owe an obligation to the community of educating it properly and allowing the judicial process to continue unsoiled." ***(Union Carbide Corporation v/s Union of India : AIR 1992 SC 248)***

# १३

# जनहित याचिका : गैरवापर

## (Misuse of Public Interest Litigation)

### • गैरवापर : वस्तुस्थिती

जनहित याचिकेद्वारे पूरक न्यायदानाची व्यवस्था झाल्यामुळे भारतीय न्यायसंस्थेच्या इतिहासात एक नवीन अध्याय सुरू झाला आहे यात वाद नसावा. प्रचलित न्यायपध्दतीच्यामानाने अल्पखर्चिक आणि गतिमान असलेल्या या न्यायप्रक्रियेमुळे नागरिकांकडून त्यास नभूतोनभविष्यती असा प्रतिसाद लाभला हे नाकारून चालणार नाही. कोणतीही नवीन संकल्पना अथवा कायदा अंमलात येतो तेव्हा कालांतराने त्यातील त्रुटी आणि खाचखळगे प्रकर्षाने सामोरे येतात. त्यामुळे कालमानानुसार कायद्यात वारंवार सुधारणा करून प्रक्रिया जास्तीतजास्त निर्दोष कशी करता येईल याकडे न्यायव्यवस्थेला सदोदित लक्ष द्यावे लागते. 'जनहित याचिकासुध्दा' या प्रक्रियेस अपवाद नाही हे लक्षात घेतले पाहिजे.

स्वतःचा वैय्यक्तिक स्वार्थ साधण्यासाठी, राजकीय लाभ उठवण्यासाठी, आपापसातल्या वैमनस्याला खतपाणी घालण्यासाठी अथवा सूड उगवण्यासाठी स्वार्थसाधू, राजकीय नेते, स्वयंभू पुढारी आणि तथाकथित सेवाभावी संस्था यांच्यात ऊठसूठ जनहित याचिका दाखल करण्याची नवीन फॅशन सुरू झाली असून जनहित याचिकेच्या माध्यमातून एकमेकांवर कुरघोडी करण्याची स्पर्धा सुरू झाली आहे. अति उत्साही स्वयंघोषित समाजसेवकांनी तर काही विविक्षित न्यायाधीशांच्या कोर्टातच 'जनहित याचिका' दाखल करण्याचा सपाटा लावला असून अनेक खोट्यानाट्या तक्रारी दाखल करून न्यायासनाची दिशाभूल करण्याचे वारंवार प्रयत्न होवू लागले हे कटू सत्य आहे. परिणामी या पूरक न्यायप्रक्रियेतील त्रुटी आणि पळवाटा न्यायासनास प्रकर्षाने जाणवू लागलेल्या आहेत.

सरतेशेवटी अशा गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी, सर्वोच्च न्यायालयाने जनहित याचिकेच्या प्रथम छाननीसाठी एक स्वतंत्र कक्षाची स्थापना केली. त्यामुळे

आलेली कोणतीही याचिका, वृत्तपत्रातील बातमी अथवा पत्र सर्वप्रथम या छाननी कक्षाकडे पाठवले जाते. त्या ठिकाणी अर्जाचे विश्लेषण होवून सदर प्रकरण जनहित याचिकेच्या कृतिकक्षेत बसत असेल तरच छाननीकक्षाकडून योग्य वाटेल त्या न्यायालयात सुनावणीसाठी पाठवले जाते. या प्रथम चाचणीमुळे अग्राह्य अर्ज आपोआपच निकाली निघण्यास मोठी मदत झाली आहे. तथापि फक्त यावर न थांबता याचिका गैरवापर प्रवृत्ती संदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयाकडून बऱ्याच वेळा कठोर कारवाई करण्याचे निर्देश दिले जात आहेत. अशा संदर्भातील काही ठळक प्रकरणांचा उल्लेख खाली केला आहे :-

## • मा. सर्वोच्च न्यायालयाचे कठोर ताशेरे :

**"कॉमन कॉज (A Regd. Society) विरुध्द भारत सरकार"** प्रकरणी (AIR 2008 SC 2116) जनहित याचिकेचा गैरवापर करणाऱ्या अविवेकी आणि स्वार्थसाधू अर्जदारांवर आसूड ओढताना सर्वोच्च न्यायालयाच्या **मा.न्या. एच.के. सीमा** आणि **मा.न्या. मार्कण्डेय काटजू** यांच्या खंडपीठाने जळजळीत भाष्य केले आहे :-

> **"गोरगरीब, उपेक्षित आणि समाजातील दुर्बलघटक होणाऱ्या अन्यायाविरुध्द न्यायालयात दाद मागण्यासाठी असमर्थ असतात. जनहित याचिकेच्या माध्यमातून गतिमान न्याय मिळवण्यासाठी दीनदुबळ्यांना फार मोठा दिलासा प्राप्त झाला आहे. तथापि काळाच्या ओघात निव्वळ स्वतःच्या स्वार्थापोटी अनेकांनी या गतिमान पर्यायाचा जाणूनबुजून दुरुपयोग केल्यामुळे आज त्याचे रुपांतर एका अक्राळविक्राळ बेलगाम राक्षसात झाल्याचे दिसून येत आहे. परिणामी सर्वोच्च न्यायालयाच्या कामकाजावर कमालीचा ताण पडला असून इतर प्रलंबित न्याय्य याचिकेच्या सुनावण्या दिवसेंदिवस अजून मागे पडत आहेत."** [1]

अशीच प्रतिक्रिया देताना **"सुभाष सिंघानिया व इतर विरुध्द मध्यप्रदेश सरकार"** प्रकरणी (2005(1) M P High Court Times 192 (DB)) मध्यप्रदेश उच्च न्यायलयाच्या डिव्हिजन बेंचने सवंग प्रसिध्दीसाठी याचिका दाखल करणाऱ्या

अर्जदारांना फार मार्मिक व सडेतोडपणे फटकारले आहे. जनहित याचिका गैरवापर संदर्भात सदर प्रकरणी केलेले भाष्य अत्यंत महत्वाचे ठरावे:- :-

> **"सवंग प्रसिध्दी मिळवण्यासाठी जनहित याचिकेचा दुरुपयोग करण्याची सध्या फॅशनच सुरू झाली आहे. संविधानाच्या कलम २२६ अन्वये गोरगरीब, उपेक्षित आणि समाजातील दुर्बलघटकांवर होणाऱ्या अन्यायाविरुध्द त्यांच्या वतीने इतरांनी न्यायालयात फिर्याद करण्याचे प्रावधान असले तरी या अधिकाराचा स्वतःच्या वैय्यक्तिक स्वार्थासाठी अथवा राजकीय हेतूसाठी गैरवापर करणे तितकेच बेकायदेशीर आहे."** [2]

जनहित याचिका गैरवापर संदर्भात फक्त सवंग प्रसिध्दी मिळवण्याच्या नादात, वैयक्तिक आणि राजकीय स्वार्थापोटी वरचेवर याचिका दाखल करण्याच्या वाईट प्रवृत्तीचा वाढता धोका ओळखून मा. न्या. श्री. डॉ ए.एस. आनंद यांनी फार गंभीर इशारा दिला आहे (42 JILI 149 (159) (2000) :-

> **"वैय्यक्तिक फायद्यासाठी, राजकीय लाभासाठी अथवा सवंग प्रसिध्दीसाठी कोणतेही तारतम्य न बाळगता स्वैराचाराने जनहित याचिकेचा वारंवार गैरवापर झाल्यास त्याचे पावित्र्य आणि विश्वसनियता धोक्यात येवून जनतेचा न्यायव्यवस्थेवर असलेला विश्वास आणि खात्री संपुष्टात येण्यास फारसा वेळ लागणार नाही."** [3]

## • मा. सर्वोच्च न्यायालयाचे महत्वाचे निर्देश :

वरील पार्श्वभूमीवर जनहित याचिकेचा गैरवापर रोखण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने सर्व संबंधितांसाठी खालील मार्गदर्शक नियमांचे पालन करण्यासाठी खास निर्देश जारी केलेले आहेत :-

१) सर्वप्रथम अर्जदार पूर्णपणे विश्वासार्ह (Bona fide) आहे याची खातरजमा झाली पाहिजे.

२) संविधानाने भारतीय नागरिकांना दिलेल्या मूलभूत अधिकारांची पायमल्ली अथवा उल्लंघन झालेले असेल तर अशावेळी जनसामान्यांच्या हितरक्षणार्थ अर्जदार जनहित याचिकेद्वारे कोर्टाकडे दाद मागू शकतो. तथापि त्याची कोर्टासमोर आपली बाजू मांडून न्याय मागण्याची पात्रता-योग्यता (Locus standi) आहे, याची पडताळणी केली पाहिजे.

३) वैय्यक्तिक हेवेदावे, राजकीय स्वार्थ अथवा खाजगी फायद्यासाठी अर्जदाराला जनहित याचिकेद्वारे न्याय मागण्याचा अधिकार नाही, त्यामुळे असे विनंती अर्ज दाखल करून घेवू नयेत.

४) कोर्टाकडे दाद मागण्यासाठी येताना अर्जदाराचे अंतःकरण आणि हात निर्मळ व निर्दोष (clean hands and clean mind) असणे आवश्यक असल्याने 'हा अर्ज आपण कुणाविरुध्द आकस, द्वेष, अथवा वैर न बाळगता फक्त जनहितासाठी अगदी निर्मळ, शुध्द व स्वच्छ मनाने करीत आहोत' याची अर्जदाराने प्रमाणित ग्वाही-प्रतिज्ञापत्र दिलेले आहे, हे पडताळून पहावे.

५) न्यायालयाकडे आलेला अर्ज हा सवंग प्रसिध्दी, स्टंट, वैयक्तिक फायदा अथवा राजकीय लाभ, अथवा पैसे उकळण्याच्या लालसेने केलेला आहे का? याची काटेकोरपणे शहानिशा करावी. बऱ्याच जणांना स्वतःचा स्वार्थ आणि सवंग प्रसिध्दी मिळवण्यासाठी कोर्टात वारंवार दावा गुदरण्याची वाईट खोड आणि लालसा असते. अशा व्यक्तींकडून जनहित याचिकेचा गैरवापर होण्याची दाट शक्यता असल्याने याचिका दाखल करून घेण्यापूर्वी त्यांचा कुटिल हेतू जाणून घ्यावा, पडताळून पहावा.

६) दाद मागणाऱ्या अर्जदाराला 'नियमित कोर्टात जाण्यास मी दुर्बल आहे' असे सिध्द करता आले नाही तर अशी जनहित याचिका दाखल करून घेण्यास अपात्र ठरते. त्यामुळे खोट्या अथवा क्षुल्लक कारणासाठी न्यायालयाच्या वेळेचा अपव्यय टाळण्यासाठी अशा याचिका दंड ठोठावून फेटाळण्यात याव्यात, जेणेकरून अशा अपप्रवृत्तींना आपोआप लगाम बसून न्यायालयाच्या वेळेचा अपव्यय टळू शकेल.

७) वृत्तपत्रात आलेली प्रत्येक बातमी विश्वासार्ह अथवा अंतिम सत्य असतेच असे नाही. त्यामुळे बऱ्याचवेळा तो कायदेशीर पुरावा म्हणून ग्राह्य धरला जात नाही. अशावेळी सदर प्रकरणी बातमीची सत्यासत्यता पडताळून पहावी.

८) ज्यांच्यावर राजकीय अथवा सामुहिक अन्याय झालेला आहे अशा उपेक्षित, गरीब, व समाजातील दुर्बलघटकांना त्यांच्या मूलभूत हक्कांच्या रक्षणासाठी न्याय मिळावा यासाठीच याचिका दाखल झालेली असेल, तरच तशा विनंती अर्जाची योग्य ती पडताळणी करूनच तो सुनावणीसाठी वर्ग करावा.

९) जनतेच्या भल्यासाठी कार्यान्वित असलेल्या प्रकल्पांविरुध्द वारंवार आणि मुद्दाम उशिरा दाखल केलेल्या याचिकेमुळे एकूणच प्रकल्पच धोक्यात येतो ही वस्तुस्थिती आहे. परिणामी सामान्यजनांना मिळणाऱ्या सोईसुविधा आणि फायदे निष्कारण लांबणीवर पडतात. अशा प्रसंगी जनहित याचिकेचा हेतूपुरस्सर गैरवापर करून कायदेशीर उपाययोजनेचा पाठपुरावा करण्यात अक्षम्य हयगय झाली आहे असे सिध्द झाले तर सदर याचिका फेटाळून लावावी.

१०) याचिकेसंदर्भात अर्जदाराची विश्वासार्हता, आणि त्याने पुरवलेल्या माहितीत सकृदर्शनी तथ्य नसल्याची खात्री, मुद्दाम दडवून ठेवलेले सत्य अथवा अपुरी माहिती याची सर्वप्रथम पडताळणी होणे आवश्यक आहे. याचिका संदर्भित विषय गंभीर असून तो जनसामान्यांच्या हितासाठीच आहे, याची पूर्ण खात्री करूनच पुढील कारवाई करावी.

११) याचिका दाखल करून घेण्यापूर्वी अर्जदाराच्या तक्रारीतील विषय जनहित याचिकेच्या कृतिकक्षेत-अधिकारक्षेत्रात ग्राह्य आहेत का? याची सत्यता पडताळून पाहणे गरजेचे आहे.

१२) दाखल करून घेतलेल्या जनहित याचिकेच्या सुनवाईमुळे कुणाच्या संविधानिक अधिकारावर गदा येणार नाही आणि अथवा त्याचे उल्लंघन होणार नाही याची खातरजमा करूनच पुढील कारवाई करावी.

## • मा.सर्वोच्च न्यायालयाने फेटाळलेल्या महत्वाच्या याचिका :

• **"जनता दल विरुध्द चौधरी आणि इतर"** या प्रकरणी (AIR 1993 SC 892) सर्वोच्च न्यायालयाच्या **मा.न्या.श्री. एस. रत्नवेल** आणि **मा.न्या.श्री. के. जयचंद्र रेड्डी** यांच्या खंडपीठाने, अर्जदाराने जनहित याचिकेचा वैय्यक्तिक वादापोटी गैरवापर केल्याचे निदर्शनास आल्यावर सदर याचिका फेटाळताना खालीलप्रमाणे तीव्र प्रतिक्रिया आणि नाराजी व्यक्त केली आहे :-

> **"समाजातील दुर्बलघटकांवर होणाऱ्या अन्यायाविरुध्द जनहित याचिकेच्यामाध्यमातून न्यायालयाचे दार ठोठावणाऱ्या व्यक्तीला त्या संदर्भात असलेली प्रामाणिक तळमळ आणि आपली पात्रता सिध्द करून दाखवणे बंधनकारक आहे. पण कुणा व्यक्तीने कुटिल हेतूने स्वतःच्या वैय्यक्तिक स्वार्थापोटी, आर्थिक लाभापोटी जनहित याचिका दाखल करण्याचा प्रयत्न केला असेल तर अशा याचिका प्रथमदर्शनीच फेटाळण्यात आल्या पाहिजेत."** [4]

वादीने वैय्यक्तिक स्वार्थापोटी गुदरलेल्या याचिकेचा समाचार घेताना खंडपीठाने पुढे म्हटले आहे की :-

> "Mr. Chaudhary appears to be very much concern with the personal and private interest, of the accused in the criminal case, and there is absolutely no involvement of Public Interest. Can it be said that this litigation is in the nature of PIL to vindicate and effectuate the public interest? The emphatic answer would be not even a single ray of the Characteristic of PIL is visibly seen."

• **"अशोक कुमार पांडे आणि इतर विरुध्द पश्चिम बंगाल"** प्रकरणी (AIR 2004 SC 280) सर्वोच्च न्यायालयाच्या **मा. न्या. श्री. दोराईस्वामी राजू** आणि **मा. न्या. श्री. अरजीत पसायत** यांच्या खंडपीठाने वादीची जनहित याचिका फेटाळताना फार मार्मिक भाष्य केले आहे :-

**"सवंग प्रसिध्दी (Publicity Interest Litigation), वैय्यक्तिक स्वार्थ (Personal Interest Litigation), राजकीय लाभ (Political Interest Litigation) अथवा पैसे कमावण्याचे (Paisa Income Litigation) साधन म्हणून जनहित याचिकेचा कुणीही सोईस्करपणे अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न करू नये. दाखल होणाऱ्या याचिकेत यातील कोणताही कुटिल हेतू स्पष्ट झाल्यास अशा याचिका सकृदर्शनीच फेटाळून लावल्या गेल्या पाहिजेत."** [5]

- **"डॉ.बी. सिंह विरुध्द भारत सरकार"** प्रकरणी (AIR 2004 SC 1923) वरील खंडपीठाने वृत्तपत्राच्या बातमीवर आधारलेली जनहित याचिका दंडासह फेटाळताना केलेले सडेतोड व्यक्तव्य परिणामकारक ठरावे:-

**"दुरान्वयाने कसलाच संबंध नसताना वृत्तपत्रातील एखाद्या बातमीच्या आधारे निव्वळ आपल्या पदाचा गैरवापर करून याचिका दाखल करण्याचा आणि त्यासाठी न्यायालयाचा मोलाचा वेळ वाया घालवण्याचा कुणालाही अधिकार नाही, मग ती कितीही मोठी असामी असली तरी हरकत नाही. सदर प्रकरणी वादीने सवंग प्रसिध्दीसाठी दावा दाखल केलेला आहे हे स्पष्टपणे निदर्शनास आल्यामुळे वादीस रु.१००००/- चा दंड ठोठावून याचिका फेटाळली गेली."** [6]

- **"दत्तराज नाथुजी थावरे विरुध्द महाराष्ट्र सरकार"** प्रकरणी (AIR 2005 SC 540) वैय्यक्तिक वादापोटी दाखल केलेली जनहित याचिका फेटाळून लावताना सर्वोच्च न्यायालयाच्या मा.न्या. श्री.अरजीत पसायत आणि मा.न्या. श्री. एस.एच. कापडिया यांच्या खंडपीठाने वादीला फार कठोर शब्दात फटकारले आहे :-

**"स्वतःच्या फायद्यासाठी जनहित याचिकेच्या माध्यमातून आपल्याला हवा तसा न्याय मिळवण्याचा, न्यायालयाचा वेळ फुकट दवडण्याचा आणि जनतेच्या पैशाचा अपव्यय करण्याचा कुणाही पक्षकारास अधिकार नाही. त्यामुळे केवळ आपल्या**

**वैय्यक्तिक स्वार्थासाठी या सहज आणि गतिमान पर्यायी न्यायदानाचा गैरवापर करण्याचा कुणालाही परवाना मिळालेला नाही हे संबंधितांनी नेहमी लक्षात ठेवावे."** [7]

## • मा. सर्वोच्च न्यायालयाचे महत्वाचे आदेश :

वैय्यक्तिक हेवेदावे आणि स्वार्थापोटी ऊठसूठ जनहित याचिकेचा गैरवापर करण्याची कुप्रवृत्ती दिवसेंदिवस वाढत असल्याने न्यायव्यवस्थेसाठी तो आव्हानाचा विषय ठरला असला तरी न्यायव्यवस्थेचे त्यावर बारीक लक्ष आहे ही फार समाधानाची बाब आहे. वेळोवेळी सर्वोच्च न्यायालयाने हस्तक्षेप करून संबंधितांना यापूर्वी कडक आदेश दिलेले आहेत. तथापि २०१० साली सर्वोच्च न्यायालयाने भारतातील सर्व उच्च न्यायालयांना जनहित याचिकेसंदर्भात दिलेले निर्देश महत्वाचे ठरावेत.

जनहित याचिकेसंदर्भात न्यायदानाची शुध्दता आणि पावित्र्य जतन करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाच्या **मा. न्या. श्री.दलवीर भंडारी** आणि **मा.न्या. श्री. मुकुंदराम शर्मा** यांच्या खंडपीठाने भारतातील सर्व उच्च न्यायालयांच्या निबंधकांना (Registrars of High Courts) खालील आदेशांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याचे आदेश दिलेले आहेत :-

**न्यायालयीन निर्देश :**

१) जनहितासाठी दाखल होणाऱ्या यथार्थ (Genuine) आणि विश्वासार्ह (Bonafide) यचिकेसाठी न्यायालयाने प्रोत्साहन द्यावे, तथापि त्याचवेळी वैय्यक्तिक स्वार्थापोटी दाखल होणाऱ्या याचिकांना लगाम घालण्यासाठी मतलबी अर्जदारांना अशा दाव्यांपासून परावृत्त करावे; जेणेकरून केवळ स्वतःच्या फायद्यासाठी जनहित याचिकेचा गैरवापर करण्याच्या अपप्रवृत्तींवर आपोआप अंकुश बसू शकेल.

२) जनहित याचिका सुनावणी संदर्भात, न्यायाधीशांनी स्वतःहून वेगवेगळ्या कार्यपध्दतीचा (Procedure) अवलंब न करता प्रक्रियेत एकूणच सुसूत्रता कशी आणता येईल याचा विचार करावा, आणि त्यासाठी देशातील सर्व उच्च न्यायालयांनी तीन महिन्यांच्या आत त्यासंदर्भात सूत्रबध्द नियमावली

तयार करावी आणि त्या नियमावलीची प्रत सर्वोच्च न्यायालयाचे प्रमुख कार्यवाह (Secretary General of Supreme Court) यांना सादर करावी.

३) जनहित याचिका दाखल करून घेण्यापूर्वी न्यायाधीशांनी, सकृद्दर्शनी (Prima facie) अर्जदार-वादीची विश्वासार्हता आणि पात्रता (Credentials) पडताळून पाहणे अनिवार्य आहे.

४) न्यायासनाने याचिका दाखल करून घेण्यापूर्वी जनहित याचिकेचा विषय, त्यातली सत्यासत्यता आणि वादीचे निवेदन याची सर्वप्रथम छाननी/पडताळणी करून याचिका दाखल करून घेण्यास पात्र आहे याची खातरजमा करणे आवश्यक आहे.

५) जनहित याचिका दाखल करून घेण्यापूर्वी, त्यात खरोखरच जनहिताचा प्रश्न गुंतलेला असून त्यामुळे जनतेच्या संविधानिक अधिकारास अथवा हितसंबंधास बाधा पोचू शकते याबाबतीत संबंधित न्यायाधीशाने स्वतःहून खातरजमा करून घेणे आवश्यक आहे.

६) ज्या याचिकेत मोठ्याप्रमाणावर आम जनतेचे हितसंबंध गुंतले असून त्यास बाधा पोचण्याची शक्यता निर्माण होणार असेल, अशावेळी संबंधित न्यायालयाने विषयाचे गांभिर्य ओळखून अशा जनहित याचिकेच्या सुनावणीस विशेष प्राथमिकता (Priority) द्यावी.

७) याचिका दाखल करून घेण्यापूर्वी न्यायालयाने सदर याचिका ही मुख्यत्वे जनहित रक्षणार्थ केलेली असून त्यात कुणाचाही वैय्यक्तिक फायदा, खासगी हेतू, अथवा गैरव्यवहार दडलेला नाही याची खातरजमा करून घेणे आवश्यक आहे.

८) केवळ वैय्यक्तिक स्वार्थापोटी जनहित याचिकेचा मुद्दाम गैरवापर करून दाखल होणाऱ्या/केल्या जाणाऱ्या याचिका, संबंधितांना जरब बसेल इतका दंड ठोठावून फेटाळण्यात याव्यात; जेणेकरून अशा छचोर आणि निरुपयोगी याचिका दाखल करण्याच्या कुप्रवृत्तीस आळा बसू शकेल.

माहिती अधिकाराचा (गैर)वापर करून ऊठसूठ जनहित याचिका दाखल करण्याच्या अपप्रवृत्तीला आळा घालण्यासाठी दि. १४-११-२०११ रोजी मा. सर्वोच्च न्यायालयाने एक महत्वपूर्ण निवाडा दिला आहे. त्यात असे म्हटले आहे की :-

> **"माहिती अधिकाराचा वापर करून मिळवलेल्या फक्त माहितीच्या आधारे अर्जदाराला थेट न्यायालयात जनहित याचिका दाखल करता येणार नाही. याचिका दाखल करण्यापूर्वी अर्जदाराला संबंधित विभागाला/मंत्रालयाला तक्रार-नोटीस पाठवून त्याचा पाठपुरावा करणे अनिवार्य आहे. तथापि तक्रारीचे निराकरण न झाल्यासच याचिका दाखल करता येईल".**

सदर निवाड्याप्रकरणी संदर्भित तपशील खाली विशद केला आहे.

- **"ऑल इंडिया रोड नेटवर्क युजर्स असोशियेशनने"** दाखल केलेली याचिका **मा.न्या.एस.एच. कापडिया** आणि **मा.न्या. स्वतंतर कुमार** यांच्या खंडपीठाने फेटाळून लावताना स्पष्टपणे म्हटले आहे की :

> **"माहिती अधिकार कायद्याद्वारे मिळालेल्या माहितीवर विसंबून कोणत्याही पक्षकाराने जनहित याचिका दाखल करण्यापूर्वी सर्वप्रथम संबंधित मंत्रालय अथवा व्यवस्थापनाकडे सर्व पुराव्यांसह दाद मागणे गरजेचे आहे. प्रयत्न करूनही विनंती नाकारली गेल्यासच सदर पक्षकाराला जनहित याचिकेच्या माध्यमातून न्यायालयासमोर येण्याचा अधिकार आहे, अन्यथा नाही."** [8]

कायदेपंडित ॲड. श्री.व्ही. जोगळेकर यांनी वादीतर्फे त्यावर युक्तिवाद करताना न्यायालयाला विनंती केली की, संदर्भित विषयावर माहिती अधिकार अंतर्गत जवळपास ३०० अर्ज दाखल झालेले असून मोटार व्हेईकल ॲक्ट च्या तरतुदी प्रमाणे वाहनांवर सुरक्षा यंत्रणा लावणे अनिवार्य आहे. संबंधित विभागाने सदर कायद्याचे काटेकोर पालन न केल्यामुळे अपघातात आजवर कित्येकव्यक्ती दगावल्या आहेत. तथापि सदर युक्तिवाद खोडून काढताना मा. खंडपीठाने म्हटले आहे की :-

"माहिती अधिकाराचा वापर करण्यासाठी अर्जदाराने सर्वप्रथम संबंधित सरकारी अधिकाऱ्यांना कोणतीही पूर्व सूचना (नोटीस) न देता न्यायालयाचा दरवाजा ठोठावणे योग्य नाही. या मागे माहिती अधिकाराचे महत्व कमी करणे असे नसून सदर अर्जदाराने न्यायासनासमोर येण्यापूर्वी सर्वप्रथम संबंधित सरकारी अधिकाऱ्याकडे अर्ज देणे-संपर्क करणे आवश्यक आहे." [9]

वरील निर्देशांचा विचार करता एक गोष्ट स्पष्ट होते की कोणत्याही कायद्याचा गैरवापर होवू नये आणि त्याची योग्य प्रकारे अंमलबजावणी व्हावी यासाठी न्यायव्यवस्थेबरोबर नागरिकांचा सक्रिय सहभाग, जागरुकता आणि सहकार्यसुध्दा तितकेच महत्वाचे आहे, अन्यथा न्यायासनाने जनहितासाठी जनतेच्या हातात दिलेले हे दुधारी प्रभावी शस्त्र बोथट होण्यास फारसा वेळ लागणार नाही.

---

1. "The PIL which was initially created as a useful judicial tool to help the poor and weaker section of society who could not afford to come to the courts for justice, has in cause of time, developed in to uncontrollable "FRANKENSTEIN" and nuisance which is threatening to choke the dockets of the Supreme Court obstructing the hearing of genuine and regular cases which have been pending to be taken up for hearing." ***(Common Cause Society v/s Union of India : AIR 2008 SC 2116)***

2. "Now a days filling PIL has become a fashion to earn cheap popularity. But Article 226 provides that a writ petition can be filed to protect the right of those who can not approach to Court for justice due to poverty or other disabilities. It can not be used (misused) for personal gain or political motives or other ulterior consideration." ***(Subhash Sighania v/s State of Madhya Pradesh : 2005 (1) MP High Court Times 192 (DB)***

3. "Indiscriminate use (misuse) of public interest litigation may not turn in to "Private Interest Litigation, Political Interest Litigation or Publicity Interest Litigation' else it would loose its validity and credibility and on the same time people will loose faith and confidence in the Judicial System." ***(Dr. A.S. Anand CJI : Judicial Review & Judicial Activism – Need for Caution , 42 JILI 149 (159) (2000)***

4. "It is thus clear that only a person having a bonafied and having sufficient interest in the proceedings of Public Interest Litigation (PIL) will alone have a Locus standi and can approach the court to wipe out the tears of the poor and needy, suffering from violation of their fundamental rights, but not a person for personal gain or private profit or public motive or any other oblique consideration. Simply, a vexatious petitions under the colour of PIL brought before the court for vindicating any personal grievance, deserves rejection at the threshold." ***(Janatadal v/s Chaudhri & others : AIR 1993 SC 892)***

5. "Public Interest Litigation (PIL) not to be understood as Publicity Interest Litigation or Private Interest Litigation or Political Interest Litigation or Paise Income Litigation.When there is a material to show that a petition styled as Public Interest Litigation is nothing but a camouflage to foster personal disputes. Said petition is to be thrown out." ***(Ashok Kumar Pande & others v/s State of West Bengal : AIR 2004 SC 1923)***

6. "Petitioner not claiming to have any knowledge of allegation made against Respondent in said representation and paper cutting of News item. Petitioner is not aware of authenticity or otherwise of news item. News paper report per se not admissible in evidence, no eliment of public interest involved in the petition. Petitioner is a busy body bent upon self publicity, not shown to be really interested in the welfare of judicial system. Petition filled with oblique motive dismissed as misconceived, with exemplary cost of Rs. 10000/- imposed." ***(Dr. B. Singh v/s Union of India : AIR 2004 SC 1923)***

7. "No litigant has a right to unlimited draught on the court time and public money in order to get his affairs settled in the manner he wishes. Easy access should not be misused as a licence to file misconceived and frivolous petition" ***(Dattaraj Nathuji Thavre v/s State of Maharashtra : AIR 2005 SC 540)***

8. "Petitioners banking on information obtained through RTI Act must approach the concerned ministry bring the facts to its notice and demand justice. If the ministry does not reply, it is a different matter. But a person must demand notice from the authorities first before approaching the courts." ***(All India Road Network Users Association v/s Union of India )***

9. "It is not fair that everyone should approach the court after obtaining information under RTI without giving notice to the concerned authorities". The bench clarified that it was not undermining the importance of the PIL but insisted that the petitioners must approach the government first before moving courts." ***(All India Road Network Users Association v/s Union of India )***

# १४

# जनहित याचिका : साध्य आणि सफलता

## (Achivements of Public Interest Litigation)

### • जनहित याचिका : फलनिष्पत्ती (Accomplishment of PIL) :

गेल्या २/३ दशकांपासून जनहित याचिका ही त्वरित न्याय मिळवून देण्यासाठी एक प्रभावी न्यायप्रणाली म्हणून प्रस्थापित झाली आहे. या पध्दतीद्वारे मिळणारे निवाडे जनहिताच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे असल्याने त्यास फार मोठा प्रतिसाद मिळतो आहे. सरकारी दडपशाही, अनिर्बंध बेकायदेशीर वृत्ती आणि सत्तेचा गैरवापर यामुळे पिचलेल्या जनसामान्यांना या प्रक्रियेमुळे फार मोठा आधार मिळाला आहे. विशेषतः मानवाधिकार आणि गोरगरीबांच्या संविधानिक अधिकारांच्या संरक्षणाबाबत सरकार आणि सरकारी अधिकारी यांची जबाबदारी कितीतरी पटीने वाढली आहे यात वाद नसावा. या माध्यमाचा, कायदा आणि न्यायव्यवस्थेची प्रतिष्ठा वाढवण्यासाठी फार चांगला उपयोग झाला आहे. त्यामुळे कधी नव्हे तो न्याय भारतीय जनतेच्या अगदी दाराजवळ येवून पोचला आहे, असे म्हणणे वावगे ठरू नये.

राजकारणी आणि सनदी अधिकाऱ्यांच्या मनमानीला या माध्यमाद्वारे खीळ बसल्यामुळे त्यांची या न्यायप्रणालीवर नाराजी असणे स्वाभाविक आहे. तथापि एक उपलब्धी मान्य केली पाहिजे की उपेक्षित, गोरगरीब, आणि समाजातील दुर्बलघटक यांच्यासाठी जनहित याचिका हे वरदान म्हणून सिध्द झाले आहे. २०/२५ वर्षांपूर्वी त्वरित न्याय मिळणे केवळ दुरापस्त नव्हे तर असंभवनीय अशी परिस्थिती होती. परंतू या प्रक्रियेमुळे जनसामान्यांना अन्याय निवारणासाठी नवसंजिवनी मिळाली हे नाकारता येणार नाही.

सार्वजनिक आरोग्य, शासकीय अथवा शासकीय मदतीवर चालणाऱ्या पूर्व प्राथमिक शाळा, बालवाड्यांतील कोवळ्या मुलांना दुपारच्या भोजनाची निःशुल्क व्यवस्था, मनोरुग्णांवर उपचार, वैद्यकीय सेवा, वैद्यकीय महाविद्यालयासाठी प्रवेशप्रक्रिया, पर्यवरणाचे जतन, बांधकाम अथवा तत्सम प्रकल्पामुळे होणारे प्रदूषण,

नगरपालिकेच्या सेवासुविधा, आरोग्यदृष्ट्या सुयोग्य राहणीमानासाठी करावयाचे प्रयत्न, न्यायासनाच्या प्रतिष्ठेचे जतन, भ्रष्टाचार विरोधी मोहिम, धार्मिक विवादाचे निराकरण, अन्यायाविरुध्द दलित आणि मागासवर्गियांना संरक्षण, उच्च शिक्षणाचा दर्जा सुधारणे, कौटुंबिय निवृत्तीवेतन, कोणत्याही सार्वजनिक कामासाठी कायद्यानुरुप निवेदिका मागवणे, या व अशा कित्तेक प्रकरणी न्यायालयांनी जनहित लक्षात ठेवून दिलेल्या योग्य निवाड्यांमुळे सामान्य नागरिकांना फार मोठा दिलासा मिळाला आहे, हे निखळ सत्य नाकारता येत नाही.

गोरगरीब, उपेक्षित, समाजातील दुर्बलघटक आणि मागासवर्गियांना त्यांच्या मानवाधिकार आणि संविधानिक अधिकाराच्या रक्षणासाठी आणि त्वरित न्याय मिळवून देण्यासाठी पर्यायी न्यायदान ही जनहित याचिका प्रक्रियेची मूळ संकल्पना असली तरी, काळाच्या ओघात सामान्यजनांच्या हितासाठी त्यात वेळोवेळी अनेक विषय व समस्यांबाबत न्यायदानाचे कृतिक्षेत्र आणि अधिकार यांचा विस्तार होवून ही अनमोल न्यायप्रक्रिया जास्तीत जास्त क्रियाशील आणि जनताभिमुख होत राहील यात वाद नाही.

वरील विषयांव्यतिरिक्त जीवन आणि व्यक्तिस्वातंत्र्याच्या अधिकाराचे रक्षण आणि पर्यावरण संरक्षण या मूलभूत संविधानिक अधिकारांच्या बाबतीत जनहित याचिकेचे योगदान किती मोठे आणि महत्वाचे आहे हे खालील प्रकरणांवरून सहज लक्षात येईल.

## • जीवन आणि व्यक्तिस्वातंत्र्य : अधिकार संरक्षण
**(Protection of Right to Life and Liberty)**

भारतीय संविधानाच्या कलम २१ अन्वये प्रत्येक नागरिकास जीवन आणि व्यक्तिस्वातंत्र्याचे अधिकार प्राप्त झालेले असून कुणालाही या अधिकारांपासून वंचित करता येत नाही. तथापि काही विशिष्ट प्रसंगी या संदर्भात प्रश्न उपस्थित झाल्यास भारतीय न्यायसंस्थेने घालून दिलेल्या नियमांच्या चौकटीत राहूनच न्यायालयास सदर प्रकरणात हस्तक्षेप / निवाडा करण्याचा अधिकार आहे. या संदर्भात कु. अरुणा रामचंद्र शानबाग या दुर्दैवी युवतीच्या 'दयामरण' प्रकरणी 'जनहित याचिकेचे' योगदान मोलाचे ठरले आहे.

**"कु. अरुणा रामचंद्र शानबाग"** ही केईएम इस्पितळ-मुंबई येथे परिचारिका म्हणून काम करत होती. सोहनलाल वाल्मिकी या इस्पितळातील झाडूवाल्याने १९७३ साली अरुणावर पाशवी बलात्कार करून तिचा साखळीने गळा आवळला. परिणामी अरुणाच्या मेंदूला होणारा रक्त आणि प्राणवायूचा पुरवठा खंडित होवून ती बेशुध्दावस्थेत-कोमात गेली. त्या प्राणांतिक आघातामुळे तिची वाचा आणि दृष्टीसुध्दा नष्ट झाली. गेली ३९ वर्षे दुर्दैवी अरुणा भाजीपाल्यागत लोळागोळा होवून केईएम इस्पितळात मृत्युशी झुंज देत आहे. तिच्या शारीरिक अवस्थेत यापुढे कसल्याही प्रकारच्या वैद्यकीय सेवेने कधीही सुधारणा होणार नाही हे लक्षात आल्यावर तिची सुहृद **"पिंकी विराणी"** या बहाद्दर महिलेने जीवन आणि व्यक्तिस्वातंत्र्याच्या अधिकाराखाली 'जनहित याचिका' दाखल करून अरुणास **"दयामरण"** (Euthanasia) मिळावे म्हणून सरळ मा. सर्वोच्च न्यायालयाचा दरवाजा ठोठावला. या याचिकेच्या निमित्ताने दयामरणाचा-इच्छामरणाचा प्रलंबित प्रश्न पुन्हा एकदा न्यायासनाच्या ऐरणीवर आला हे या जनहित याचिकेचे फार मोठे यश म्हणावे लागेल.

या प्रकरणी न्यायालयीन दृष्टीकोन समजून घेण्याअगोदर **'दयामरण'** यासंबंधी माहिती असणे अनिवार्य ठरते. असाध्य, यातनामय अथवा प्राणांतिक व्याधीने पीडित व्यक्तीला कोणत्याही वैद्यकीय अथवा इतर उपचारामुळे कधीही बरे होण्याची सुतराम शक्यता न उरल्यास अशा व्यक्ती हतबल होवून केवळ मरणाची वाट पहात खितपत पडलेल्या असतात. अशा अगतिक व्यक्तींना सन्मानाने दयामरण मिळावे का नाही? हा सध्या न्यायालयीन वादाचा विषय ठरला आहे. भारतात दयामरणाला कायद्याने बंदी असली तरी बेल्जीयम, लॅग्झेंबर्ग, नेदरलॅंड, थायलंड आणि अमेरिकेतील ओरेगॉन आणि वॉशिन्टन या राज्यात दयामरणाला कायदेशीर मान्यता देण्यात आलेली आहे. ही वस्तुस्थितीसुध्दा विचार करण्यासारखी आहे.

दयामरणाचे (Euthanasia) प्रामुख्याने दोन प्रकार आहे. पहिले **सक्रिय दयामरण** (Active Euthanasia) आणि दुसरे **निष्क्रिय-निर्विरोध दयामरण** (Passive Euthanasia). पहिल्या प्रकारात असाध्य व्याधीग्रस्त व्यक्तीस डॉक्टरांच्यासल्याने प्राणांतिक औषधाचा डोस (Lethal Injection) देवून त्यास जीवनमुक्त केले जाते. दुसऱ्या प्रकारात व्याधीग्रस्त व्यक्तीच्या शरीरास लावलेली

जीवनाधार उपकरणे (Life Supports) बंद करून अथवा काढून घेवून त्यास मुक्ती दिली जाते.

**"कु. अरुणा रामचंद्र शानबाग वि. भारत सरकार"** या प्रकरणी (Writ Petition No. 115 of 2009) सर्वोच्च न्यायालयाच्या **मा.न्या. श्री. मार्कण्डेय काटजू** आणि **मा.न्या.श्री. ग्यान सुधा मिश्रा** यांच्या खंडपीठाने सदर याचिका जरी फेटाळून लावली असली तरी दयामरण संदर्भात त्यांनी दिलेला न्यायालयीन दिलासा महत्वपूर्ण ठरावा. मा. खंडपीठाने आपल्या निकालपत्रात म्हटले आहे की :-

> **"रोग्याची शारीरिक अवस्था कायमस्वरुपी लोळागोळा झालेली असेल (Persistent Vegetable State - PVS) आणि यापुढे त्यात कोणत्याही प्रकारची सुधारणा होण्याची सुतराम शक्यता नसेल अशावेळी रोग्याच्या जवळच्या नातलगाने अथवा मित्राने, कौटुंबिक डॉक्टर अथवा इस्पितळातील उपचार करणाऱ्या वैद्यकीय अधिकाऱ्याने रोग्याला लावलेली जीवनाधार उपकरणे (Life Supports) काढून टाकण्यावी परवानगी मिळवण्यासाठी विनंती अर्ज केल्याप्रकरणी उच्च न्यायालयास संविधान कलम २२६ अन्वये योग्य तो निर्णय / निवाडा देण्याचा अधिकार आहे."** [1]

## • पर्यावरण संरक्षण : (Protection of Envoirnment)

भारतीय संविधानाच्या कलम ५१-अ अन्वये, हवा, पाणी, जमीन, वातावरण, वनराई, वन्य जीवन, इत्यादी नैसर्गिक स्रोतांच्या संरक्षणाबरोबर पर्यावरणाचे संवर्धन करणे हे प्रत्येक नागरिकाचे परम कर्तव्य आहे. भूसंपत्तीच्या हव्यासापोटी होणारे वारेमाप भूखणन, जलसिंचनासाठी बांधलेली महाकाय धरणें, वेगवेगळ्याप्रकारची ऊर्जा निर्मिती केंद्रे, सांडपाणी, मैला आणि विषारी द्रव्यांचा नदीत/समुद्रात सतत निचरा, झाडांची कत्तल, ध्वनी प्रदुषण, या व अशा कारणांमुळे प्रदुषणात वाढ होवून आरोग्य धोक्यात येते. पर्यायाने पर्यावरणाचा समतोल ढळतो. पर्यावरण संवर्धनासाठी या गैरप्रकारांवर नजर ठेवणे आवश्यक असेल तेव्हा त्यांस कडाडून विरोध करणे ही जबाबदारी प्रत्येक नागरिकांची आहे.

मा. सर्वोच्च न्यायालयाने या विषयाची गंभीर दखल घेत संविधान कलम ३२ची व्याप्ती वाढवून त्यात पर्यावरण संरक्षण आणि संवर्धनासाठी फार महत्वाच्या तरतूदी केल्या आहेत. परिणामी पर्यावरण संरक्षण आणि संवर्धनासाठी 'जनहित याचिकेच्या' माध्यमातून फार मोठे योगदान लाभले आहे हे खालील काही निवडक प्रकरणांवरून सहज लक्षात येवू शकेल :-

• **"सोसायटी फॉर प्रोटेक्शन ऑफ सायलेंट व्हॅली विरुध्द भारत सरकार"** याचिका प्रकरणी (PIL Petition No 3025 of 1979 decided by the Kerala High Court) केरळ राज्यातील नागरिकांनी सायलेंट व्हॅली परिसरात जलविद्युत प्रकल्प उभारण्यास तीव्र विरोध दर्शविला होता. या प्रकल्पामुळे मोठ्याप्रमाणात प्रदुषण वाढून पर्यावरणाचा समतोल ढळेल असा युक्तिवाद अर्जदाराने केला होता. मा. केरळ उच्च न्यायालयाने हे प्रकरण 'पूर्णपणे राज्यसरकारच्या अधिकार क्षेत्रात येत असल्यामुळे' सदर याचिका फेटाळून लावली होती. तथापी प्रकल्पास जनतेचा वाढता विरोध लक्षात घेता तत्कालीन पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी स्वतः हस्तक्षेप करून प्रस्तावित प्रकल्प रद्द करून टाकला.

• **"भवानी रिव्हर ॲण्ड शक्ती शुगर्स लि. "** याचिका प्रकरणी (AIR 2000 SC 1456) शक्ती शुगर्स लि. या मद्यनिर्मिती कंपनीकडून भवानी नदीमध्ये प्रदुषित आणि विषारी सांडपाणी सोडले जात असल्याने संपूर्ण परिसरात सर्वत्र दुर्गंध पसरून प्रदुषित पाण्यामुळे मानवी आणि वन्यजीवनास धोका उत्पन्न झाला होता. मा. सर्वोच्च न्यायालयाने जनहित याचिकेवर निवाडा देताना या जलप्रदुषणाची गंभीर दखल घेवून सदर मद्यनिर्मिती कारखाना तात्काळ बंद केला.

• **"रूरल लिटिगेशन ॲण्ड एन्टायटलमेंट-डेहराडून विरुध्द उत्तरप्रदेश राज्य"** प्रकरणी (AIR 1985 SC 652) सदर अर्जदार संस्थेने जनहित याचिका दाखल करून मसूरी जवळ मोठ्याप्रमाणात चालू असलेल्या चुनखडी-खाणकामांना आक्षेप घेताना 'सदर खाणकामामुळे वातावरण प्रदुषित होवून पर्यावरणाचा ऱ्हास होत आहे' हे कोर्टाच्या निदर्शनास आणून दिले. मा. सर्वोच्च न्यायालयाने संविधान कलम ३२ अन्वये अधिकाराचा वापर करून पर्यावरण संरक्षणासाठी जो पर्यंत काटेकोर उपाय योजिले जात नाहीत तो पर्यंत त्यातील काही खाणी व खाणकाम तात्काळ बंद केले.

• **"एम. सी. मेहता विरुध्द भारत सरकार"** प्रकरणी (AIR 1998 SC 1037 & also AIR 1988 SC 1115) सर्वोच्च न्यायालयाने 'गंगाजल प्रदुषण' संदर्भात दिलेला निवाडा महत्वाचा ठरतो. कानपूरजवळ (जजमहो) रासायनिकप्रक्रिया करून कातडी कमावणाऱ्या लघुउद्योगांकडून सदर प्रक्रियेमुळे शिल्लक राहिलेला गाळसाळ आणि प्रदुषित सांडपाणी कोणतीही स्वच्छताप्रक्रिया न करता गंगा नदीत विसर्जित केले जात होते. परिणामी प्रदुषणाचे प्रमाण वाढून परिसरातील जनजीवनास धोका उत्पन्न झाला होता. यावर मा. सर्वोच्च न्यायालयाने **"जो पर्यंत सदर लघुउद्योग त्यांच्या कारखान्यात स्वच्छताप्रक्रिया यंत्रसंचाची उभारणी करणार नाहीत तो पर्यंत हे सर्व उद्योगधंदे ताबडतोब बंद करण्यात यावेत."** असे आदेश दिले.

• **"भोपाळ वायू गळती दुर्घटना"** : २ मार्च १९८४ च्या मध्यरात्री भोपाळस्थित युनियन कार्बाईडच्या कारखान्यातून एमआयसी या विषारी वायूच्या प्रचंड गळतीमुळे ३०० जणांनी प्राण गमावले आणि जवळपास १ लाख लोक विषबाधा होवून व्याधीग्रस्त झाले. या भयावह दुर्घटनेमुळे प्रचंड जनक्षोभ उसळला, आणि सरकार हादरून गेले. केन्द्र सरकारने, भोपाळच्या नागरिकांच्यावतीने त्वरीत युनियन कार्बाईड कार्पोरेशनवर न्यूयॉर्क आणि भारतात नुकसान भरपाई संबंधात याचिका दाखल करून दावे गुदरले. ५ वर्षे न्यायालयीन लढाईच्या शेवटी सदर प्रकरणी, १४ फेब्रुवारी १९८९ रोजी भारताच्या मा. सर्वोच्च न्यायालयाने (AIR 1992 SC 3127 : (1995) 4 SCC (Suppl) 59) **'युनियन कार्बाईड कॉर्पोरेशनने भारत सरकारला तब्बल ४७० करोड अमेरिकन डॉलर्स एवढी रक्कम नुकसानभरपाई म्हणून द्यावी'** असा निवाडा दिला. युनियन कार्बाईडने नुकसानभरपाईची संपूर्ण रक्कम भरून वाद मिटवला.

---

1. Under article No. 226 of the Constitution the High Court has power to pass suitable orders on the application filed by the near relations or next friend or the doctor / hospital staff praying for permission to withdraw the life supports to an incompetent person of the kind mentioned above (Persistent Vegetable State – PVS). (Writ Petition No.115 of 2009).

# १५

# संविधानिक अधिकार आणि जनहित याचिकेचे योगदान

## (Constitutional Rights and Role of PIL)

भारतीय संविधानाने प्रत्येक नागरिकाला जीवन आणि व्यक्तिस्वातंत्र्याबरोबर, भाषण आणि व्यवसाय स्वातंत्र्य, समान न्याय, रोजगार, अन्न-वस्त्र-निवारा, अल्पसंख्यांक आणि दलितांचे संरक्षण हे अधिकार बहाल केलेले असून मजूर-कामगार, पर्यावरण संवर्धन तसेच महिला आणि कोवळ्यामुलांच्या मूलभूत अधिकारांचे जतन केलेले आहे. समाजातील दुर्बलघटक, अशिक्षित आणि उपेक्षितांवर झालेला अन्याय, आणि अथवा त्यांच्या मूलभूत अधिकारांचे उल्लंघन झाल्यास जनहित याचिकेच्या माध्यमातून एक पर्यायी गतिमान न्यायदानाची सोय झाल्यामुळे गोरगरीबांना त्वरित न्याय मिळण्याची फार मोठी सोय झाली आहे, यात दुमत असल्याचे कारण नाही. संविधानिक अधिकारांबाबतीत जनहित याचिकेचे योगदान किती मोठे आणि महत्वाचे ठरले आहे हे मा.न्यायालयाने वेळोवेळी दिलेल्या खालील निवाड्यांवरून स्पष्ट होवू शकेल :-

### १) संविधान कलम २१ : जीवन आणि व्यक्तिस्वातंत्र्याचा अधिकार :-

**(Right to Life and Personal Liberty under Article No. 21 of the Constitution)**

भारतीय संविधानाच्या कलम २१ अन्वये प्रत्येक भारतीय नागरिकाला 'जीवन आणि व्यक्तिस्वातंत्र्याचे' मूलभूत अधिकार (Right to Life and Liberty) प्राप्त झालेले आहेत. काळाच्या ओघात या अधिकारांची सुस्पष्टता आणि व्याप्ती अजून वाढली आहे आणि वाढत आहे ही फार समाधानाची बाब आहे. त्याबाबतीत सर्वोच्च न्यायालयाने वेगवेगळ्या खटल्यात दिलेल्या काही महत्वपूर्ण निवाड्यांची माहिती वाचकांसाठी खाली दिली आहे :-

• **"खरकसिंग विरुध्द उत्तरप्रदेश राज्य"** प्रकरणी (AIR 1963 SC 1295) निवाडा देताना मा. सर्वोच्च न्यायालयाने वरील मूलभूत अधिकारांच्या कक्षा अजून विस्तारित

केल्या आहेत. 'जीवन आणि व्यक्तिस्वातंत्र्याच्या बाबतीत व्याप्ती वाढवताना आणि त्याचे सुस्पष्टीकरण करताना, मा. सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे की :-

> **"प्रत्येकाचे आयुष्य हे 'सार्थ' (Meaningful), 'अर्थपूर्ण' (Complete) आणि 'सुसह्य' (Worth Living) असले पाहिजे."** मा. न्यायालयाने एक पाऊल पुढे जावून म्हटले आहे की **"जगण्याच्या अधिकारात शांततापूर्ण जीवन (Peaceful Life), शांततापूर्ण निद्रा (To Sleep in Peace) आणि प्रदुषणमुक्त आरोग्य (Polution free Health), हे ही समाविष्ट आहे."** [1]

● **"पांडुरंग प्रभाकर हस्कोट विरुध्द महाराष्ट्र सरकार"** प्रकरणी (AIR 1966 SC 424) दिलेला न्यायालयीन निवाडा याबाबतीत महत्वपूर्ण ठरावा. सदर प्रकरणी, वादीने त्याच्या स्थानबध्दतेच्या काळात (Preventive Dention) विज्ञान विषयावर एक पुस्तक लिहिले, आणि ते प्रसिध्द करण्यासाठी आपल्या पत्नीकडे पाठवण्याची परवानगी द्यावी अशी राज्यसरकारला विनंती केली. तथापि महाराष्ट्र सरकारने एकतर्फी निर्णय घेवून परवानगी देण्याचे नाकारले. वादीने संविधानाच्या कलम २१ अंतर्गत, महाराष्ट्र सरकारच्या या निर्णयाला न्यायालयात आव्हान दिले. दोन्ही पक्षकारांचा युक्तिवाद ऐकल्यानंतर मा. न्यायालयाने महाराष्ट्र सरकारचा एकतर्फी आदेश फेटाळून लावताना स्पष्ट केले की:-

> **"स्थानबध्द कैद्याने कारागृहात लिहिलेले साहित्य प्रसिध्दीसाठी त्याच्या नातलगाकडे पाठवण्यावर कायद्याप्रमाणे कोणतेही बंधन नसून महाराष्ट्र सरकारचा आदेश कलम २१ अन्वये जनतेच्या संविधानिक अधिकारांचे उल्लंघन करणारा असल्याने तो फेटाळण्यात येत आहे."** [2]

● **"सतवंत सिंह विरुध्द असिस्टंट पासपोर्ट ऑफिसर-नवी दिल्ली"** प्रकरणी (AIR 1967 SC 1297 (1309)) प्रतिवादीने पारपत्र (पासपोर्ट) देण्याचे नाकारल्यामुळे असंतुष्ट वादीने न्यायालयाचे दरवाजे ठोठावले. सुनावणी पूर्ण झाल्यावर मा. सर्वोच्च न्यायालयाने वादीच्या बाजूने निकाल देताना स्पष्ट केले की :-

> **"संविधान कलम २१ अन्वये वादीला परदेश पर्यटनाचा पूर्ण अधिकार असून तो अधिकार त्याच्या व्यक्तिस्वातंत्र्याशी निगडीत आहे. त्यामुळे राज्य सरकारला असा लहरी आणि एकतर्फी निर्णय घेण्याचा (पासपोर्ट नाकारण्याचा) अधिकार नाही."** [3]

- **"फ्रॅन्सीस कोरोली विरुध्द भारत सरकार"** प्रकरणी (AIR 1981 SC 746) निर्णय देताना मा.सर्वोच्च न्यायालयाने, भारतीय संविधान कलम २१ ची व्याप्ती अजून सुस्पष्ट करताना म्हटले आहे की :-

> **"कलम २१ अन्वये भारतीय नागरिकास मिळालेले मूलभूत अधिकार फक्त त्याच्या जीवन आणि व्यक्तिस्वातंत्र्यापुरतेच मर्यादित नसून त्यात सन्मानाने- प्रतिष्ठेने जगणे आणि त्यासाठी आवश्यक असणाऱ्या सेवासुविधांचा वापर करणे, सकस अन्न, वस्त्र, निवारा, लेखन, वाचन, सहजीवन आणि अभिव्यक्तिस्वातंत्र्य यांचाही समावेश आहे."** [4]

- **कैद्यांचे (पुरुष आणि महिला) अधिकार :-**

**(Rights of Prisoners)**

तुरुंगाधिकाऱ्यांकडून पुरुष व महिला कैद्यांना कारागृहात दिली जाणारी अमानवी वागणूक, त्यांचा केला जाणारा अमानुष छळ, जीवनावश्यक किमान सोईसुविधांचा अभाव आणि तुरुंगव्यवस्थेचा लहरी व जुलमी कारभार यावर लगाम घालण्यासाठी व त्याचबरोबर तुरुंगव्यवस्थेत आणि कैद्याच्या राहणीमानात सुधारणा, आणि कैद्यांच्या मूलभूत संविधानिक अधिकाराचे संरक्षण करण्यासाठी 'जनहित याचिकेच्या' माध्यमातून फार मोठे योगदान लाभले आहे. संविधान कलम २१ आणि २२ अन्वये प्रत्येक आरोपीस/कैद्यास अटक झाल्यावर जीवन आणि व्यक्तिस्वातंत्र्याच्या अधिकाराबरोबरच खटल्याच्या गतिमान सुनावणीचा अधिकार प्राप्त आहे. मा. सर्वोच्च न्यायालयाने याबाबतीत अनेक प्रकरणी राज्यसरकार आणि तुरुंगव्यवस्थापनावर वारंवार आसूड ओढले आहेत. वाचकांच्या माहितीसाठी काही निवाड्यांचा त्रोटक वृत्तांत खाली दिला आहे :-

● **"डी.व्ही. पटनाईक विरुध्द आन्ध्रप्रदेश सरकार"** प्रकरणी (AIR 1974 SC 2093) मा. सर्वोच्च न्यायालयाने राज्य सरकारला कडक शब्दात फटकारताना म्हटले आहे की :-

> **"कैदीसुध्दा इतरांसारखाच सामान्य नागरिक असल्याने कोणत्याही परिस्थितीत त्याचा जीवन आणि व्यक्तिस्वातंत्र्याचा अधिकार नाकारला जावू शकत नाही. कैद्यांना तुरुंगात मिळणारी अमानुष वागणूक ही संविधान कलम १४, १९ आणि २१ अंतर्गत प्राप्त झालेल्या अधिकाराचे उल्लंघन असून, कैद्याचा गुन्हा सिध्द होण्याची शक्यता असली तरी ही त्याचा निःपक्षपाती सुनावणी आणि योग्य न्याय मिळवण्याचा अधिकार अबाधित राहतो."** [5]

● **"संतोष डे विरुध्द अर्चना गुहा"** प्रकरणी (AIR 1994 SC 1229) आरोपीस अटक होवून तब्बल ८ वर्षाहून अधिक काळ लोटला तरी सरकारच्या हलगर्जीपणामुळे सदर फौजदारी खटल्याची सुनावणी सुरू होवू न शकल्याने सर्व परिस्थितीचा पूर्णपणे सारासार विचार करून मा. सर्वोच्च न्यायालयाने **'सदर खटला रद्दबातल ठरवून आरोपीची बिनशर्त मुक्तता करण्याचे आदेश दिले.'**

●**"शीला बारसे विरुध्द महाराष्ट्र सरकार"** प्रकरणी (AIR 1981 SC 643) महिला आरोपींना पोलीस कोठडीत मिळणारे अपुरे संरक्षण आणि वाईट वागणुकीची गंभीर दखल घेत मा. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती **मा.श्री. कृष्णा अय्यर** यांनी सरकारला सणसणीत चपराक लगावताना म्हटले आहे की :-

> **"महिला आरोपींना पर्याप्त संरक्षण देणे ही सरकारची नैतिक जबाबदारी आहे आणि त्यासाठी महिला आरोपींना स्वतंत्र आणि वेगळ्या कोठडीत ठेवून त्यांच्यावर फक्त महिला पोलीसांनीच निगराणी ठेवणे आणि त्यांचे संरक्षण करणे अनिवार्य आहे."** [6]

● **"रामेश्वर विरुध्द मध्यप्रदेश सरकार"** फौजदारी अपील प्रकरणी महिलांचे लैंगिक शोषण आणि त्यांच्यावरील अत्याचार संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाच्या **मा.न्या.श्री.**

हेगडे आणि मा.न्या.श्री. एस.बी. सिन्हा यांच्या खंडपीठाने फार गंभीर दखल घेवून महिलांवर तुरुंगात होणारे लैंगिक अत्याचार आणि त्यांना दिल्या जाणाऱ्या अमानवी वागणुकीची कठोर शब्दात निर्भत्सना करून मध्यप्रदेश उच्च न्यायालयाचा निर्णय रद्द करताना दिनांक १६ फेब्रुवारी २००५ दिलेल्या आपल्या निर्णयात म्हटले आहे की :-

> **"महिलांचे लैंगिक शोषण-पिळवणूक आणि त्यांच्यावरील शारीरिक अत्याचाराची प्रकरणे अत्यंत कडकपणे हाताळून गुन्हा सिध्द झाल्यास गुन्हेगाराला कुठलीही दयामाया न दाखवता कठोरात कठोर शिक्षा ठोठावणे आवश्यक आहे."** [7]

*टीप : बलात्कार, कौटुंबिक छळ, हुंडाबळी, कार्यालयात वरिष्ठाकडून होणारे लैंगिक शोषण या व अशा अनेक प्रकरणी न्यायालयाने विविध निवाड्यांद्वारे महिलांना वेळोवेळी उचित न्याय मिळवून दिला आहे.*

## ● बालमजूर आणि बाल गुन्हेगार यांचे अधिकार :-

(Rights of Children and Juvenile Delinquents)

बालमजूरी हा कायद्याने गुन्हा आहे, तरीसुध्दा आपल्या देशात कोवळ्यामुलांना सर्रास बालमजूर म्हणून राबवले जात आहे ही वस्तुस्थिती नाकारता येत नाही. मोलमजुरी शिवाय त्यांचा लैंगिक छळ करणे, अनैतिक कामासाठी वापर करणे, भिकारी म्हणून बाळगणे अशी कृत्ये कायद्याने दंडनीय आहेत.

मा. न्यायालये आणि राज्यसरकार त्यांच्यापरीने या गैरप्रकाराला आळा घालण्यासाठी सातत्याने प्रयत्न करीत असले तरी जोपर्यंत समाजातील सर्वसामान्य नागरिकाला अशा निंदनीय प्रकारांची खऱ्याअर्थाने जाणीव होणार नाही आणि त्यासाठी सक्रिय सहभाग आणि योगदान दिले जाणार नाही तो पर्यंत समाजकंटकांकरवी लहान मुलांवर लादलेला हा वर्षानुवर्षाचा वनवास सहजासहजी संपेल असे वाटत नाही. याबाबतीत समाजातील सर्वस्तरावर जनजागरण होण्याची नितांत आवश्यकता आहे. कोवळ्यामुलांवर होणाऱ्या अन्यायाविरुध्द न्यायालयाने खंबीर भूमिका घेवून कठोर निर्णय घेतलेले आहेत. याबाबतीतील काही महत्वपूर्ण निवाड्यांचा या ठिकाणी परामर्श घेण्यात आला आहे :-

● " **पिपल्स युनियन फॉर डेमोक्रेटीक राईट्स विरुध्द भारत सरकार (ऐशियाड)"** प्रकरणी (AIR 1982 SC 1473) **न्या.मा. भगवती आणि न्या. मा. बेहरूल इस्लाम** यांच्या खंडपीठाने बालमजुरीच्या संदर्भात उद्‌विग्न होवून सरकारवर ताशेरे ओढताना सडेतोड निर्णय दिला आहे :-

> **"१४ वर्षाच्या आतील मुले अथवा मुलींना बांधकामासाठी मजूर म्हणून वापरणे कायद्याने दखलपात्र गुन्हा आहे. या कायद्याचे उल्लंघन झाल्याचे आढळून आल्यास अशाप्रसंगी सर्व संबधितांना कठोरात कठोर शासन झाले पाहिजे."** [8]

नामवंत पत्रकार, सुप्रसिध्द समाजसेविका आणि महाराष्ट्र विधिसहाय्यता मंडळाच्या सन्माननीय सदस्य **श्रीमती शीला बारसे** यांनी या संदर्भात वेळोवेळी जनहित याचिकेच्यामाध्यमातून बालमजुरांच्या व्यथा तसेच बालगुन्हेगारांचे योग्य संगोपन, पुनर्वसन, सुधारगृहातील अपुऱ्या सोईसुविधा, तेथील व्यवस्थापनातील सावळागोंधळ, कोवळ्यामुलांवर होणारे शारीरिक अत्याचार या व अशा विविध विषयांना वेळोवेळी वाचा फोडली आणि मा.न्यायालयांना या गंभीर विषयात हस्तक्षेप करण्यास प्रवृत्त केले.

परिणामी न्यायव्यवस्थेने अशा प्रकरणी गंभीर दखल घेत वेळोवेळी कडक निर्देश पारित केले असून राज्यसरकारला बालमजूर आणि बालगुन्हेगारांच्या अधिकाराचे संरक्षण करण्यास भाग पाडले. श्रीमती शीला बारसे यांचे हे अनमोल योगदान समाजाला कधीच विसरता येणार नाही. त्यांच्या या असामान्य समाजसेवेबद्दल त्यांना द्यावेत तेवढे धन्यवाद अपुरेच ठरतील.

याशिवाय कामगार-मजुरांचे अधिकार, पर्यावरण संरक्षण, राज्यस्तरीय राजकीय आणि सामाजिक भ्रष्टाचार, सामाजिक आरोग्य आणि स्वास्थ्य, वैद्यकीय मदत, धार्मिक वादांचे निराकरण, समाजातील उपेक्षित, दुर्बलघटक आणि दलितांवरील अन्याय, उच्च शिक्षण, कौटुंबिक निवृत्ती वेतन, आर्थिक घोटाळे या व अशा अनेक महत्वाच्या ज्वलंत प्रश्नांना "जनहित याचिकेच्या" माध्यमातून जाहीर वाचा फुटली. परिणामी न्यायालयांनी अशा सामाजिक समस्यांची दखल घेवून त्याबाबतीत त्वरित न्याय निवाडे देण्याचे आणि कठोर आदेश पारित करण्याचे अत्यंत महत्वपूर्ण काम केलेले आहे.

सर्वसामान्य नागरिकांना त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाविरुध्द गतिमान न्याय मिळवण्यासाठी जनहित याचिकेची फार मोठी मदत झाली आहे. त्यामुळे नागरिकांच्या मूलभूत अधिकारांच्या रक्षणासाठी जनहित याचिकेचे हे अनमोल योगदान कुणालाही नजरेआड करून चालणार नाही.

---

1. "In the matter of ***Kharak Singh v. State of Uttar Pradesh (AIR 1963 SC 1295),*** The Supreme Court directed that the scope of this right (Article – 21) is extended to such an extent that now it includes within it, all those rights which insure making a person's life meaningful, complete and worth living , thus right to life now includes right to live in peace, to sleep in peace, enjoy a pollution-free health and so on."

2. "In the matter of ***Pandurang Prabhakar Haskot v. State of Maharashtra (AIR 1966 SC 424)*** , the petitioner challenged the order of the Government on the ground that it violated his right to liberty under Article -21 as there was no law prohibiting on transmission of the book or any literature from Jail to his relative etc. Admitting the petition, the Court held that the refusal by the Government was in contravention of Article -21 of the Constitution and therefore, was liable to be quashed."

3. "In the matter of ***Satwant Singh v. Asstt. Passport Officer, New Delhi, (AIR 1967 Sc 1297 (1309))*** the Apex Court gave a wider interpretation to right to life and liberty under Article – 21 and held that a person's right to travel abroad is a part of his right to personal liberty and therefore the State cannot take away this right arbitrarily. "

4. "The Apex Court in the matter of ***Francis Coralie v. Union of India, (AIR 1981 SC 746)*** held that right to life under Article-21 is not confined only to the animal existence, it includes within it right to live with human dignity, and all that goes along with it, namely, the bare necessities of life such as adequate nutrition, clothing and shelter and facilities for reading, writing, and expressing ourselves in diverse forms."

5. "The Supreme Court in the matter of ***D.V.H. Patnaik v. State of Andhra Pradesh (AIR 1974 SC 2093)*** reiterated that a prisoner, like any other individual cannot be deprived of his rights to life and liberty except by the procedure established by law. Therefore, inhuman treatment of prisoners will be in violation of Articles - 14,19 and 21 of the Constitution. Even a prisoner whose guilt has been proved should be extended a right to fair and impartial trial."

6. "The Supreme Court in the matter of ***Sheela Barse v. State of Maharashtra, (AIR 1981 SC 643)*** gave detailed instructions to the concerned authorities for providing adequate protection and security to them (Women Suspects) and emphasized the need to keep female detenues in seperate lockups which should be guarded by female police constables."

7. "In the matter of criminal appeal of ***Rameshwar v. Union of India*** decided by the Apex Court on 16th February 2005, held that the cases involving sexual exploitation and violence against women should be sternly dealt with and no leniency should be shown in awarding punishment to the accused who is found guilty of such offences."

8. "In the matter of ***Peoples' Union for Democratic Rights v/s Union of India ( Asiad case) (AIR 1982 SC 1473)*** Hon'ble Justice Bhagawati and Justice Bahrul Islam held that the girls and boys below the age of fourteen years should not be utilized to work on construction sites and the contravention of this law shall be severely punishable."

# १६

# सामाजिक न्याय, न्यायिक उपाययोजना, आणि निःशुल्क विधिसहाय्यता

**(Social Justice, Judicial Remedies & Free Legal Aid)**

प्रचलित किचकट न्यायप्रक्रिया लक्षात घेता आर्थिक पाठबळ असल्याशिवाय जनसामान्यांना कोर्टाची पायरी चढणे शक्य होत नाही. वर्षानुवर्षे प्रलंबित खटल्यामुळे आर्थिक नुकसानाबरोबर चांगल्याचांगल्यांचे मनोबलसुध्दा खची होते ही वस्तुस्थिती आहे. परिणामी समाजातील मागासवर्गिय, उपेक्षित, गोरगरीब आणि दुर्बलांना न्याय मिळणे किती दुरापस्त आहे याची कल्पना न केलेलीच बरी. जोपर्यंत न्याय जनसामान्यांपर्यंत पोचत नाही तो पर्यंत न्याययंत्रणेचे लोकशाहीकरण झाले आहे असे म्हणणे धारिष्ट्याचे ठरेल. भारतासारखा खंडप्राय देश, अर्ध्याहून अधिक जनता गरीब आणि निरक्षर असल्यामुळे गोरगरीबांच्या दारात सहजासहजी न्याय पोचेल, ही कल्पनाच मुळी स्वप्नरंजन वाटणे स्वाभाविक आहे.

तथापि भारतीय न्यायव्यवस्थेला त्या दिशेने प्रयत्न करणे अपरिहार्य होते. जनहितासाठी गतिमान पर्यायी न्यायदान, निःशुल्क विधिसहाय्य, यासंदर्भात सरकार आणि न्यायव्यवस्थेकडून ठोस पावले उचलली जात होती. या सकारात्मक प्रयत्नांचा परिपाक म्हणून, 'जनहित याचिका', 'लोक अदालत', 'माहिती अधिकार' या संकल्पनांना मूर्तस्वरूप येवू शकले. या परिवर्तन प्रक्रियेमुळेच खऱ्या अर्थाने भारतात वैकल्पिक न्यायदानाचे लोकशाहीकरण (Democratization of Judicial Remedies) आणि सामाजिक न्यायाच्या तर्कशुध्द पुनर्रचनेस (Rationalisation of the concept of Social Justice) चालना मिळाली यात वाद नसावा.

## • सामाजिक न्याय आणि न्यायिक उपाययोजना

**(Social Justice and Judicial Remedies)**

वरील पार्श्वभूमीवर गोरगरीब, उपेक्षित आणि तळागाळातील सामान्यजनांच्या मूलभूत आणि मानव अधिकारांचे रक्षण करण्यासाठी काही तरी ठोस

पाऊल उचलण्याची आवश्यकता होती. काळाची गरज ओळखून न्यायापासून वंचित नागरिकांना सामाजिक आणि आर्थिक न्याय गतिमान पध्दतीने मिळवून देण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाचे तत्कालीन न्यायमूर्ती **मा. श्री. पी. एन. भगवती** यांनी 'जनहित याचिकेला' मूर्तस्वरूप देण्यासाठी केलेले प्रयत्न प्रशंसनीय आहेत. जनहित याचिकेच्या गतिमान न्यायपध्दतीमुळे भारतीय न्यायप्रणालीचे लोकशाहीकरण झाले असे म्हणणे अतिशयोक्ती ठरू नये.

तुरुंगात सुनावणीशिवाय वर्षानुवर्षे खितपत पडलेल्या हजारो कैद्यांचे जीवन सुसह्य करणे, बालगुन्हेगार आणि सुधारगृहातील मुलांना चांगली वागणूक देणे, वेठबिगारी संपवणे, वारांगनांचे आणि त्यांच्या मुलांचे पुनर्वसन करणे, तुरुंगात अथवा कस्टडीत असलेल्या कैद्यांची/आरोपींची छळवणूक थांबवणे, पर्यावरणाचे संरक्षण करणे या व अशा कित्येक सामाजिक समस्यांना जनहित याचिकेच्या कृतिकक्षेत आणून भारतीय न्यायव्यवस्थेने अतुलनीय कामगिरी केलेली आहे. जनहित याचिकेच्या न्यायालयीन निवाड्यांची सक्तीने अंमलबजावणी करण्याची पूर्ण जबाबदारी राज्यसरकारांवर टाकल्यामुळे जनतेला अल्पावधीत दिलासा मिळण्याची सोय उपलब्ध झाली हे मान्य करावेच लागेल.

समाजातील दुर्बलघटक, उपेक्षित आणि गोरगरीब यांना पर्यायी न्यायदान म्हणून जनहित याचिकेचे यश मान्य करावेच लागेल. लोकहितासाठी भारतीय संविधानाच्या कलम २१ मध्ये अमूलाग्र सुधारणा होवून जनहित याचिका प्रक्रियेची व्याप्ती वाढवण्यात आली. खंडप्राय देश आणि प्रचंड लोकसंख्या पाहता ग्रामीण विभाग आणि दूरदूर वसलेल्या संपर्करहित जनतेला कोर्टात जावून दाद मागणे अशक्यप्राय असून परिणामी फार मोठी लोकसंख्या न्यायपासून वंचित राहते आहे ही वस्तुस्थिती निदर्शनास आल्यावर त्यादिशेने प्रयत्न सुरू झाले.

या अडचणीवर उपाय म्हणून सरकारने विधिसेवा प्राधिकरण अधिनियम, १९८७ (Legal Services Authorities Act, 1987) अन्वये देशभरात ठिकठिकाणी 'लोक अदालतींची' स्थापना करून सुधारित कायद्यानुसार (२००२) लोक अदालतीस वैधानिक मान्यता बहाल केली. अल्प खर्चिक आणि त्वरित निवाडा पध्दतीमुळे हा वैकल्पिक पर्याय लोकप्रिय ठरल्यामुळे विशेषतः ग्रामीण जनतेला त्याचा फार मोठा फायदा आणि दिलासा मिळाला. परिणामी कौटुंबिक आणि वैवाहिक तक्रारी, जमीनीचे वाद, आर्थिक तक्रारी, अपघात भरपाई या व अशा अनेक

समस्यांवर ताबडतोब निवाडा मिळण्याची सोय उपलब्ध झाली. लोक अदालतीच्या माध्यमातूनसुध्दा भारतीय न्यायप्रणालीचे फार मोठ्याप्रमाणात लोकशाहीकरण झाले आहे हे मान्य करावेच लागेल.

### • गोरगरीबांना निःशुल्क विधिसहाय्यता:-
**(Free Legal Aid for Poor & Indigent People)**

गोरगरीब, उपेक्षित, मागासवर्गीय आणि समाजातील दुर्बलघटक शिक्षण आणि आर्थिक पाठबळाचा अभाव असल्यामुळे स्वतःच्या मूलभूत अधिकारांचे रक्षण करण्यास असमर्थ असतात. तळागाळातील सामान्य नागरिक न्यायापासून वंचित राहू नयेत आणि त्यासाठी त्यांना योग्य सेवा आणि सहाय्यता उपलब्ध व्हावी या उद्देशापोटी निःशुल्क विधिसेवा आणि सहाय्यता हा कायदा १९८७ साली अस्तित्वात आला.

भारतीय संविधानाच्या कलम ३९-अ अन्वये प्रत्येक राज्यावर गोरगरीब जनतेसाठी समान न्याय आणि निःशुल्क विधिसहाय्यता देण्याचे बंधन आहे. त्यास अनुसरून केन्द्र सरकार आणि राज्य सरकारांनी राष्ट्रीय आणि राज्य विधिसेवा मंडळांची स्थापना केलेली आहे. आर्थिक मदतीबरोबर सामान्यजनांना त्यांच्या मूलभूत अधिकारांची जाणीव करून देण्यासाठी योग्य त्या विधी शिक्षणाचीही सोय केली गेली आहे. केन्द्रीय आणि राज्यस्तरीय मंडळांबरोबर त्याचधर्तीवर जिल्हा आणि तालुकापातळीवर विधिसेवा प्राधिकरणांची स्थापना झालेली आहे. कायद्याप्रमाणे निःशुल्क विधिसेवा आणि सहाय्यता प्रदान करण्यासाठी खालील निकष आणि नियम ठरवले गेले आहेत.

### • निःशुल्क विधिसेवा मिळवण्यास पात्र/हक्कदार व्यक्ती :-

खालीलपैकी कोणत्याही वर्गात समाविष्ट असणारी व्यक्ती निःशुल्क विधिसेवा आणि सहाय्यता मिळवण्यास पात्र अथवा हक्कदार ठरवली गेली आहे :-

१) कायद्याप्रमाणे आरक्षित केलेल्या अनुसूचित जाती आणि जमाती.

२) संविधान कलम २३ अन्वये जीवन आणि स्वातंत्र्य या अधिकारांची पायमल्ली होवून मानवी अपव्यापार आणि अथवा बिगाराचे ठरलेले बळी.

३) महिला आणि बालकें.

४) शारीरिक विकलांग आणि अपंग व्यक्ती.

५) नैसर्गिक आपत्ती (दुष्काळ, महापूर, भूकंप इ.) जातिय अथवा धार्मिक हिंसाचार व अत्याचार, सामूहिक अथवा औद्योगिक आपत्तीमुळे विस्थापित झालेल्या अथवा बळी पडलेल्या व्यक्ती.

६) औद्योगिक मजूर आणि कामगार.

७) सुधारगृहातील बाल गुन्हेगार.

८) मनोरुग्ण आणि अथवा मनोव्याधीने ग्रस्त व्यक्ती.

९) शासनाने ठरवलेल्या किमान वार्षिक उत्पन्नापेक्षा कमी उत्पन्न असलेला वर्ग.

*टीप : वरील गटातील कोणत्याही व्यक्तीस निःशुल्क विधिसेवा आणि सहाय्यता प्राप्त करून घेण्यासाठी त्यानुसार शपथपूर्वक प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे.*

वर नमूद केल्याप्रमाणे तळागाळातील बहुसंख्य जनता निरक्षर आणि अथवा निर्धन असल्याने त्यांना निःशुल्क विधिसेवा आणि सहाय्यता करण्यासाठी सरकार बरोबर समाजसेवी संघटना आणि कार्यकर्त्यांनी मदतीचा हात पुढे करून त्यांना योग्य ते प्रोत्साहन आणि मार्गदर्शन करणे आवश्यक आहे.

● या पार्श्वभूमीवर **"सेंटर ऑफ लीगल रिसर्च विरुध्द स्टेट ऑफ केरळ"**(AIR 1986 SC 1322) या प्रकरणी विधिसहाय्यता संदर्भात सर्वोच्च न्यायालयाने केलेले खालील भाष्य महत्वाचे ठरावे :-

> **"भारतीय संविधानाच्या कलम-३९-अ मध्ये नमूद केलेले उद्दिष्ट साध्य करण्यासाठी राज्य सरकारांनी गोरगरीबांना दिल्या जाणाऱ्या निःशुल्क विधिसहाय्यता योजनेत समाजसेवी संघटनांना प्रोत्साहन देवून सामील करून घ्यावे व त्यांच्या**

सहकार्याने सामाजिक न्याय जनसामान्यांपर्यंत पोचवण्याचा प्रयत्न करावा." [1]

- त्यापुढे एक पाऊल टाकून, डी.के. त्रिवेदी विरुध्द भारत सरकार प्रकरणी (AIR 1986 SC 1322) निःशुल्क विधिसहाय्यता योजनांची अंमलबजावणी चोख होण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने खालील निर्देश दिलेले आहेत :-

> "निःशुल्क विधिसहाय्यता योजनेत सहभागी होवून सक्रिय सहकार्य करणाऱ्या समाजसेवी संस्था राज्यसरकारच्या नियंत्रणातून मुक्त असाव्यात." [2]

---

1. "In order to acthive the objectives contained in Article 39-A (of the Constitution) the state must encourage and support the participation of voluntary oraganisations or social action groups in operating Legal Aid Programme. These programmes and schemes are meant to bring social justice nearer to people." ***(Centre of Legal Research v/s State of Keral : AIR 1986 SC 1322)***

2. "The Voluntary Oraganisations associated with Legal Aid and Assistance schemes must be completely free from Government Control." ***(D.K. Trivedi v/s Union of India : AIR 1986 SC 1322)***

१७

# संकीर्ण

**(Miscellaneous)**

## • विशेषाधिकार अंतर्गत बचाव :

**(Plea of Privileged Communication)**

जनहित याचिका प्रकरणी सरकार अथवा सरकारी अधिकाऱ्याला गोपनीयता (Confidentiality) अथवा गुप्तता (Secrecy) कारणास्तव विशेषाधिकाराचा 'बचाव' म्हणून वापर करता येत नाही. या संदर्भात **"एल. के. कुलवाल विरुध्द राजस्थान सरकार"** (AIR 1988 Raj 2) प्रकरणी नगरपालिकेने विशेषाधिकार (Privileged Communication) म्हणून केलेला बचाव अमान्य ठरवून सर्वोच्च न्यायालयाने असे अधोरेखित केले आहे की :-

> **"जनहित याचिका प्रकरणी सरकारी अथवा सार्वजनिक कार्यकारी अधिकाऱ्याला गोपनीय अथवा गुप्ततेचा विशेषाधिकाराच्या नावाखाली बचाव म्हणून वापर करण्याचा अधिकार नाही. नगरपालिकेने जनतेला द्यावयाच्या आवश्यक सेवासुविधासंबंधी सदर संस्थांनी त्याच्या कार्याची आणि केलेल्या प्रयत्नांची माहिती जाणून घेण्याचा भारतीय संविधानाच्या कलम १९(१)(अ) अन्वये नागरिकांना पूर्ण अधिकार आहे"** [1]

## • न्यायालयीन शुल्क :

**(Court Fee on PIL)**

जनहित याचिका प्रकरणी याचिका दाखल करताना अर्जदाराने न्यायालयीन शुल्क अथवा अनामत रक्कम भरावी की नाही यासंदर्भात उच्च आणि सर्वोच्च

न्यायालयाचे मतप्रवाह सकृदर्शनी वेगवेगळे असल्याचे निदर्शनास येते, हे खालील विधानांवरून लक्षात येईल.

● **"सत्यपाल आनंद विरुध्द प्रमुख निबंधक"** प्रकरणी (AIR 2009 MP 190) मध्यप्रदेश उच्च न्यायालयाने जनहित याचिका संदर्भात न्यायालयीन शुल्कासंबंधी निर्णय देताना म्हटले आहे की :-

> **"संविधानाच्या कलम २२६ अन्वये जनहित याचिकाकर्त्याला योग्य ते न्यायालयीन शुल्क 'अनामत रक्कम' म्हणून न्यायालयात जमा करावी लागते. तथापि सदर प्रकरण हे कलम २२६ अन्वये सुनावणीयोग्य असेल तर उच्च न्यायाधीशास न्यायालयीन शुल्काशिवाय प्रकरण दाखल करून घेण्याचा अधिकार आहे."** [2]

● **"प्रेमचंद गर्ग विरुध्द अबकारी आयुक्त उत्तरप्रदेश"** या प्रकरणी (AIR 1963 SC 996) न्यायालयीन शुल्क संदर्भात सर्वोच्च न्यायालयाने निर्णय देताना म्हटले आहे की:-

> **"अर्जदाराने न्यायिक शुल्क म्हणून न्यायालयात अनामत रक्कम जमा करणे हे भारतीय संविधानाच्या कलम २२६ अथवा ३२ अन्वये नागरिकांना प्राप्त झालेल्या मूलभूत अधिकारांशी विसंगत आहे"** [3]

• तथापि **"सत्यपाल आनंद प्रकरणी"** मध्यप्रदेश उच्च न्यायालयाने विषद केले आहे की :-

> **"सदर प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाचे वरील आदेश लागू होत नाहीत. कारण सर्वोच्च न्यायालयापुढे आलेल्या 'प्रेमचंद गर्ग' प्रकरणात अर्जदाराने कलम ३२ अंतर्गत दाखल केलेला दावा त्याच्या वैय्यक्तिक मूलभूत अधिकाराची पायमल्ली झाल्यामुळे दुखावलेली व्यक्ती म्हणून केलेला असल्याने त्या दाव्यास जनहित याचिका म्हणता येणार नाही. सबब अर्जदाराने न्यायालयीन शुल्क (अनामत रक्कम) भरणे क्रमप्राप्त आहे."** [4]

वरील माहितीवरून हे स्पष्ट होते की जनहित याचिका प्रकरणी अर्जदाराकडून न्यायालयीन शुल्क अथवा अनामत रक्कम घ्यावी अथवा नाही हा सर्वस्वी न्यायालयीन अधिकार आहे.

---

1. "In a Public Interest Litigation case, the Government or any executive authority of the Government cannot claim secrecy or confidentiality on the ground of privileged communication. The right to information is implicit in freedom of speech as envisaged in Article 19(1)(a) of the constitution and therefore the municipality is bound to disclose to the citizens the steps it has taken for maintaining the city clean and pollution free." ***(L.K. Kulwal v/s State of Rajsthan-AIR 1988 Raj 2)***

2. "The Court-fee is payable on a PIL as a writ under Article 226 except where Chief Justice or a Judge designate directs on the basis of information received in a letter or any other document and considers that it is a fit case for registering a case under Article 226 even though no Court-fee is paid on such letter or document." ***(Satyapal Anand v/s Chief Registrar M.P. AIR 2009 M.P. 190)***

3. "Requiring security deposit from the petitioner is contrary to the fundamental rights guaranteed under Article No. 226 or 32 of the Constitution." ***(Premchand Garg v/s Excise Commissioner U.P. AIR 1963 SC 996)***

4. "The Division Bench of M.P. High Court in Satpal Anand's case had taken a view that the Supreme Court's ruling in Premchand Garg's case will not apply in this case as that case was with reference to an aggrieved individual approaching Supreme Court under Article 32 challenging violation of his fundamental rights and not a PIL." ***(Satyapal Anand v/s Chief Registar of Madhya Pradesh : AIR 2009 MP 190)***

# • विभाग तीन •

# लोक अदालत

## ( LOK ADALAT )

## अनुक्रमणिका

पृष्ठ क्रमांक


| | | |
|---|---|---|
| १. | लोक अदालत : आरंभ, विकास आणि सदस्यमंडख | १५७-१५९ |
| २. | लोक अदालत : अधिकार आणि अधिकारक्षेत्र | १६०-१६२ |
| ३. | लोक अदालत : दखलपात्र दावे आणि कार्यपध्दती | १६३-१६६ |
| ४. | दिवाणी न्यायालयाकडून लोक अदालतीकडे खटला वर्ग करण्याची प्रक्रिया | १६७-१६९ |
| ५. | लोक अदालत : साध्य, सिध्दी आणि फायदे | १७०-१७३ |
| ६. | स्थायी लोक अदालत | १७४-१७६ |


---

### • समग्र संदर्भ सूची :


- **Public Interest Litigation, Legal Aid & Services, Lok Adalats & Para-Legal Services :**
  By : Dr. N.V. Paranjpe – Bhopal (M.P.)
- संदर्भित अधिनियम आणि भाष्य (Bare Acts & Commentary)
- संगणकीय संकेत स्थळे (Website)
- दैनिक वृत्तपत्रें
  - दि टाईम्स ऑफ इंडिया
  - दि इंडियन एक्सप्रेस
  - लोकसत्ता
  - महाराष्ट्र टाईम्स

# १

# लोक अदालत : प्रारंभ, विकास आणि सदस्यमंडळ

## (Lok Adalat : Origin, Evolution And Panel)

### • प्रारंभ (Origin)

फार पूर्वीपासून आपल्या देशातील ग्रामीण विभागात एकमेकातील किरकोळ वाद, घरगुती भांडणतंटे आणि बखेडे मिटवण्यासाठी, व त्याचबरोबर तक्रारदारांत समझोता घडवून आणण्यासाठी प्रत्येक खेडोपाडी ग्रामस्थांची 'स्थानिक न्यायपंचायत' अस्तित्वात असून त्याद्वारे न्याय निवाडा केला जातो. अशा न्याय पंचायतीसाठी गावातील ८/१० मान्यवर ज्येष्ठ व सूज्ञ नागरिकांची पंच म्हणून नेमणूक केली जाते. पंचपरमेश्वर या भावनेने पंचायतीने दिलेला निर्णय वादी-प्रतिवादी यांच्यावर बंधनकारक असतो. उभयपक्षांचे म्हणणे ऐकून घेवून पंच मंडळी गावातील सार्वजनिक ठिकाणी नागरिकांच्या उपस्थितीत न्याय/निवाडा देतात. या प्रक्रियेमुळे वाद विकोपाला न जाता पंचायतीतर्फे समझोता आणि तडजोड करून प्रश्न सोडवला जात असल्यामुळे गावातील सौहार्द टिकून राहण्यास मदत होते. आजही ही जुनी प्रथा चालू आहे, ही फार समाधानाची बाब आहे. आजच्या **"लोक अदालत"** या पर्यायी न्यायदान पध्दतीचे मूळ अशा ग्रामीण पंचायतीत सापडेल, यात दुमत नसावे.

भारतीय संविधानात, कलम ४० अन्वये 'पंचायत न्याय पध्दतीची' दखल घेतली गेली असून ग्रामीण न्याय पंचायतीला स्वयंनियुक्त शासन म्हणून कायदेशीर मान्यता मिळालेली आहे. खरेतर तेव्हापासून 'पंचायत राज' या संकल्पनेला खऱ्या अर्थाने चालना मिळाली, हे लक्षात ठेवले पाहिजे.

### • विकास (Evolution)

ग्रामीण न्याय पंचायतीवर आधारलेल्या पहिल्या 'लोक अदालतीची' संकल्पना प्रत्यक्षात साकारण्याचे श्रेय गुजरातमधील प्रख्यात गांधीवादी समाजसेवक **श्री. हरीवल्लभ पारेख** यांना जाते. रंगपूर परिसरातील मूळ आदिवासी जमातीसाठी

त्यांनी ही संकल्पना सर्वप्रथम अंमलात आणली. **डॉ. उपेन्द्र बक्षी** यांनी आपल्या पुस्तकात लोक अदालतीचे वर्णन करतान त्यास **"तक्रार-ते-करार"** असे समर्पक नाव दिलेले आहे.

१९७६ ची आणीबाणी संपून भारतात पुन्हा लोकशाहीचे पुनरागमन झाल्यावर भारतीय संविधानात या संबंधात समाधानकारक बदल केले गेले. कलम ३९-(अ) यामध्ये **"समान-समतोल न्याय आणि निःशुल्क विधिसहाय्यता"** (Equal Justic and Free Legal Aid) यांचा अंतर्भाव करण्यात आला. त्याची मूळ इंग्रजी संहिता अशी आहे:

> "**39-A :** The State shall secure that the operation of Legal system promotes justice, on the basis of equal opportunity and shall, in particular, provide free Legal aid, by suitable legislation or schemes or in any other way, to ensure that opportunities for securing justice are not denied to any citizen by reason of economic or other disabilities."

वर्षानुवर्षे कोर्टात प्रलंबित राहिलेले खटले, व दिवसेंदिवस न्यायालयात वाढणारा कामाचा बोजा कमी करण्यासाठी, व त्याचबरोबर नियमित खटल्याच्या प्रत्यक्ष सुनावणीपूर्वी (Pretrial) त्वरित न्यायनिवाडा करण्यासाठी काही वैकल्पिक न्यायव्यवस्था-रचना करता येईल का यावर कायदेमंडळात विचारविमर्श सुरू झाला. त्याचा परिपाक म्हणून केन्द्र सरकारने १९८० साली सर्वोच्च न्यायालयाचे तत्कालीन प्रमुख न्यायाधीश **मा.श्री.पी.एन. भगवती** यांच्या अध्यक्षतेखाली 'विधिसहाय्य योजना अंमलबजावणी समितीची' (Committee on Implementation of Legal Act Scheme (CILAS) स्थापना केली. तळागाळातील उपेक्षितांना न्याय मिळवून देण्यासाठी स्थापन झालेल्या या समितीला देशभरातून कित्येक समाजसेवी संघटनांनी सक्रिय पाठिंबा दिला. परिणामी **'लोक अदालत'** ही वैकल्पिक न्यायपध्दती अंमलात आली. या निमित्ताने एक व्यवहार्य गतिमान न्यायदान यंत्रणा उभी राहिल्याने 'लोक अदालतला' देशभरात प्रचंड लोकप्रियता लाभली. मार्च १९८२ ला पहिली 'लोक अदालत' गुजरातमध्ये अस्तित्वात आली, आणि पुढील १० वर्षात जानेवारी २००२

पर्यंत देशात जवळपास १५७६६ लोक अदालतींचे काम सुरू झाले, अशी कागदोपत्री नोंद उपलब्ध आहे.

वरील यशाच्या पार्श्वभूमीवर संसदेने पूर्वीच्या 'विधिसेवा प्राधिकरण अधिनियम-१९८७' (Legal Services Authorities Act-1987) मध्ये लोकाभिमुख सुधारणा करून ९ नोव्हेंबर १९९५ रोजी सुधारित Legal Services Authorities (Amedment Act 1994) (LSAA) अंमलात आणला; आणि लोक अदालत या संकल्पनेच्या पुनर्रचनेसाठी (Reoraganisation of Lok Adalats) कायदेशीर मान्यता मिळाली. सदर सुधारित कायदा अंमलात आल्यापासून आजवर लोक अदालतीने अनेक बाबींवर महत्वपूर्ण निवाडे दिलेले आहेत. त्यात प्रामुख्याने सार्वजनिक सेवासुविधा, वाहन अपघात, विमा देयक, वैवाहिक अथवा पोटगी तंटे, निवृत्तीवेतन, वीज वापर, पोस्ट आणि टेलीग्राफ विषयक विवाद अथवा सहजासहजी समझोता व तडजोड होवून मिटणाऱ्या प्रलंबित खटल्यांचा-वादांचा समावेश आहे.

### • लोक अदालत : सदस्यमंडळ (Lok Adalat Panel)

सर्वसाधारणपणे जिल्हा न्यायाधीश यांच्या अध्यक्षतेखाली लोक अदालतीचे कामकाज चालते. सदस्यीय मंडळात उच्च न्यायालयाचे विद्यमान अथवा निवृत्त न्यायाधीश, स्थानीय वकील संघटनेचा एक सभासद, एक न्यायालयीन अधिकारी, एक नामांकित सामाजिक कार्यकर्ता व त्याशिवाय किमान एक स्त्री सदस्य असणे अनिवार्य आहे. National Legal Services Authority Rules – 1995 च्या कलम १३ मध्ये अशा लोक अदालत सदस्यीय मंडळात समावेश करण्यासाठी सदस्याची पात्रता आणि अनुभव यासंबंधी सविस्तर माहिती आणि निर्देश दिलेले आहेत.

२

# लोक अदालत : अधिकार आणि अधिकारक्षेत्र

**(Lok Adalat : Juridiction & Powers)**

लोक अदालत या गतिमान आणि पूरक न्यायप्रक्रियेचा प्रारंभ आणि विकास यासंबंधी यापूर्वी उहापोह केलेला आहे. या ठिकाणी लोक अदालतीचे अधिकारक्षेत्र आणि अधिकार याचे विवरण दिलेले आहे.

## • लोक अदालत : अधिकारक्षेत्र (Juridiction)

- उभय पक्षकारांची संमती असल्यास कोणत्याही दिवाणी, कामगार अथवा फौजदारी न्यायालयात प्रलंबित असलेल्या खटल्यात त्यांच्यात तडजोड/समझोता करण्याचा प्रयत्न करून वाद मिटवणे/निवाडा देणे लोक अदालतीच्या अधिकारक्षेत्रात समाविष्ट आहे.

- भारतीय दंडसंहितेत नमूद केलेल्या गंभीर गुन्ह्यांसाठी (Non-Compoundable) न्याय निवाडा करणे लोक अदलतीच्या अधिकारक्षेत्रात येत नसले तरी किरकोळ गुन्हेंप्रकरणी (Compoundable) (चोरी, छेडछाड, मारामारी इत्यादी) वादी प्रतिवादीची संमती असल्यास त्यांच्यात तडजोड घडवून निवाडा देणे लोक अदालतीच्या अधिकारक्षेत्रात सामील आहे.

- दाखल झालेल्या प्रत्येक खटल्याप्रकरणी उभयपक्षकारात तडजोड घडवून निवाडा देण्यासाठी कोणत्याही प्रकारचा दबाव अथवा गैरप्रतिपादन यांचा अवलंब होणार नाही यासाठी योग्य प्रयास आणि प्रयत्न करणे हे लोक अदालतीच्या अधिकारक्षेत्रात समाविष्ट आहे. न्याय निवाडा देताना प्रचलित न्यायतत्वे, समानता आणि कर्तव्यबुध्दी यांचा मान ठेवणे आवश्यक आहे.

- कामगार न्यायालयात प्रलंबित असलेल्या औद्योगिक खटल्यांत उभयपक्षी संमती असल्यास तडजोड घडवून निवाडा देणे लोक अदालतीच्या अधिकारक्षेत्रात सामील आहेत.

- सुनावणी शिवाय वर्षानुवर्षे तुरुंगात खितपत पडलेल्या कैद्यांना लोक अदालतीच्यामाध्यमातून फार मोठा दिलासा मिळाला आहे. खबऱ्या/तक्रारदार आणि संबंधित आरोपी यांनी परस्पर संमतीने वाद मिटवण्याची तयारी दर्शवली असेल तर सामान्य गुन्हे प्रकरणी निवाडा देणे लोक अदालतीच्या अधिकारकक्षेत समाविष्ट आहेत.

- भारतीय दंडसंहितेत (Indian Penal Code) नमुद केलेले अपराध-गुन्हे (Criminal Offences) हे लोक अदालतीसाठी अस्वीकारक असल्याने फौजदारी खटल्यांच्या संदर्भात समझोता अथवा तडजोड घडवून आणणे अथवा त्यावर न्यायदान करणे लोक अदालतीच्या अधिकार कक्षेत येत नाही. त्यामुळे जामीन अथवा अपेक्षित जामीन (Bail or Anticipatory Bail) अर्जावर विचार करण्याचा लोक अदालतीला अधिकार नाही.

- विनंती केलेल्या दाव्यात वादी अथवा प्रतिवादी यांनी केलेल्या मागणीची भरपाई रक्कम १० लाखाहून जास्त असेल तर असे प्रकरण लोक अदालतीच्या अधिकारकक्षेत बसत नाही.

- तथापि महानगरपालिका, नागरी सेवासुविधा, टेलिफोन निगम, जनरल इन्श्युरंस, वीज आणि पाणी पुरवठा मंडळ, कामगार तथा कर्मचारी संघटना या व अशा प्रकारच्या शासकीय अथवा निमशासकीय सार्वजनिक संस्था-मंडळाविरुध्द असलेल्या तक्रारीचे निराकरण करण्यासाठी लोक अदालतीकडे वर्ग केलेल्या खटल्यांसंबंधी निवाडा करण्याचे अधिकार लोक अदालतीच्या कृतिकक्षेत येतात, हे लक्षात ठेवले पाहिजे.

## • लोक अदालत : अधिकार (Powers)

- विधिसेवा प्राधिकरण (सुधारित) अधिनियम : १९९४ (Legal Services Authorities (Amendment) Act-1994) च्या कलम २२ अन्वये, ज्या विभागात लोक अदालतीची स्थापना झालेली असेल त्या कार्यक्षेत्रात कार्यान्वित असलेल्या कोणत्याही दिवाणी, महसुली आणि फौजदारी (भारतीय दंडसंहितेत नमूद केलेले गुन्हे अपराध सोडून) न्यायालयात दाखल झालेल्या सर्व प्रकरणांच्या संदर्भात संबंधित वादी-प्रतिवादी यांची संमती असल्यास त्यांच्यात

तडजोड आणि समझोता घडवून निवाडा देण्याचा अधिकार लोक अदालतीस आहे. त्याच बरोबर (संबंधित प्रकरणी) वेळ पडल्यास खालील अधिकार वापरण्याचे प्रावधान आहे:-

१) साक्षीदारांना हजेरी हुकुम बजावणे (Summoning of Witness).

२) दस्तऐवजांचा शोध घेणे-पाहणी करणे (Discovery and Inspection of Documents).

३) खटल्यासंबंधी पुरावे स्वीकारणे / दाखल करून घेणे (Receiving Evidence).

४) खटल्याला पूरक असे सार्वजनिक दस्तावेज मागावणे (Requisitioning of Public Record).

५) या व्यतिरिक्त खटल्यासाठी अत्यावश्यक असलेली उपलब्ध माहिती अथवा इतर कागदपत्रे मागवणे
(Other matters as may be prescribed).

या ठिकाणी प्रामुख्याने एक गोष्ट नमूद करणे आवश्यक आहे की विधिसेवा प्राधिकरण (सुधारित) अधिनियम : १९९४ (LSAA Act 1994) च्या कलम २२ व उपकलम ३ आणि भारतीय दंडसंहितेतील कलम १९३,२१९ आणि २२८ यामध्ये निर्देश दिल्याप्रमाणे **लोक अदालतीचे सर्व काम हे 'न्यायिक कामकाज' (Judicial Procedures) म्हणूनच ग्राह्य धरले जाते. त्यामुळे फौजदारी प्रक्रिया संहितेच्या प्रकरण २४ प्रमाणे (Chapter XXIV of Code of Criminal Procedure - 1973) लोक अदालतीचा दर्जा हा दिवाणी न्यायालयासमान असतो, हे लक्षात घेतले पाहिजे.**

---

**Lok Adalat : Court and Proceedings :**

" Sub Section 3 of Section 22 of the LSAA provides that all proceedings before Lok Adalat shall be **deemed to be 'Judicial Proceedings',** within the meaning of Sections 193, 219 & 228 of the Indian Penal Code and every Lok Adalat shall be **deemed to be a 'Civil Court',** for the purposes or Section 195 and Chapter XXVI of the Code of Criminal Procedure -1973."

३

# लोक अदालत : दखलपात्र दावे आणि कार्यपध्दती

**(Lok Adalat : Cognizance of Cases & Procedure)**

सदर प्रकरणात लोक अदालतीच्या अधिकारक्षेत्रात कोणकोणत्या प्रकारचे दावे ग्राह्य-दखलपात्र ठरतात, त्याची कार्यपध्दती कशी असते आणि त्यात अपीलाची प्रावधाने कोणती आहेत हे नमूद केलेले आहे.

• **दखलपात्र दावे** (Congnizance of Cases)

विधिसेवा प्राधिकरण (सुधारित) अधिनियम-१९९४ (LSAA-1994) च्या कलम २० अन्वये लोक अदालतीला खालील परिस्थितीत आलेल्या/ दाखल झालेल्या अर्जावर निवाडा देण्याचे अधिकार प्राप्त आहेत:-

१) खटला/अथवा विवादातील उभयपक्ष (वादी-प्रतिवादी) यांनी न्यायालया समक्ष आपापसात बिनशर्त समझोता व तडजोड करण्याची तयारी दर्शवली आहे.

२) वादी आणि प्रतिवादी यांनी सबंधित न्यायालयाला अर्ज करून प्रस्तावित तडजोडीसाठी मध्यस्थी करण्याची विनंती केल्यास, आणि त्या संदर्भात सकृदर्शनी तडजोड/समझोता होवू शकतो अशी न्यायालयाची खात्री पटल्यासच असा विनंती अर्ज लोक अदालतीकडे वर्ग होवू शकतो.

३) दिवाणी न्यायालयाला त्यांच्या विचाराधीन असलेला प्रलंबित खटला त्यातील विषयाला अनुसरून लोक अदालतीकडे पाठवणे उचित वाटल्यास तो खटला दिवाणी न्यायालयाकडून लोक अदालतीकडे पुढील कारवाईसाठी वर्ग केला जावू शकतो.

४) वरील प्रकरणी दिवाणी न्यायालयास उभय पक्षांना आपापसातील तडजोडीसंदर्भात त्यांची भूमिका मांडण्याची मुभा देवून आणि अथवा

त्यांची बाजू ऐकून घेवूनच सदर दावा लोक अदालतीकडे वर्ग करावा की नाही या संबंधी निर्णय घ्यावा लागतो.

- **कार्यपध्दती** (Procedure) :

१. लोक अदालतीच्या कामकाजात नेहमीच्या न्यायालयीन रूढ पध्दती आणि किचकट न्यायप्रणाली यांना स्थान नसल्यामुळे एकूणच कारवाई सुलभ व गतिमान असते.

२. सदस्यीय मंडळात कोर्टाचा पीठासीन अथवा निवृत्त न्यायाधीश, न्यायालयीन अधिकारी, ज्येष्ठ वकील आणि नामवंत समाजसेवक अशा मोजक्याच सदस्यांचा समावेश असल्यामुळे कामकाज सुटसुटीत आणि सुरळीतपणे पार पडते. ही सर्व मंडळी कामकाजाच्या वेळी साध्या वेषात असल्यामुळे अशा सुनावणीत नेहमीच्या न्यायालयीन शिष्टाचाराचे गांभिर्य जवळपास जाणवत नाही. खेळीमेळीचे वातावरण असल्यामुळे उभयपक्षकार कोणतेही दडपण न घेता आपापली बाजू मंडळासमोर व्यवस्थित आणि निर्भयपणे मांडू शकतात, त्यासाठी कोणत्याही प्रकारची जबरदस्ती अथवा दबाव आणला जात नाही.

३. उभयपक्षांनी (वादी-प्रतिवादी) 'आपली मनापासून समझोता आणि तडजोड करण्याची तयारी आहे आणि लोक अदालतीचा निर्णय आम्हाला मान्य असून तो आमच्यावर बंधनकारक राहील' असे प्रतिज्ञेवर प्रतिपादन केल्यासच संबंधित सदस्यीय मंडळाकडून दावा विचारार्थ घेतला जातो.

४. उभयपक्षकारांना त्यांची बाजू मांडण्याची पूर्ण मुभा आणि संधी देवून त्यांचे म्हणणे ऐकणे लोक अदालतीवर बंधनकारक आहे. एकाच पक्षाची बाजू ऐकून एकतर्फी (Exparte) निवाडा (Award) देता येत नाही; आणि तसा तो दिला गेला तर तो उच्च न्यायालयात ग्राह्य धरला जात नाही.

५. लोक अदालत, सर्वसाधारण प्रकारचे दिवाणी आणि फौजदारी दावे (अस्विकारक अपराध-गुन्हे सोडून) यावर विचार करू शकते. अशावेळी न्यायालयात प्रलंबित असलेले, सुनावणी न झालेले अथवा नुकत्याच दाखल केलेल्या दाव्यांचा विचार लोक अदालतीमध्ये होवू शकतो.

६. समुपदेशाकडून (Councillor) योग्य प्रकारे मार्गदर्शन झालेले असून दोन्ही पक्षकार प्रामाणिकपणे समझोत्यास व तडजोडीस तयार आहेत याची खात्री पटल्यावरच लोक अदालत त्या प्रकरणी निर्णय देवू शकते.

७. उभयपक्षांनी तडजोड मान्य केल्यावर योग्य किंमतीच्या न्यायालयीन मुद्रांकावर मान्य झालेल्या/केलेल्या शर्तींवर आधारीत तडजोड निवेदन (Settlement Memo) तयार केले जाते. त्यावर दोन्ही पक्षकार, त्यांचे वकील आणि साक्षीदारांच्या सह्या घेतल्या जातात. तडजोड निवेदनाची पूर्णपणे शहानिशा केल्यावर सदस्य मंडळाच्या अध्यक्षाची त्यावर स्वाक्षरी होते आणि त्यानंतर सदर तडजोड निवेदन **निवाडा** म्हणून जाहीर केला जातो.

८. लोक अदालतीने दिलेला निवाडा हा दिवाणी न्यायालयाचा **हुकुमनामा/फर्मान** (Decree of Civil Court) या समानदर्जाचा निवाडा म्हणून ग्राह्य धरला जातो, कारण विधिसेवा प्राधिकरण (सुधारित) अधिनियम, १९९४, कलम १९ आणि २१ तसेच कलम २ (AAA) अन्वये लोक अदालत हे **न्यायालय (Court)** असून लोक अदालतीची कार्यवाही ही **'न्यायिक कार्यवाही'** (Legal Proceedings) म्हणून ओळखली जाते.

## • अपील आणि इतर प्रावधानें (Appeal and Other Provisions) :-

१. मुळातच कोणताही प्रामाणिक समझोता अथवा तडजोड ही उभयपक्षी एकमेकांच्या संमतीने होत असल्यामुळे अशी तडजोड झाल्यास संदर्भित प्रकरणी न्यायालयीन प्रक्रियेची सांगता पूर्ण झाली असे गृहित धरले जाते. त्यामुळे उभयपक्षकारांनी स्वखुषीने समझोता करून तडजोड स्वीकारल्यानंतर लोक अदालतीने दिलेला निवाडा हा **'अंतिम'** ठरतो.

२. अशा प्रसंगी मिळालेला निवाडा उभयपक्षकारांवर बंधनकारक असल्यामुळे कोणत्याही पक्षकाराला त्याविरुध्द सत्र अथवा उच्च न्यायालयात (Appellate Courts) परत अपील करून **'दाद'** मागता येत नाही. कारण LSAA Act-1994 कलम २१ अन्वये लोक अदालतीने दिलेल्या

निवाड्यावर परत दाद मागण्याचा अथवा अपील करण्याचा उभयपक्षकारांना कोणताही अधिकार उरत नाही.

३. तथापि भारतीय संविधान कलम २२६ अन्वये लोक अदालतीने दिलेल्या निवाड्यावर काही अपवादात्मक परिस्थितीत, संबंधित पक्षकाराला सदर निवाडा प्रकरणी पुनरावलोकन (Review) करण्यासंबंधी उच्च न्यायालयास विनंती अर्ज करण्याचा अधिकार असला तरी अशा पुनरावलोकन विनंती अर्जाचा पुनर्विचार करावा की नाही हा अधिकार पूर्णपणे न्यायासनाच्या अधिन असतो.

४. दिवाणी न्यायालयाकडून लोक अदालतीकडे वर्ग झालेल्या खटल्याप्रकरणी, सर्वतोपरी प्रयत्न करूनही उभयपक्षी तडजोड अथवा समझोता होवू न शकल्यास आणि अथवा शक्यता न उरल्याप्रसंगी लोक अदालतीकडून सदर प्रकरण पुढील कारवाईसाठी पूर्वीच्याच कोर्टाकडे परत पाठवले जाते.

## ४

# दिवाणी न्यायालयाकडून लोक अदालतीकडे खटला वर्ग करण्याची प्रक्रिया

**(Procedure for Reference by Civil Courts to Lok Adalat)**

विधिसेवा प्राधिकरण (सुधारित) अधिनियम कलम २० अन्वये दिवाणी न्यायालयाला त्यांच्याकडे प्रलंबित असलेला खटला/ले तडजोड/समझोत्याने मिटवण्यासाठी लोक अदालतीकडे वर्ग करण्याचे अधिकार आहेत. तथापि दिवाणी न्यायालयाला उभय पक्षकारांची बाजू ऐकून त्यांच्या संमतीनेच सदर दावा पुढील कार्यवाहीसाठी लोक अदालतीकडे वर्ग करता येतो अन्यथा नाही.

दिवाणी न्यायालयाकडून खालील ३ परिस्थितीत त्यांच्याकडील प्रलंबित असलेले खटले लोक अदालतीकडे वर्ग करता येतात :-

१) उभयपक्षकारांची त्यांच्या वादात अथवा खटल्यासंदर्भात बिनशर्त तडजोड/समझोता करावयाची पूर्ण तयारी आणि संमती असेल तर.

२) एखाद्या खटल्यात न्यायालयास सकृदर्शनी उभयपक्षी तडजोड होण्याची शक्यता वाटत असेल अशाप्रसंगी उभयपक्षकारांपैकी कुणी एकाने जरी सदर खटला लोक अदालतीकडे वर्ग करावा असा विनंती अर्ज केला असेल तर.

३) विधिसेवा प्राधिकरण (सुधारित) अधिनियम कलम २०(१)(ii) अन्वये दिवाणी न्यायालयास योग्य वाटल्यास त्यांच्या अधिकारात एखादा प्रलंबित खटला लोक अदालतीकडे वर्ग करण्याचा पूर्ण अधिकार आहे, अशावेळी सदर खटला लोक अदालतीकडे वर्ग करण्यासाठी उभयपक्षकाराची त्यास संमती असो अथवा नसो.

तथापि दिवाणी न्यायालयास आपल्या अधिकारात असा खटला लोक अदालतीकडे वर्ग करण्यापूर्वी उभय पक्षकारांना किमान एक संधी देवून त्यासंदर्भात

त्यांना त्यांची भूमिका मांडू देणे आणि अथवा त्यांची बाजू ऐकून घेणे बंधनकारक आहे. (पहा : **“पुष्पा सुरेश भुटाला विरुध्द सुभाष बन्सीलाल महेश्वरी”** (*AIR 2002 BOM 126 (128)*)

● विधिसेवा प्राधिकरण (सुधारित) अधिनियम कलम २० (१) अन्वये दिवाणी न्यायालयाने लोक अदालतीकडे एखादा खटला वर्ग करावयाचा असेल अथवा कलम २०(२) अन्वये एखादा खटला पुढील कार्यवाहीसाठी लोक अदालतीकडे पाठवलेला असेल, तर अशावेळी **न्यायिक नीतीतत्वे** (Principals of Justice) , **समानता** (Equity), **न्याय्यरीत** (Fair play), आणि **शुध्द हेतू** (Good Conscience) या तत्वांना अनुसरूनच लोक अदालतीला कलम २० (४) अन्वये सदर प्रकरणी उभयपक्षी तडजोड/समझोता घडवून निवाडा द्यावा लागतो.

अधिनियम कलम १९(५) अन्वये लोक अदालतीकडे वर्ग झालेल्या खटल्यात दिवाणी न्यायालयात ज्या मुद्यांवर तडजोड होवून हुकुमनामा (Decree) जारी झालेला असेल तर ते विषय/मुद्दे सोडून उर्वरित विवादावर तडजोड/समझोता घडवून आणण्याचे काम लोक अदालतीला करावे लागते. (पहा : **“अंबिका राजन विरुध्द बशीरा बीवी आणि इतर”** (*AIR 2009 Ker 151*)

● **“डॉ. शशी प्रतिक विरुध्द चरणसिंग वर्मा आणि इतर”** प्रकरणी (*AIR 2009 All 109*) अलाहाबाद उच्च न्यायालयाने अधिनियम कलम १९(५) आणि २०(१) व (२) मधील प्रावधानांचे विस्तारित स्पष्टीकरण देतांना म्हटले आहे की :-

> **“अधिनियम कलम १९(५) आणि २०(१) व (२) अन्वये निर्धारित केलेल्या नियमांची पूर्तता झाली असल्यासच दिवाणी न्यायालयास सदर प्रकरण लोक अदालतीकडे वर्ग करता येते. तथापि अनवधानाने तशी पूर्तता झाली नसल्याचे निदर्शनास आल्यास, खटला वर्ग झालेला असला तरी त्यावर निर्णय/निवाडा देण्याचा लोक अदालतीला अधिकार नाही.”** [1]

● दिवाणी न्यायालयाकडून लोक अदालतीकडे वर्ग झालेल्या खटल्यात उभयपक्षी तडजोड/समझोता होवू शकत नाही असे निदर्शनास आल्यास लोक अदालतीला कलम २०(५) अन्वये तो खटला परत त्याच न्यायालयाकडे पाठवण्याचे प्रावधान

कायद्यात आहे. अशावेळी लोक अदालतीकडून परत आलेल्या खटल्यावर संबंधित न्यायालयास उर्वरित कारवाई/सुनावणी पूर्ण करून निकाल द्यावा लागतो.

वरील विवेचनावरून हे स्पष्ट होईल की कोणत्याही विवादाप्रसंगी उभयपक्षी तडजोड/समझोता करण्यास बिनशर्त मान्यता ही पूर्व अट बंधनकारक असल्यामुळे लोक अदालतीला अशा उभयपक्षी तडजोडसंमत विवादावर योग्य तो निवाडा देणे सुलभ होते. लोक अदालतीद्वारे गतिमान पध्दतीने न्याय मिळवण्यासाठी उभयपक्षी तडजोड/समझोता करण्याची प्रामाणिक तयारी आणि तशी बिनशर्त संमती असणे आवश्यक आहे. आणि तसे झाल्यास गतिमान न्यायपध्दतीमुळे वादी आणि प्रतिवादीच्या वेळेत आणि खर्चात बचत होवू शकते हे सर्वसंबंधितांनी लक्षात ठेवणे गरजेचे आहे.

तथापि प्रयत्न करूनही उभयपक्षी बिनशर्त तडजोड अथवा समझोता न होता केवळ खटल्याच्या गुणवत्तेवर विसंबून लोक न्यायालयाने निवाडा दिलेला असेल तर तो **ग्राह्य** धरला जात नाही हे समजून घेतले पाहिजे.

---

1. " The reference of disputes for settlement to Lok Adalat is circum scribed by condition laid down under Section 19(5) and 20(1) and (2) of the LSA Act. These conditions are *'sine qua non'* for making a valid reference. Unless these conditions are satisfied, Lok Adalat organized under Section 19(1) would have no jurisdiction to take the cognizance of matter of dispute, even if referred to it by Court or Authority or Committee organized Lok Adalat." ***(Dr. Smt. Shashi Prateek v/s Charan Singh Verma and another : (AIR 2009 AII 109)***

## ५

# लोक अदालत : साध्य, सिध्दी आणि फायदे

**( Objects, Achivements and Benefits of Lok Adalat )**

### • साध्य आणि सिध्दी (Objects and Achivments) :-

विधिसेवा प्राधिकरण अधिनियम (सुधारित) १९९४ (LSAA-1994) या कायद्याचा मूळ उद्देश वादी आणि प्रतिवादी यांचे मन वळवून, सलोखा घडवून नेहमीच्या किचकट न्यायप्रणाली ऐवजी लोक अदालतीच्या माध्यमातून त्यांच्यातील वादविवादाचे निराकारण करणे आणि कायदेशीर निवाडा देणे हा आहे. या पर्यायी गतिमान न्यायदान पध्दतीला देशातील जनसामान्यातून प्रचंड प्रतिसाद मिळाला आहे हे नाकारता येणार नाही.

उपलब्ध आकडेवारीनुसार २००४ सालापर्यंत सर्व देशात मिळून लोक अदालतीच्या जवळपास दोन लाखांहून अधिक बैठका झाल्या, आणि १ कोटी १६ लाख नागरिकांना त्याचा फायदा झाला, हे या पर्यायी न्याय व्यवस्थेचे यशच म्हणावे लागेल. यावरून लोक अदालत स्थापना करण्याची मूळ संकल्पना आणि अपेक्षित उद्दिष्ट साध्य झाले असाच निष्कर्ष काढावा लागेल. या कायद्यामुळे पक्षकारांना आपापसात तडजोड आणि समझोता करून त्यांचे वादविवाद कायदेशीरपणे मिटवण्यासाठी लोक अदालतीच्या मदतीने एक गतिमान वैकल्पिक न्यायदानाचा मार्ग खुला झाला आहे हे मान्य करावेच लागेल.

लोक अदालतीला मिळणारे यश आणि प्रतिसाद पाहता अशा न्यायालयीन विकल्पामुळे भारतीय न्यायप्रणाली आणि न्यायव्यवस्था यांना फार मोठे पाठबळ मिळाले आहे. लोक अदालतींमुळे 'न्याय हा सामान्य व दीन दुबळ्यांच्या दारात पोचला', ही फार मोठी उपलब्धी म्हणावी लागेल. नियमित न्यायप्रक्रियेत वर्षानुवर्षे कोर्टाच्या चकरा मारून, पैसे खर्च करून लवकरात लवकर न्याय मिळणे जवळपास दुरापास्त होत असल्याने, कंटाळून गेलेल्या पक्षकारांना लोक अदालतीद्वारे नवसंजीवनी मिळाली हे नाकारून चालणार नाही. कोर्टबाजी करून वेळ व पैसा वाया घालवण्यापेक्षा आपापसात सलोखा करून तडजोड करणे हितकारक आहे ही भावना

आणि जाणीव जनसामान्यात मोठ्या प्रमाणात वाढत आहे ही फार मोठी किमया म्हणावी लागेल. लोक अदालतीचे सामान्य जनतेला/पक्षकारांना मिळणारे फायदे खालीलप्रमाणे आहेत :-

- **फायदे** (Benifits):-

लोक अदालतीद्वारे दिल्याजाणाऱ्या निवाड्यांमुळे जनसामान्यांना फार मोठा दिलासा मिळाला आहे हे मान्य करावेच लागेल. अशा पर्यायी न्यायदानामुळे एकूणच न्यायव्यवस्थेला बळकटी आली आहे, त्याचा तपशील वर आलेला आहेच. या गतिमान न्यायदानामुळे नागरिकांना मिळणारे फायदे अशा प्रकारचे आहेत :-

१) लोक अदालतीकडे अर्ज करताना कोणतेही न्यायालयीन शुल्क (Court Fee) भरावे लागत नाही. उलटपक्षी त्यासंदर्भात पूर्वी नियमित न्यायालयात दाखल केलेल्या दाव्याचे न्यायालयीन शुल्कसुध्दा, लोक अदालतीचा निवाडा झाल्यावर परत मिळू शकते.

२) लोक अदालतीकडे पक्षकारांचा विनंती अर्ज आल्यानंतर संदर्भित अर्जाची गुणवत्ता (Merit) आणि हक्क प्रतिपादन (Claim) ठरवताना त्यात नेहमीच्या किचकट न्यायिक कार्यपध्दतीला वाव नसतो, त्यामुळे न्यायदान गतिमान होते.

३) लोक अदालतीसमोर वकीलांची उपस्थिती अनिवार्य नसते. तथापि पक्षकाराची इच्छा असल्यास न्यायालयाच्या पूर्व परवानगीने वकीलास पक्षकारातर्फे हजर राहता येते.

४) पक्षकारांना कुठलेही दडपण न येता आपली बाजू मांडण्याचा अधिकार असल्याने लवकरात लवकर पेच/तक्रार सोडवण्यास आणि त्यात सन्मान्य तडजोड घडवून आणण्यास मदत होते, जे नेहमीच्या किचकट न्यायालयीन प्रक्रियेत सहसा शक्य होत नाही.

५) नियमित न्यायालयात दावा दाखल करण्याऐवजी उभय पक्षकारांना आपला विनंती अर्ज सरळ लोक अदालतीमध्ये दाखल करता येतो.

६) लोक अदालतीची कार्यवाही ही न्यायिक कार्यवाही असल्यामुळे दिलेला निवाडा हा दिवाणी न्यायालयाच्या निर्णयासमान असतो, त्यामुळे अशा निवाड्याची कायदेशीरपणे अंमलबजावणी करता येते.

७) लोक अदालतीकडे विनंती अर्ज करताना उभयपक्षकारांनी 'स्वसंमतीने समझोता आणि तडजोड केली आहे' असे प्रतिज्ञेवर प्रतिपादन (Undertaking) केल्यामुळे, लोक अदालतीचा निवाडा हा अंतिम समजला जातो. परस्पर संमतीने निवाड्याचा स्वीकार केल्यामुळे कोणत्याही पक्षकाराला या निवाड्याविरुध्द वरच्या कोर्टात दाद (Appeal) मागता येत नाही.

८) 'दावा दाखल करण्यापूर्वी', 'दावा दाखल झाल्यानंतर', 'सुनावणीपूर्व अथवा सुनावणीपश्चात' (Pre-Litigation, Pending-Litigation and Post-Litigation) या तिन्ही अवस्थेत, लोक अदालतीद्वारे पक्षकारांच्या परस्पर संमतीने निवाडा होवू शकत असल्याने पैशाचा आणि वेळेचा अपव्यय टळू शकतो.

९) लोक अदालतीमुळे मिळणारा निवाडा हा कमी खर्चाचा व गतिमान पर्याय उपलब्ध असल्याने पक्षकारांना त्याचा आर्थिक फायदाच होतो.

१०) लोक अदालतीच्या पर्यायामुळे नियमित कोर्टात वर्षानुवर्षे प्रलंबित असलेल्या खटल्यांचे लवकरात लवकर निराकरण होत असल्याने संबंधित कोर्टाच्या कामकाजाचा बोजा हलका होतो. वरच्या कोर्टात दाद मागण्याची सोय नसल्यामुळे अपिलेट न्यायालयांच्या कामकाजाचाही भार कमी होतो. परिणामी दोन्ही कोर्टात दाव्यांची संख्या कमी करण्यात लोक अदालतीची मदतच होते.

११) नेहमीच्या न्यायालयीन प्रक्रियेपेक्षा लोक अदालतीद्वारे जलद मिळणारे निवाडे हा वैकल्पिक पर्याय समाजातील गोरगरीबांना, तळागाळातील लोकांना आणि उपेक्षितांना मोठा आधार ठरला आहे.

१२) लोक अदालतीची कार्यवाही स्थानिक भाषेतून होवू शकते त्यामुळे साक्षर नसलेल्या पक्षकारांना एकूणच कामकाज समजावणे सोईचे होते.

१३) जिल्हा व तालुक्याच्या ठिकाणी लोक अदालतीची सोय उपलब्ध असल्यामुळे सामान्य नागरिकांच्या वेळेत आणि खर्चात बचत होते.

१४) नागरिकांच्या सोयीसाठी सकाळी १० ते सायंकाळी ६ दरम्यान लोक अदालतीची सुनावणी, महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या शनिवारी अथवा रविवारी संबंधित न्यायालयात अथवा जवळच्या एखाद्या शासकीय इमारतीत होत असल्याने कुणाचीही गैरसोय होत नाही.

१५) लोक अदालतीच्या तारखा महिनाभर अगोदर जाहीर होतात व त्यास योग्य ती प्रसिध्दी दिली जाते. त्यामुळे पक्षकारांना पूर्व तयारी करणे सुलभ होते.

१६) लोक अदालतीचे कामकाज (काही अपवादात्मक प्रकरणे सोडल्यास) आम जनतेसाठी खुले असते.

**"अंबिका राजन विरुध्द बशीरा बीवी आणि इतर"** प्रकरणी (*AIR 2009 Ker. 151*) मा. केरळ उच्च न्यायालयाने लोक अदालतीचे फायदे अगदी थोडक्यात विषद केलेले आहेत :-

१) या खटल्यासाठी न्यायालयीन शुल्क (Court Fee) भरण्याची आवश्यकता नसते.

२) एकूण कार्यपध्दती लवचीक (Flexible) असल्यामुळे वाद विवादांचे निराकरण गतिमान पध्दतीने होते.

३) उभय पक्षकार निःसंकोचपणे न्यायाधीशाबरोबर आपले म्हणणे मांडू शकतात.

४) लोक अदालतीने दिलेला निवाडा दिवाणी न्यायालयाच्या निवाड्यासमान दर्जाचा असल्यामुळे तो उभय पक्षकारांवर बंधनकारक राहतो.

या गतिमान न्याय निवाड्यामुळे पारंपरिक कोर्टामध्ये वेळ आणि पैसा वाया घालवण्यापेक्षा वादी प्रतिवादीला आपले वाद सलोख्याने व गतिमान पध्दतीने सहज सोडवता येतात हे लक्षात ठेवले पाहिजे.

# ६

# स्थायी लोक अदालत

## (Permenant Lok Adalat)

● **स्थापना, आणि अधिकार** (Establishment and Powers):-

लीगल सर्व्हिसेस ॲथॉरिटीज (अमेंडमेंड) ॲक्ट : १९९४ कलम २२ मध्ये २००२ साली सुधारणा होवून त्यात **'स्थायी लोक अदालत'** स्थापना करण्याची तरतूद करण्यात आली असून ती १२ जून २००२ पासून प्रत्यक्षात अंमलात आलेली आहे. परिणामी लोक अदालतीच्या कृतिक्षेत्रात वाढ होवून, वाहतूक (Transport), टपाल आणि तार यंत्रणा (Post & Telegraph) दूरध्वनी आस्थापना (Telephone Nigam), वीज आणि पाणी पुरवठा (Electricity & Water Supply), आरोग्य (Sanitation), शरीरस्वास्थ्य (Health Care), विमा (Insurance), या व अशा अत्यावश्यक नागरी सेवासुविधा यासंबंधी निवाडे देण्याचा अधिकार 'स्थायी लोक अदालतीला' प्राप्त झालेले आहेत.

त्या व्यतिरिक्त 'दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८' च्या नियम क्रमांक ३(२), कलम XXXII-A यात २००२ साली सुधारणा झाली. या सुधारणेमुळे न्यायप्रक्रियेस एक महत्वाची उपलब्धी प्राप्त झाली आहे. एखाद्या प्रलंबित खटल्यामध्ये रास्त तडजोड होण्याची शक्यता आहे असे न्यायाधीशांच्या नजरेत आले तर संबंधित दावा, तहकूब (Adjourn) करून सदर न्यायालयाकडून ते प्रकरण स्थायी लोक अदालतीकडे वर्ग करण्याची शिफारस केली जावू शकते.

लीगल सर्व्हिसेस ॲथॉरिटीज ॲमेंडमेंड ॲक्ट-१९९४ कलम 22-B अन्वये प्रत्येक राज्याला जाहीरनामा प्रसिध्द करून (By Notification) आवश्यक त्या ठिकाणी स्थायी लोक अदालतीची स्थापना करण्याचे व त्याप्रमाणे विभागीय वर्गवारी करण्याचे अधिकार प्राप्त झाले आहेत. अशाप्रकारे स्थापन केलेल्या स्थायी लोक अदालतीसाठी सदस्यीय समितीत खालील व्यक्तींचा समावेश अनिवार्य आहे.

१) जिल्हा न्यायाधीश, अतिरिक्त जिल्हा न्यायाधीश अथवा ज्यांनी जिल्हा न्यायाधीशापेक्षा वरीष्ठ न्यायिक अधिकारी म्हणून कामकाज पाहिले आहे, अशा व्यक्तीला स्थायी लोक अदालतीचा अध्यक्ष म्हणून कामकाज पाहता येते.

२) त्याशिवाय नागरी सेवा सुविधासंबंधी ज्यांना पर्याप्त ज्ञान आणि अनुभव आहे अशा दोन माहितगार व्यक्तींची केन्द्र अथवा राज्य सरकार, स्थायी लोक अदालतीच्या सदस्यीय मंडळावर नेमणूक करू शकते.

## • अधिकारक्षेत्र आणि निवाडा (Judiction and Award)

LSAA-1994, कलम 22-C अन्वये दावा दाखल करण्यापूर्वी उभय पक्षकार त्यांच्यात तडजोड/समझोता घडवून आणण्यासाठी 'स्थायी लोक अदालतीला' विनंती अर्ज करू शकतात, तथापि:-

१) अस्वीकारक (अपराधात्मक) गुन्हे संदर्भात निवाडा करणे स्थायी लोक अदालतीच्या कृतिकक्षेत येत नाही.

२) १० लाखाहून अधिक रकमेच्या मागणीसाठी असलेले दावे स्थायी लोक अदालतीच्या कक्षेत येत नाहीत. तथापि या मर्यादेत सुधारणा करण्याचे / वाढवण्याचे अधिकार केन्द्रीय सरकारला आहेत.

३) कायद्यातील उपकलम १ अन्वये स्थायी लोक अदालतीकडे अर्ज दाखल झाल्यास अथवा वर्ग झाल्यास संबंधित पक्षकार सदर दावा ज्या कोर्टात पूर्वी चालू होता त्या कोर्टाला तेथील न्यायिक प्रक्रिया पुढे चालू ठेवाव्यात अशी विनंती करू शकत नाहीत.

४) नागरी सेवासुविधा प्रकरणी उभय पक्षकारात प्रयत्न करूनही तडजोड होवू शकली नाही तर स्थायी लोक अदालत 'एकतर्फी निवाडा' जाहीर करू शकते.(**LIC of India V Rajsthan State** (AIR 2008 SC 2398)

५) कायद्याच्या कलम 22-E अन्वये स्थायी लोक अदालतीने दिलेला निवाडा हा दिवाणी न्यायालयाचा निर्णय समजला जातो.

६) स्थायी लोक अदालतीचा निवाडा हा त्या सदस्य मंडळाच्या बहुमताने पारित होतो.

७) स्थायी लोक अदालतीचा निवाडा हा अंतिम आणि न्यायालयीन निर्णय म्हणून ग्राह्य धरला जातो.

८) स्थायी लोक अदालतीने दिलेल्या निवाड्याची अंमलबजावणी संबंधित दिवाणी न्यायालयास करावी लागते.

वरील विवेचनावरून एक गोष्ट स्पष्ट होते की जर नागरिकांत जागरूकता आणि कायदेविषयक जाणीव वाढली तर ह्या वैकल्पिक न्यायदान संकल्पनेला यापेक्षाही फार मोठे यश मिळेल; आणि या माध्यमातून गोरगरीबांसाठी न्याय मिळवणे सहज शक्य होईल.

भारतीय न्यायव्यवस्था या लोकशाही तृतीय स्तंभाचा 'लोक अदालत' हा आज व्यवच्छेदक भाग (Integral Part) बनल्यामुळे जनहितासाठी हळूहळू का होईना भारतीय न्यायदानप्रक्रियेत भविष्यात वेळोवेळी भरपूर सुधारणा होवून लोक अदालतीतर्फे होणारे न्यायदान दिवसेंदिवस अधिक प्रभावी होईल आणि पर्यायाने न्यायव्यवस्थेच्या कामाचा भार कमी होण्यास फार मोठी मदत होईल असा विश्वास वाटतो.

# सुधाकर दोखणे



## साहित्य / लेखन :

- Real Estate Transactions (4th Edition)
- Guide for Site Supervision (2nd Edition)
- Guide for Slum Rehabilitation Schemes in Gr. Mumbai.
- Guide on Fire Safety of Highrise Buildings
- Redevelopment of Society Buildings (2nd Edition)
- ग्रामीण व शहरी मालमत्ता खरेदी-विक्री व्यवहार (महसुली तरतुदी)
- मुंबईचा पाणी पुरवठा : किती खर्चाचा-किती कष्टाचा
- माहिती अधिकार-२००५ : जनहित याचिका : लोक अदालत
- सहकारी गृहनिर्माणसंस्थेच्या इमारती : दुरुस्ती-देखभाल आणि पुनर्विकास
- वय वर्ष साठ (व्यक्तिरूप आत्मकथन)
- वर्तुळ (कथा संग्रह)
- कैलासनाथा (पर्यटन)
- हेरगिरी आणि श्रेष्ठ महिला गुप्तचर (कूट नीती)
- मृत्युदंड असावा की नसावा? (अपराधशास्त्र आणि दंडनीती)

---

● माहिती अधिकार : जनहित याचिका : आणि लोक अदालत, या जनकल्याणासाठी अस्तित्वात असलेल्या महत्वाच्या न्यायप्रक्रियांची एकत्रित माहिती सामान्य नागरिकांना सुलभपणे मिळावी हाच या लिखाणाचा एकमेव उद्देश दिसून येतो. समाजप्रबोधन आणि लोकशिक्षण असा दुहेरी हेतू त्यामुळे साध्य झाला आहे.

● श्री. भालचंद्र दसगावकर
(जिल्हा व सत्र न्यायाधीश-निवृत्त)

● प्रत्येक न्यायप्रक्रियेची संकल्पना, उद्देश, मर्यादा, साध्य, सफलता आणि गैरवापर याचा अर्थपूर्ण उहापोह अत्यंत सोप्या भाषेत केला गेला असल्याने प्रत्येक विषयाची उकल सुलभ आणि परिणामकारक झालेली आहे. कायदेविषयक पुस्तके मराठी भाषेत फार अभावाने पहावयास मिळतात .ती उणीव या पुस्तकाने बऱ्याचअंशी भरून काढलेली आहे.

● श्री. दे.ना. चौधरी
(अध्यक्ष, महाराष्ट्र स्टेट लॉ कमिशन)

● माहिती अधिकार : जनहित याचिका : आणि लोक अदालत या तिन्ही विषयांची मांडणी अत्यंत प्रभावीपणे केली असून सोप्या व प्रवाही भाषेमुळे प्रत्येक न्यायप्रक्रिया सहजपणे समजून घेताना मराठी वाचकाला कोणतीही अडचण पडणार नाही. विधिशास्त्राचा सखोल अभ्यास करून अंत्यंत तळमळीने केलेली ही संग्राह्य साहित्यनिर्मिती वाखाणण्यासारखी आहे.

● श्री.सुनील मोगरे
(ज्येष्ठ विधितज्ञ आणि विधिव्यावसाई)

● जनसामान्यांच्या हितासाठी माहिती अधिकाराचे स्वातंत्र्य अबाधित राहीले पाहिजे, लोक अदालत चालली पाहिजे आणि जनहित याचिका दाखल होत राहिल्या पाहिजेत. सामाजिक बांधिलकीची जाणीव जोपासणाऱ्या व्यावसाईकसंघटनेचे योगदान म्हणून अध्यक्ष ह्या नात्याने सदर पुस्तक वाचकांपर्यंत पोचवण्यास आम्हाला अत्यंत आनंद होत आहे.

● अर्कि. प्रवीण कणेकर
(अध्यक्ष-पिएटा (इंडिया))

Published by :

FOUNDED IN 1965

**Practising Engineers Architects and Town Planners Association (India)**

4 & 5, GR. FLOOR, NAGREETERRACES, SOONAWALA AGIARY MARG,
OFF M. M. CHHOTANI ROAD, MAHIM (W), MUMBAI - 400 016.
Tel.: 2444 5998 • 2444 2897 • Fax: 2444 2983 • E-mail: peataindia@rediffmail.com
Website:wwwpeataindia.org